म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ५३८२

IRBK-0105342
IRBK-0105342

वा. क्र. - ५३४२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्ग

26 OCT 1974

DEC 1974

# एक ना धड...

( विविध विनोदी साहित्य )

लेखक :

वि. आ. बुवा

IRBK-0105342

बलवन्त पुस्तक भाण्डार

गिरगांव नाका, मुंबई नं. ४.

प्रकाशक :
**त्रिं वि. परचुरे**
बलवंत पुस्तक भाण्डार
मुंबई ४
★
मुद्रक :
**य. गो. जोशी**, बी. ए.
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव
पुणें २
★
मुखपृष्ठ
आणि
आंतील चित्रें :
**वि. आ. बुवा**
व्ही. जे. टी. आय्.
मुंबई १९
★
प्रकाशनदिन आणि स्थळ :
३१ डिसेंबर १९५५
मराठी साहित्य संमेलन—
३८ वें अधिवेशन
पंढरपूर
★
सर्व
अधिकार
लेखकाच्या
आधीन
आहेत.
★

# प्रस्तावना

मराठी हास्यवाङ्मयाच्या क्षितिजावर १९५० इ. च्या आगेमागें नवीन तारा उदयाला आला. संतांच्या सात्विक, बोधपर, भक्तिप्रचुर आणि गंभीर वाङ्मयाला जन्म देणाऱ्या पंढरींतील बुवा घराण्याच्या ह्या कौस्तुभ-मण्याला वेगळ्याच प्रकारच्या वाङ्मयाच्या निर्मितीची स्फूर्ति उत्पन्न होऊं लागली आणि त्यामुळें त्या तऱ्हेच्या वाङ्मयाचें एक प्रसूतिगृह जें मुंबई नगर तिकडे त्यानें प्रयाण केलें. वि. आ. बुवा हे प्रथम हस्तलिखित मासिक चालवीत होते, अद्यापहि तें चालूंच आहे. पण पहिल्यानें ते नव-काळ, लोकमान्य, वेणी या मुद्रित कालिकांच्या अंकांतून झळकूं लागले. त्यांचा विनोद प्रथम प्रथम तात्कालिक स्वरूपाचा होता. वीज जशी चमकून जावी आणि क्षणमात्र तिचा चकचकाट पडून पुनः पूर्ववत् अंधार व्हावा तशी त्यांच्या अगदीं छोट्या चुटक्यांची चमक क्षणिक वाटे. आकाशांतून पकडून आणून विद्युत्संचयांत सांठवून ठेवलेल्या, दीर्घकाल प्रकाश देणाऱ्या विजेसारखा चिरस्थायी विनोद आतां ते निर्माण करूं लागले आहेत. ' अकलेचे तारे ' हा त्यांचा संग्रह १९५३ त निघून त्यानें इतकी लोकप्रियता मिळविली कीं दोन वर्षांत त्याची दुसरी आवृत्ति निघाली. १९५४ त त्यांचा दुसरा संग्रह ' अकलेचे दिवे ' निघाला. हा तिसरा संग्रह १९५५ च्या अखेरीस निघत आहे. कदाचित् ' अकलेचे कांदे ' असें नांव ते यास देतील असें मला वाटलें होतें पण ' अक्कल ' आतां फार झाली असें वाटून त्यांनीं ' एक ना धड... ' असें या संग्रहाचें नांव ठेविलें. पुनः पुनः तीच कल्पना पुनरावृत्त करणें त्यांना आवडत नाहीं म्हणून ग्रंथ-नामांच्या संकल्पांतील हा फेर स्तुत्य आहे.

जनज्ञानाचा सामोसा आणि चकणाचूर हे पहिलेच दोन व्याजलेख वाचकांच्या मनाची पकड घेतात. आचार्य अत्र्यांना रौप्यपदक मिळाल्या-नंतर भवसक्ती दैनिकाला वेगळाल्या लेखकांचीं पत्रें आलेलीं देऊन सामान्य जनतेच्या चोंबडेपणाचें प्रदर्शन बुवांनीं मांडिलेलें आहे. चकणाचूर ही [illegible]णाची लघुकथा सात तवे फोडून आरपार निघून जाणाऱ्या

बाणासारखी तीक्ष्ण आहे. तिचें स्वच्छंद शुद्धलेखन म्हणजे हल्लीच्या तरुण पिढीच्या मुक्तबंध अशुद्धलेखनाचें तिखट विडंबन आहे. लेखक आपल्याला न झेपणारे संस्कृत शब्द हास्यकारक रीतीनें विकृत करतो; नायक आपण मुंबईंत येस पी कॉलेजच्या रेसीडेन्टमध्यें रहातो असें सांगतो; नायकाला 'हंटले पामर सिगारेटच' आवडतात. लोकमान्य टिळकांनीं गीतारहस्य लिहून आपण रहस्यकथा लिहूं शकतो हें ब्रिटीशांना दाखवून दिलें, अशी विधानें करणारा विद्वान् नायक जेव्हां "सुद्धलेखण आणी व्याकर्न निट यावे लागते, मराठि, सौंस्कूत, आणी इंग्रजि भाषेवर प्रभूत्वतापणा असावा लागतो, मि या भाषेमधलि शेकडो पुस्तके वाचालि म्हनुण इतके आकृष्ट मनोदय साहीत्य लीहू शकतो," असें विधान करतो तेव्हां हसून मुरकुंडी वळते. केवळ हल्लीच्या बहुसंख्यांक लघुकथालेखकांच्या व्याकरणाच्या अज्ञानावर, अशुद्धलेखनावर, सामान्य गोष्टींच्या अज्ञानावर ही व्याजोक्तिमय टीका आहे असें नसून लघुकथा या नांवाखालीं मोडणाऱ्या सांचेबंद रडकथांवर देखील ही जळजळीत टीका दिसते. यांतील कित्येक ठिकाणीं अमुद्रणीय कल्पना आणि शब्दयोजना झालेली आहे ती वगळतां हा लेख विनोदी लिखाणाचा उत्कृष्ट नमुना म्हणून दाखवितां येईल. लेखणीमित्र अर्थात् हजार साहित्य पाकक्रिया हा व्याजप्रबंध मला फार आवडला. गडकरी आणि कॅप्टन लिमये या दोन लेखकांनीं कवितांच्या कारखान्यांवर हास्यप्रबंध लिहिले आहेत, त्याच धर्तीवर एकंदर वाङ्मयरचनेवर ही खुसखुशीत टीका आहे. हल्लीच्या लघुकथा, कादंबऱ्या, ग्रामीण कथा, नवकाव्य आणि नाटकें यांमधील कंटाळवाणी तदावृत्ति, सांचेबंद विषय, तंत्राच्या चौकटींत जखडलेली रचना, लेखक आणि कवि यांची परस्परप्रशंसा करण्याची संवय, टीकेंतील ठराविक अर्थशून्य शब्दप्रयोग यांचें यथातथ्य दर्शन बुवांनीं घडविलें आहे.

कांहीं अलंकार हा हास्यनिबंध अभिजात वाङ्मयांत मोडण्याजोगा आहे. त्यांतील उद्यक अलंकारांतील, 'आजचें सांचेबंद वाक्य हें उद्याचें सुभाषित आहे,' 'आजची इंग्रजी शॉर्ट स्टोरी ही उद्यांची मौलिक मराठी लघुकथा आहे' वगैरे उदाहरणें मार्मिक आहेत. या निबंधांतील

उदाहरणें एकंदरीनें सूक्ष्म निरीक्षण, निर्भीड वृत्ति, स्वतंत्र विचारशक्ति यांचे नमुने आहेत. बुवा यांचा सर्व विनोद शुद्ध ' मऱ्हाटी ' आहे. त्यांत पंढरपुरी डाळ्याचा खुसखुशीतपणा, पंढरपुरी बुक्क्याचा मंद सुवास, माहीमच्या हलव्याची गोडी, चौपाटीवरच्या भेळीचा तिखटपणा त्याचप्रमाणें त्या डाळ्यांत मिसळलेल्या खड्यांचे खटकेहि आहेत. स्वतःवर आणि स्वतःच्या नांवावर मस्करी करण्यास ते डगमगतनाहींत. गीतेपासून आधुनिक शास्त्रीय शोधांपर्यंतची त्यांना ओझरती तरी माहिती आहे आणि तिचा हास्योत्पादनाकडे उपयोग करण्याचें त्यांस सामर्थ्य आहे. आपण मुद्दाम इंग्रजी विनोद वाचीत नाहीं कारण त्यायोगानें रूपांतरें किंवा वाङ्मयचौर्य करण्याची बुद्धि होईल असें मला त्यांनीं प्रत्यक्ष सांगितलें व हें त्यांचें सांगणें ह्या पहिल्या तीन पुस्तकांच्या वाचनावरून मला खरें वाटतें. रा. बुवा यांचा विनोद आरंभीं आरंभीं मला रा. दत्तू बांदेकरांच्या मार्मिक, भेदक, शुद्ध स्वदेशी व जरा असंस्कृत विनोदासारखा वाटे. अलीकडील त्यांच्या लेखांत व्यासंगाची जोड मिळालेली दिसत आहे. ग्राम्य किंवा अश्लील कोट्या, अगदीं गांवढळ गालिवचनें व क्षणभंगुर घटनांचे उल्लेख यांचा उपयोग निदान पुस्तकरूपानें आपली कृति प्रसिद्ध करतांना त्यांनीं करूं नये अशी सूचना व अभिजात आणि सदभिरुचिसंपन्न असलेल्या मराठी हास्यवाङ्मयांत त्यांनीं अशीच भर घालीत जावी, अशी विनंती त्यांस मी करितों.

३३ नातूबाग पुणें
श्रीदत्तजयंती शके १८७७

चिं. वि. जोशी

# माझें थोडेंसें

' एक ना धड... ' हें माझें तिसरें विनोदी पुस्तक रसिक वाचकांच्या सेवेस सादर करतांना मला अतिशय आनंद वाटत आहे. ' अकलेचे तारे ' आणि ' अकलेचे दिवे ' या माझ्या अगोदरच्या दोन्ही विनोदी पुस्तकांची वाचकांनीं, साहित्यिकांनीं आणि नियतकालिकांनीं प्रशंसा केली, एवढेंच नव्हे तर ' अकलेचे तारे ' ची अल्पावधींतच दुसरी आवृत्तिहि नुकतीच प्रसिद्ध करण्याचा योग आला. वाचकांच्या या सक्रिय प्रोत्साहनामुळेंच हें पुस्तक सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

या पुस्तकांत समाविष्ट झालेलें साहित्य प्रथम खालील नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें होतें.

जनज्ञानाचा सामोसा ( नवशक्ति ), माझें वृत्तपत्रवाचन ( अलका ) लेखणीमित्र ( दीपलक्ष्मी ), बुवा-वाणी ( धनुर्धारी ), कांहीं जाहिराती ) ( हंस, मोहिनी, वाङ्मयशोभा ), कांहीं अलंकार ( हंस, वाङ्मयशोभा ), मी महायोगी, तेथें कर माझे जुळती आणि प्रेमाची भूमिति ( वसंत ), चकणाचूर, चंद्र अमेरिकेचा : अक्कल माझी, नांवें, गांवें आणि शब्द, (मोहिनी), दोन हृदयें ( हंस ).

' सकाळचें दूध ' हें मुंबई नभोवाणीवर झालेलें भाषण होय.

वरील नियतकालिकांच्या संपादकांनीं आणि ऑल इंडिया रेडिओच्या मुंबई केंद्राच्या अधिकाऱ्यांनीं वरील साहित्य या पुस्तकांत समाविष्ट करण्यास संमति दिल्याबद्दल मी सर्वांचा अतिशय आभारी आहें.

या पुस्तकाला मराठींतील प्रथितयश, ज्येष्ठ आणि श्रेष्ठ विनोदी साहित्यिक प्रा. चिं. वि. जोशी यांची प्रस्तावना लाभली हाहि सुयोगच आहे. माझ्या विनंतीला मान देऊन त्यांनीं प्रस्तावना लिहिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

हें पुस्तक अल्पावधींत सुबक रीतीनें छापून दिल्याबद्दल पुणें येथील आनंद प्रेसचे श्री. य. गो. जोशी आणि कामगार-बंधू यांचे मी आभार मानतों.

'**बलवंत पुस्तक भांडारा**'चे मालक श्री. त्र्यं. वि. तथा अण्णासाहेब परचुरे हेच नेहमींप्रमाणें या पुस्तकाचे प्रकाशक आहेत. चांगले प्रकाशक मिळायला सुदैव लागतें आणि मी या बाबतींत सुदैवी आहें. इतक्या दिवसांच्या सहवासानें आणि वृद्धिंगत झालेल्या स्नेहानें त्यांचे आणि माझे संबंध आतां धंदेवाईक रूपाचे राहिले नसून जिव्हाळ्याचे झाल्यामुळें मी त्यांचे आभार मानणें किंवा त्यांनीं ते मानून घेणें हें दोघांनाहि प्रशस्त वाटणार नाहीं. म्हणून त्यांच्याविषयीं काय वाटतें तें मी मनांतच राखून ठेवतों.

हें पुस्तक पंढरपुरीं—माझ्या गांवीं—भरलेल्या मराठी साहित्य संमेलनांत प्रसिद्ध करण्याचा सुयोग लाभल्यामुळें मला आगळेंच समाधान वाटत आहे.

माझ्या पहिल्या दोन पुस्तकांप्रमाणें हेंहि पुस्तक रसिक वाचकांना आवडेलच अशी सदिच्छा व्यक्त करून हें 'माझें थोडेंसें' पुरे करतों.

संकष्टी चतुर्थी
मार्गशीर्ष शके १८७७
व्ही. जे. टी आय्.
मुंबई १९

—वि. आ. बुवा

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | जनज्ञानाचा सामोसा | १ |
| २ | चकणाचूर | ८ |
| ३ | माझें वृत्तपत्रवाचन | २२ |
| ४ | सकाळचं दूध | ३७ |
| ५ | चंद्र अमेरिकेचा : अक्कल माझी | ४७ |
| ६ | लेखणी-मित्र अर्थात् हजार साहित्य-पाकक्रिया | ५६ |
| ७ | बुवा-वाणी | ६९ |
| ८ | मी : महायोगी | ७९ |
| ९ | नांवें, गांवें आणि शब्द | ८८ |
| १० | कांहीं जाहिराती | ९४ |
| ११ | कांहीं अलंकार | १०९ |
| १२ | तेथें कर माझे जुळती | ११५ |
| १३ | दोन हृदयें | १२३ |
| १४ | प्रेमाची भूमिति | १२७ |


* * *

# एक ना धड...

अनुक्रम ..........
विभाग ..........
क्रमांक ..........
नों. दि. ..........
वाचनालय




## जनज्ञानाचा सामोसा

### आचार्य अत्र्यांवरच कां मेहेरबानी ?

श्री. संपादक, ' भवसक्ती ' यांस—

पूज्य साने गुरुजींनीं लिहिलेल्या आणि आचार्य अत्रे यांनीं दिग्दर्शित केलेल्या ' श्यामची आई ' या चित्रपटाला भारतसरकारनें ' राष्ट्रपति-पदक ' नुकतेंच बहाल केलें आहे. त्याबद्दल मी राष्ट्रपति डॉ० राजेंद्रप्रसाद यांचें अभिनंदन करतों. परंतु सरकारनें एकाच मराठी चित्रपटाला पदक देऊन आपला कंजूषपणा व्यक्त केला आहे. कोणताहि मराठी चित्रपट घ्या, तो ' मराठी पण मधुर ' असतोच असतो. मग आचार्य अत्र्यांच्या चित्रपटावरच एवढी मेहेरबानी कां करण्यांत आली याचा राष्ट्रपति खुलासा करतील काय ?



—गोट्रू गोवेंकर

* * *

### महाराष्ट्राला आणखी ' हिरे ' पाहिजेत.

श्री. संपादक ' भवसक्ती ' यांस—

आपल्या लोकप्रिय ' भवसक्ती ' पत्रांतील श्री. गोटू गोवेंकर यांचें पत्र वाचलें आणि त्यांच्या बुद्धिमत्तेची मला कींव आली. कोठें ' श्यामची

आई ’ हा चित्रपट आणि कोठें ‘ मराठी पण मधुर ’ असे इतर चित्रपट ! कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें श्यामभट्टाची तट्टाणी ? सानेगुरुजींची ‘श्यामची आई’ म्हणजे प्रत्यक्ष पांचवा वेद आहे. त्याला ‘मातृवेद’ म्हणायला कांहींच हरकत नाहीं. ( राष्ट्रपतींनीं तसें फर्मान तांतडीनें काढावें अशी माझी त्यांना सूचना आहे.) मात्र राष्ट्रपतींनीं ‘ श्यामची आई ’ या चित्र-पटास जें सुवर्णपदक दिलेलें आहे, त्याला चार सहा हिरे बसवून दिले असते तर अधिक बरें झालें असतें. ( सध्यां महाराष्ट्रांत भाऊसाहेब हिऱ्यां-शिवाय दुसरे हिरेच नाहींत म्हणून हें आवर्जून सुचवावेंसें वाटतें.) राष्ट्रपति माझ्या या सूचनेचा विचार करतील काय ? महाराष्ट्र गरीब आहे म्हणून राष्ट्रपतींनीं हिरेजडित पदक देणें आवश्यक होतें.

—सौलत फरारी भोटम

* * *

## पदक विकून टाकावें आणि मुलांसाठीं खाऊ घ्यावा.

श्री. संपादक, ‘ भवसक्ती ’ यांस,

‘ श्यामची आई ’ आणि राष्ट्रपतींनीं आचार्य अत्रे यांना दिलेलें सुवर्ण-पदक यांबद्दलचीं दोन्ही पत्रें वाचलीं, आणि दोघांच्याहि सूचनांचें हंसू आलें. महाराष्ट्र गरीब असला म्हणून काय झालें ? चार सहा हिरे मागणें अगदींच पोरकटपणाचें आहे. माझें तर आचार्य अत्रे यांना असें सांगणें आहे कीं, राष्ट्रपतींनीं त्यांना पोतेंभर हिरे दिले तरीहि त्यांनीं त्यांचा स्वीकार करूं नये. उलट त्यांना जें सुवर्णपदक मिळालें आहे तेंहि त्यांनीं विकून टाकावें आणि आलेल्या पैशांतून खाऊ घेऊन तो गरीबांच्या मुलांस वाटावा. आचार्य अत्रे हें सुवर्णपदक लवकरच विकतील काय ?

— र. वि. दांडके

* * *

## सर्कसवाले देवल, पूज्य गुरुजींचें हें स्वप्न साकार करतील काय ?

श्री. संपादक, ‘भवसक्ती’ यांस,

श्री. दांडके यांचें पत्र आणि त्यांत त्यांनीं आचार्य अत्र्यांसारख्या महान् व्यक्तीला दिलेला मोफतचा सल्ला वाचला. दांडके यांच्या फुकट फौजदारीचें

मला हंसूंच आलें. आचार्य अत्रे सुवर्णपदक विकतील अथवा न विकतील. हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. या बाबतींत सल्ला सुचवायला अत्रे यांचें डोकें अजून 'मॉस्को'वासी झालेलें नाहीं. मी तर उलट असें म्हणेन कीं, आचार्य अत्रे यांनीं हें पदक दिमाखानें कोटावर लावून डौलानें फिरावें. अहो, आजकाल असलीं पदकें मिळतात कोठें ? आचार्य अत्रे यांच्या सुदैवानें सध्यां 'देवल सर्कस'चा मुक्काम मुंबईतच आहे. 'श्यामची आई' हा चित्रपट प्रकाशित झाला तेव्हांहि 'देवल सर्कस'चा मुक्काम, पूज्य बापूजींच्या वारंवार आगमनामुळें पवित्र झालेल्या मुंबापुरींतच होता. तेव्हां श्री. देवल यांनीं आपले हत्ती देऊन 'श्यामची आई' या चित्रपटांतील कलावंतांची त्यांवरून मिरवणूक काढली होती. आतां या खेपेसहि आचार्य अत्रे यांची सुवर्णपदकासहित हत्तीवरून मिरवणूक काढावी. सर्कसचे मालक श्री. देवल यांना मला अशी विनंति करावयाची आहे कीं, पूज्य सानेगुरुजींच्या या पवित्र कार्यासाठीं त्यांनीं एक उत्तमांतला उत्तम हत्ती आचार्य अत्रे यांस आरूढ होण्यासाठीं द्यावा. पूज्य सानेगुरुजींचें हें स्वप्न श्री. देवल साकार करतील काय ?

—गजा पटेल.

* * *

## मराठी पण गरीब

श्री. संपादक 'भवसक्ती' यांस—

श्री. गजा पटेल यांचें विनोदी पत्र वाचून माझी हंसून हंसून मुरकंडी वळली. सुवर्णपदक दिलें कोणीं ? तें मिळालें कोणाला ? आणि हत्ती देण्याची गळ देवलांना घालणारे हे कोण टिकोजीराव ? ( माफ करा हं पटेल तुम्हांला टिकोजीराव म्हटल्याबद्दल ) उलट मुंबई सरकारनें दहाशें एक बैलांच्या गाडींतून आचार्य अत्रे यांची जंगी मिरवणूक काढावी आणि या आनंदाप्रीत्यर्थ, पूर्वीं निघालेल्या आणि पुढें निघणाऱ्या सर्व मराठी चित्रपटांचा करमणूक-कर माफ करावा. नाहीं तर सध्यां निघतात त्याहिपेक्षां भिकार चित्रपट काढून आणि त्यामुळें लोकांची करमणूक न

करून, निर्माते कायद्याची पळवाट काढतील आणि करमणूक-कर चुकवितील. तेव्हां सरकारनें वेळींच सावध होऊन करमणूक-कर माफ करण्याचें पुण्य पदरीं पाडून घ्यावें.

त्याचप्रमाणें आचार्य अत्रे यांना जें सुवर्णपदक मिळालें आहे तें मुंबई सरकारनें आचार्य अत्रे यांच्याकडून मागून घ्यावें आणि म्युझियमध्यें ठेवून द्यावें. एरवीं तें आमजनतेला कसें दिसेल ? तरी आचार्य अत्रे यांनीं हें पदक, लोभबुद्धि न धरतां, तात्रडतोब सरकारच्या स्वाधीन करावें अशी नम्र पण गोड सूचना आहे. आचार्य अत्रे हे स्वतः विनोदी असल्यामुळें ते हंसत हंसत हें पदक सरकारच्या ताब्यांत देतील. सरकारनेंहि त्याच्या बदली आचार्य अत्रे यांना तितक्याच किंमतीचे धन्यवाद द्यावेत. पूज्य साने गुरुजींच्या आत्म्याला शांति मिळण्याचा हाच एकमेव उपाय आहे. आचार्य अत्रे हें पदक सरकारच्या ताब्यांत कधीं देणार या गोष्टीकडे आम मराठी जनता डोळे लावून बसली आहे.

—गो. वि. दोसी ( कांदिवली. )

* * *

## पदक गुरुजींच्या गळ्यांत घाला

श्री. संपादक, ' भवसत्की ' यांस,

श्री. गो. वि. दोसी यांचें पत्र वाचलें. माझ्या मतें सरकारनें आचार्य अत्रे यांच्याकडून तें सुवर्णपदक न घेतां तें त्यांच्याजवळच राहूं द्यावें. साने गुरुजींच्या पुण्याईवर मिळालेलें पदक घेण्याचा सरकारला नैतिक दृष्ट्या कांहीं अधिकार नाहीं. माझ्या मतें आचार्य अत्रे यांनीं तें पदक खादीच्या दोऱ्यामध्यें ओवून सानेगुरुजींच्या फोटोला घालावें. हेंच त्या सुवर्णपदकाचें योग्य स्थान होय. आचार्य अत्रे हें पदक सानेगुरुजींच्या गळीं घालून अखिल मराठी भाषिक जनतेचा दुवा घेतील काय ? पूज्य सानेगुरुजींना जिवंतपणीं हें भाग्य लाभलें नव्हतें; तेव्हां आचार्य अत्रे यांनीं हें सत्कृत्य करावेंच.

—ग. द. सीधा ये.

* * *

## पदक मोडून त्याचे बिल्वर करावेत.

श्री. संपादक ‘ भवसक्ती ’ यांस,

श्री. सीधा ये यांची सूचना अगदींच हास्यास्पद आहे. पूज्य साने गुरुजी हे तुकाराम महाराजांप्रमाणेंच निर्लोभी वृत्तीचे संत होते. त्यांच्या गळ्यांत जर सुवर्णपदक अडकविलें तर त्यांना तें फांशीच्या दोराप्रमाणें तापदायक वाटेल. गुरुजींसारख्यांना सोनें म्हणजे मृत्तिकेसमान. म्हणून आचार्य अत्रे यांनीं गुरुजींच्या गळ्यांत पदक घालण्याच्या फंदांत पडूं नये. ‘ चप्पल ’ आणि ‘ तवा ’ या दोन शब्दांचा जसा एकमेकाशीं कसलाहि बादरायणसुद्धां संबंध नाहीं त्याप्रमाणेंच ‘गुरुजी’ आणि ‘ सोनें ’ या शब्दांचाहि एकमेकाशीं संबंध नाहीं.

‘ श्यामची आई ’ या बोलपटाचें खरें श्रेय श्यामच्या आईचें काम करणाऱ्या वनमालाबाईंना आहे. सुवर्णपदकाचा उपयोग करायचाच झाल्यास आचार्य अत्रे यांनीं तें पदक मोडून दोन बिल्वर करावेत आणि ते वनमालाबाईंना ‘सप्रेम भेट’ म्हणून द्यावेत. म्हणजे वायकांची हौसहि होईल आणि पदकहि सत्कारणीं लागेल. आचार्य अत्रे बिल्वर करतील अशी आशा करावी काय ? आम्हां सर्व स्त्रियांचें या गोष्टीकडे लक्ष लागलें आहे.

—कृत्तिका जोशी (उपनगर)

* * *

## वस्त्रगाळ भुसा करा.

श्री. संपादक ‘भवसक्ती’ यांस,

कृत्तिका जोशी यांनीं आपल्या स्त्रीस्वभावास अनुसरून सुवर्णपदकाचे दागिने करण्याचा सल्ला दिला. परंतु या परमपवित्र पदकाचे दागिने का करायचे ? हें सुवर्णपदक एकट्या आचार्य अत्र्यांचें नाहीं किंवा वनमालाबाईचें नाहीं; तें आम्हां सर्व मराठी-भाषिकांच्या मालकीचें आहे. म्हणून माझी या बाबतींत अशी सूचना आहे कीं, या पदकाचा अगदीं वस्त्रगाळ भुस्सा करावा आणि त्यांतील एक एक कण, ज्यानें ज्यानें ‘श्यामची आई’

हा चित्रपट पाहिला असेल त्याला त्याला गुरुजींचा प्रसाद म्हणून रजिस्टर्ड पार्सलनें पाठवून द्यावा. आपल्या ‘मराठी पण गरीब’ प्रेक्षकांसाठीं, आचार्य अत्रे पोस्टेजचा खर्च हंसतमुखानें सोसतील याची खात्री बाळगायला मुळींच हरकत नाहीं. तसे ते उदार आहेत. हें कार्य एकहि क्षण आणि पदकाचा एकहि कण वाया न घालवितां लगेच करायला घ्यावें, अशी माझी त्यांना आम मराठी जनतेच्या वतीनें विनंति आहे.

—चों. र. सोनार

* * *

## पूरग्रस्तांची सोय करा.

श्री. संपादक ‘भवसक्ती’ यांस,

श्री. सोनार यांना आपल्या व्यवसायामुळें सोन्याच्या मोडतोडीशिवाय कांहींच दिसत नाहीं. चांगल्या सोन्यासारख्या सोन्याचा भुस्सा करण्यांत (श्री.) सोनारांना काय वाटतें कोणास ठाऊक ? त्या पदकाचा इतर चांगला उपयोग होण्यासारखा आहे. आचार्य अत्रे यांनीं या पदकाचे दोन्ही बाजूचे फोटो घ्यावेत आणि फ्रेम करून घरांत लावावेत आणि अस्सल सुवर्णपदक विकून जी रक्कम येईल ती दिब्रूगढच्या पूरग्रस्त लोकांच्या मदतीसाठीं पाठवून द्यावी. पूज्य साने गुरुजी असते आणि त्यांना हें पदक मिळतें तर त्यांनीं तें परस्परच दिल्लीहून दिब्रूगढला पाठविलें असतें. तरी आचार्य अत्रे यांनीं क्षणाचाहि विलंब न करतां हें पदक ताबडतोब विकून, पैसे लगेच मनीऑर्डरनें दिब्रूगढला पाठवावेत. या पदकाचा हा एकच काय तो विधायक उपयोग आहे.

—गुंडिराज ना. वैद्य

* * *

## ‘आम’ची ‘आई’ काढा.

श्री. संपादक, ‘भवसक्ती’ यांस,

‘भवसक्ती’तील निरनिराळीं पत्रें मीं वाचलीं. जो उठला तो पदकाची वासलात कशी लावावी याचा ‘चकट फू’ सल्ला देऊं लागला आहे.

परंतु हें सुवर्णपदक विकून आचार्य अत्र्यांनीं भारताचा प्रवास करावा हें सुचविण्याची बुद्धि एकाहि पत्रलेखकाला झाली नाहीं.

'श्यामची आई' प्रमाणेंच भारताच्या प्रत्येक प्रांतांत आणि भाषेंत एक एक 'आई' नक्की असेल. त्या आईचा शोध घेऊन प्रत्येकीवर आचार्य अत्रे यांनीं एक एक मातृपट काढावा.

कार्य मोठें आहे याची मला जाणीव आहे. परंतु आचार्य अत्रे त्याहूनहि मोठे आहेत. या महन्मंगल कार्यासाठीं पैसाहि खूप लागेल. परंतु आचार्य अत्रे यांनीं डगमगूं नये. परमेश्वर त्यांना कोठूनहि पैसा देईल. ( जे. आर. डी. टाटा आणि घनश्यामदास बिर्ला यांचें या गोष्टी-कडे मी लक्ष वेधूं इच्छितों. आचार्य अत्रे यांनींहि या मंडळींना एकदां विचारून बघावें. ) मात्र आचार्य अत्रे यांनीं तशी श्रद्धा ठेवली पाहिजे.

तरी आचार्य अत्रे हें सुवर्णपदक जेवढ्या लौकर विकून भारताच्या प्रवा-सास जातील तेवढें बरें. प्रत्येक प्रांतांमधील 'आई'चें एक एक सांस्कृतिक वैशिष्ट्य घेऊन आचार्य अत्रे यांनीं, 'श्यामची आई' प्रमाणेंच 'आम'ची आई' ( आम म्हणजे सर्व ) हा आंतरभारतीचें दर्शन घडविणारा मंगल मातृपट तरी काढावाच काढावा. आचार्य अत्रे, पूज्य साने गुरुजींचें आंतर-भारतीचें स्वप्न साकार करतील काय ?

—हेमंत माळवी.

* * *

( आचार्य अत्रे यांना 'श्यामची आई' या चित्रपटाबद्दल मिळालेल्या राष्ट्राध्यक्ष–पदकाची वासलात ( किंवा विल्हेवाट ) कशी लावायची या बाबतची आपापल्या मगदुराप्रमाणें लिहिलेलीं पत्रें आम्ही छापीत आलों आहोंतच. आतां फक्त आचार्य अत्रे यांच्याकडूनच जर पत्र आलें ( ते कशाला असल्या नसत्या फंदांत पडतील ? ) तर तेवढेंच छापून आम्ही या विषयावर कायमचा पडदा पाडणार आहोंत. सध्या पत्रलेखकांपुरता आम्ही या विषयावर पडदा पाडतों. ( पडदा पडतो. )

—संपादक, 'भवसक्ती'

* * *

# चकणाचूर 

श्रि

होटगे

तारीक २८-२-५४.

श्रिमाण संपादक महाराज'...' मासीक यांसी सीर सास्टांग जैहिंद विणंती वीशेश.

तूम्हि तूमच्या '...' मासीकाचा कथा विषेसांक काढनार असल्याच समजल. वांचून आनंद वाटला. तुम्हि:नविन नविन लेकखालाही-सुद्धांदेखील चान्स देणार असल्याचे वांचले. म्हनूण मि माझि सर्वांत ऊत्तम गोस्ट तूमच्या वीशेशांकाकर्ता पाठवित आहे. त्याचा स्विकार व्हावा आणी माझ्यासारक्या सरस्वातिदेवीच्या रंगमहालांत प्रवीष्ट करू विच्छिणाऱ्या उद्यून्मूख लेकखास चान्स द्यावा असी नम्र आनी वीलोभनीय वीणंती आहे. माझ्या कथेत मी सौंस्कूत शब्द बरेच वापरले असल्यामूळे तिला भारदस्तत्वतापणा आला आहे हे आपल्या ध्याणांत आले असेलच. मी तुमच्या '...' माशिकाचा नीतांतमधूर वांचक असून सार्वजनीक मोफत लायब्रींत जावून मी नेहमी वांचत आसतो. चांगल्या वाटलेल्या गोस्टी कापुन घरी ठेवतो. यावरून माला आपले माशीक किति आवडते हे आपल्या ध्याणांत आणि लक्क्षांत आले आसेलच. गोस्ट आपल्याला पसंत पडेलच असी माझ्या अंत्तकर्णातील ऱ्हुदयाची मनोदेवता मला विदग्धपणानें



सांगत आहे. मला चीत्रे काढन्याचिहि हाऊस आहे. म्हनूण गोस्टिला सोबत चीत्रहि जोडलें आहे. मोबदला बंदे रूपये पाठवुं नका. नोट पाठवा. कारण मि ति नोट फ्रेमिंत बसवणार आहे. ऊत्तरासाठीं मी चित्तचकोर मयूराप्रमाणें प्रतिक्षेची वाट पहात आहें. कळावें.

आपला
कथाअंकाचा येक लेकख,
धोंडुनंदण बोडके

ताकः मि मदून मदून सोलापुरास जात आसतो. स्टेशनवरचा व्हिलर-वाला मला '...' चे अंक चालु देत नाहीं. तरी कृपा करून मला अंक चालु द्यायला व्हीलरवाल्याला पत्रानें कळवा.

धोंडुनंदण

* * *

मुंबई ४
दि० ३-३-१९५४

श्री. धों. बोडके यांस स. न. वि. वि.

आपली 'चकणाचूर' ( 'चक्काचूर' ? ) ही कथा आणि सोबतचें पत्र पोंचलें. आपलें साहित्य आम्हीं घेण्याचें ठरविलें आहें हें कळविण्यास आनंद वाटतो. छापलें जाण्यापूर्वी आमच्याकडे जें साहित्य येतें त्याचा प्रातिनिधिक नमुना म्हणून आपल्या कथेची योग्यता अनन्यसाधारण आहे. कथेंत सर्वत्र वापरलेल्या संस्कृत शब्दांचें आगळेपण तर चटकन् नजरेंत भरतें. आपली कथा अगदीं जशीच्या तशी छापावी अशी आमची इच्छा आहे. म्हणजे शिकाऊ लेखकांच्या प्रतिभेचा विलास यथातथ्य रूपांत वाचकांस पहावयास मिळेल. अगदीं काना, मात्रा, वेलांटी आणि अनुस्वार यांचाहि फरक न करतां आम्ही ती छापूं इच्छितों. आपली या गोष्टीस अनुमति असल्याचें पत्रानें कळवावें. कळावें.

आपला
संपादक

* * *

श्रि

होटगी

तारिक ५-३-५४

श्रियूत संपादक '...' यास सिर साष्टांग नमसकार.

तूमचे पत्र मिळाले. वांचुन मणोहर आणी नीर्व्याजमुद्ल आनंद वाटला. माझे कथापूष्प शारदाचरणारविंदाच्या मस्तकी वाहण्याचे भाग्य मला तूमच्यामूळें मिळाले. याबदल मी तुमचे नीतांतरम्य आभार मानतो. त्याचप्रमाने माझ्या कथेंत कांहींही ढवळाढवळाढवळ न करतां तूम्हि ति छापणार हे वाचुन माझे मन अव्यस्त अशा नैपुण्यतामय आनंदाने उन्मळून आले. तुम्हि गोस्ट खूशाल जसीच्या तशि छापा. माझि तुम्हाला अव्याहत पर्वानगि आहे.

माझ्या सौंस्कूत शब्दांच्या वापराबदल दोन शद्ब सांगतो. मि म्हा देवसास्त्री जोशि, ग. त्र्यं. माडगूळकर वगैरे लेखकाच्या वाङ्यांतुन सौंस्कूत शब्द हुडकून काढतो. ते एका वहिंत लीहून ठेवतो. आणी गोस्टींत जशिजसी जागा मिळेल त्याप्रमाने वहितला एक एक शब्द ठेवीत जातो. म्हणून तर माझ्या भाषेला आनी गोस्टीला भारदस्तत्वपणा येतो. कदी कदी या सौंस्कूत शब्दांत मि थोडाफार फरकही करतो. लेखकाला तसे करणे आवश्य आहे असे मला लेखक या नात्यांनीं वाटते. आसो.

सोबत माझा फोटो पाठवित आहे. हा होटगीच्या गावठी फोटोग्राफर कडे काढला नसुन सोलापुरच्या मठपती फोटोग्राफकडे काढला आहे. हा फोटोसुद्धांदोखिल छापा. म्हंजे साला होटगींतल्या लोकांची खात्रि पटेल किं, गोस्ट मिच लिहीलि आहे म्हणून. फोटो छापताना कंपाझेटरला सांगुन केस दीलिपकूमारसारखे डोळ्यापर्यंत आणायला सांगावे. मला ती ष्टाअीला From mind आवडते. कळावे.

आपला,

धोंडुनंदन.

* * *

विभाग ... क्रमांक ... नों. दि. ...

# चकणाचूर.

[ लेखक : धोंडूनंदन अुर्फ मारुती धोंडू बोडके. ]
होटगि. G. I. P. & M. S. M.

माझि बि. ये. चि परिक्षा नूकतिच संपुन गेली होति. संध्याकाळि ... गारं सुटले होते. पेपरही बरे गेले होते. मुंबअीच्या अेस. पी. कालेजांत मी सिकत होतों. आमचे कालेज बोरिबंदरच्या सेजारीच असल्यामूळें बदराचा आणी समूद्राचा देखावा फारच नेत्रपल्लव दीसत होता. संध्याकाळच्या वेळिं मी नेहमी तासन् तास सूर्यास्ताचा देखावा मी बघत बसत असे. सूर्य म्हनजे परमेस्वराचा डोळा. कीति सूरेख आणी चक्रनेमिक्रम अूपमा आहे नाही ही ! आसो.

परिक्षा संपून आमच्या कालेज्याला अुनाळ्याची व्याक्सिनेशन सुरूं झालि म्हनूण मि घरि होटगीला जायला नीघालो. स्टेशनवर तीकिट काडायला गेलो. पण गर्दिच गर्दि होती. म्हनुण मि फस्ट क्लासचे तीकीट काडले. गाडिंत रात्रि मि झोपलो. सकाळी साडे नवाच्या सुमारासला मी होटगीला पोंचलो. होटगी ! माझि जन्मभुमी ! अहाहा ! माझे अंतक:रण अूचमळून आले.

ति ज्वारिचि शेते ! ति वीहिर ! ति मोट ! ते सिवार ! ते घर ! ति प्रेमाचि माणसे ! अहाहा ! सगळे सगळे कीती मांगल्यतामयपूर्ण ! कीति वाच्छल्यतामयपूर्ण !

तो सेतांत राबणारा गंगाप्पा हंचाटे ! अगदि शेतमय होअून गेला आहे. ते कूरकळणी गुरुजी ! वीद्यार्थ्यांना शिकवून शाळामय झाले आहेत. ते गायमहाराज ? गाअीचि सेवा करता करता गोमय होवुन गेले आहेत. तो मुलाण्याचा अब्दुल ! जातिने यौवन असूनहि म्हारुतिला नमस्कार करतो. केव्हडा हा धर्मपरीप्लूतपणा ! सगळे गाव कसे गुण्यागोविंदरावनें आणि शांत चंद्रप्रकाशाच्या चांदण्यातल्या कौमूदीच्या ज्योच्छनेप्रमाणें नांदत होते. खरेच मला नेहमी प्रश्ण पडतो कि, चंद्राला कौमूदि आवडते कि ज्योच्छना ? की आपले चांदणेच आवडते ? होटगीतल्या माणसांचे मन चांदण्यासारके नीर्मळ होते. त्यांच्यातला मळ नीराने धुतला होता. त्यांचे जीवन परीप्लूत

आणी अून्च अशा अुर्वरीत वीचारांनीं भरले होते. त्यांचे जिवन शहरि लोकाप्रमाने अगदिच अूथळ, अथांग नव्हते. त्याचि खोलि सखोल आणी अेकमेवाद्वीतीय होति.

घरातिल प्रेमळ माणसे ? अहाहा ! त्यांचे वर्नण काय काय करावें ? पित्याचि ति धिरगंभिर मुर्ति ! जगांतल्या मांगल्यमयत्वतापणातुन नीर्माण झालेलि ति आाअि ! ते मधुमकरंद चित्तचक्षूचमत्कारिक विलोभनिय भाअू! ति हृदयंगम बहीन ! अहाहा ! काय हे सूख ! इंद्रालाहिसुद्धादेखिल हेवा वाटावा !

अशा रुचीमधूर आणी श्रुतीमनोहर नातेवाईकांचा सहवास कुनाला सूकर वाटनार नाहीं बरे ? हवेंत पाक्षि ऊडावा तसे दीवस उडत होते. दीवस म्हनजे काळरूपि (टाईमरूपी) पतंग. हवारूपी वाऱ्यावर तो उडतच रहाणार. हा चक्राचा नेमीक्रम आनी नीसर्गाचा कार्यक्रमच ( प्रोग्रॅम ) आहे. निसर्गाला कोन अडवनार ? तो दाही दिशा व्यापणारा अष्ट दिक्पाळ आहे. वीश्व व्यापणारा व्यामोह–संमोह आहे. अणुरेनूंतला आत्मज्योत नीरांजन आहे. निसर्ग ! केवडें गूढ आहे ! मानवाच्या बूद्धीला आणि प्रगल्भाला ते न सुटलेले एक अहीनकूलवत बादरायण कोडे आहे. त्याच्यावर वीचार करावा तेव्हडे विपूलच (स्मॉल=थोडे) नीसर्गाचा होऊन गेलेला आगामी काळ कींति आहे आणी येणारा भविष्यकाळ कीती आहे याचा कुणाला तरी पत्ता आहे काय ?

अश्याच एका दिवसात वर्तमानपत्रात ( NUDE–PEPPER ) बि. ए. चा रिझर्ट लागला. माझा नंबर फस्ट क्लासच्या नंबरांत होता. माझि तपच्चर्या फळाला आलि होति. मि हिस्टेरीया आणी इकॉनॉमिक हे वीषय घेवुन परीक्षेमधे बसलो होतो आणी त्यांत मी ऊत्तम तऱ्हेनें अवतीर्ण झालो होतो. वडिलांना आणी आईला श्रुतिमनोहर आणी चारुगात्रगोचर आनद झाला. मागे माझ्या उजव्या पायाच्या अंगठ्याला टायफाईड झाला असता मी फार आजारी होतो. त्यातच दोन्ही कानाला न्यूमोनीया ( दोन्ही कानाला झाल्यामुळे डॉक्टराने तो डबल न्यूमोनिया होता असे सांगीतले. ) झाला होता आणि कमरेला कॅन्सर झाला होता

आणि त्यांतच भरीला भर म्हणुन डाव्या हाताच्या करंगळीला प्रदर झाला होता. अशा प्रकारच्या अनेक दुखण्यातुन मी बरा झाल्यावर आईवडिलांना जो स्वातीसंपूटमौक्तिक आनंद झाला होता, तसलाच नीर्व्याजमुद्दल आनंद रिझर्ट ऐकल्यावर त्याना झाला होता. धाकटि बहिन आनंदाने चर्मचक्षू होऊन नाचु लागलि आणि धाकटा भावू हर्षानंदाने ज्ञानचक्षू होवून बागडू लागला. गावात सगळिकडे पेडेच पेडे वाटले. पहिला पेडा देवाफुडे ठेवला. आणी णमस्कार केला. पास करणारा तो. परिक्षक क्षणमात्र ! वडिलांचें डोळें आनंदाश्रूंशच्या आसवांच्या पाण्यानें भरून आलें. आञिचा कंठ आनंदाच्या हर्षमोदानें फुटेचना. जगांतली दोन महान् दिङ्मूढ आणी प्रत्युत्पन्न मांगल्यत्वें स्तब्द उभी होति. थोड्या वेळानें वडिला मला कूरवाळित म्हणाले, " वीजय, तु नावाप्रमाणे वीजय पैदा केला आहेत. असाच सिकुन मोठा व्हो. तु पाहतोसच, गावातले लोक कीति अडाणि आहेत ते. त्याना सावकार, जमिनदार लूबाडतात. "

" बाबा, बाबा," मि म्हणालो, " हा आज्ञाधारक वीजय काय वाटेल ते करायला तयार आहे. तूम्हि आज्ञा द्या कि मि लगेच तीचे धारक करतोच."

" बाळ अता तु वकिल व्हो आणी गरिब लोकांच्या केशी लढवून त्यांची सावकाराच्या तावडिंतुन सूटका कर. हे पुण्याचे काम आहे. तुझि किर्ती होटगितच काय पण ईकडे टीकेकरवाडीपर्यंत आनी तिकडे तिलाठी-पर्यंत पोंचेल. "

" आनी बाबा, एके दिवसी हा वीजय सोलापूरच्या जील्हा कोर्टात वकिल या नात्याने न्यायाधिशाच्या न्यायावरहि कूरघोडी केल्याचे दीसेल "

" दीसेल बर बाल. माझा तूला आर्शिवाद आहे. " बाबा म्हणाले.

मि मनासी लागलिच ठरवीले किं येल. येल. बि. होऊन वकिलीच्या यशोसागराचे शीखर गाठायचे आणी अडाणिपनामुळे अज्ञानपंकाच्या चिखलाच्या डबक्यामध्ये रूतलेल्या आपल्या विप्लवविहंगम आणी संकट-हृदयंगम ग्राम्यबांधवांना ज्ञानाचे लोणि खायला द्यायचे. खरच, कधि ऊगवेल तो सोन्याचा आणी लोण्याचा दीवस ?

माझि मे महीण्याचि व्हाक्सिनेशन संपलि म्हनूण मी मुंबैला येल अल

त्रि होण्याकर्ता म्हणूनसाठी निघालो. सर्वे मंडळीचा नीरोप आणी चहा घेवुन होटगीच्या स्टेशणवर आलो. ते पवीत्र स्टेशण ! मागे येकदा महाम्ता गांधि मद्रासला गाडिने गेले तेव्हां ति गाडि होटगि स्टेशनातुणच गेलि. बापुजिंच्या पावीत्र्यत्वतामय आणि दोलाचलमय जाण्याने कर्मण्येवाधीकार प्रात्प झालेलि स्टेशणाची सूश्रूत वाग्भट भूमी ! अहाहा !

मी पँटीच्या खीशांत हात घालुन (ऊजव्या खीशात ऊजवा आणी डाव्या खीशामध्ये डावा.) स्टेशणच्या ब्यूटीची सौंदर्यता बघत होतो. स्टेशन अेखाद्या निरलस आनी निरागस अभीष्टचींतनाप्रमाने माणसानी आसेतुहिमाचलच्चल गजबजून गेले होते. मराठि आणी कानडि लोकांनि स्टेशन हौसफूल्ल झाले होते. अेवडयात यम्. यस. यमची अेक गाडी नविणच्च लग्न झालेल्या येकाद्या नूतनं परीणीत नववधुसारखि लाजत लाजत जि. आयपीच्या मागल्या बाजुला अुभि राहीलि. अेखाद्या आगगाडितुन प्यॅसेंजर्स अुतरावेत तसे त्या गाडितुन प्रवासी लोक उतरले. गाडि वीजापुरासुन आलि होति. सगळ्या स्टेशणात "नडीरी नडिरी, लगु नडीदी, मुंत्रअीदु गाडी बंदरू" असे कानडि आवाज घूमु लागले.

येवढ्यात माझ्या कानावर मराटि शब्द पडले. अहाहा ! येवडया कानडिच्या कल्लोळातुन मराठि अैकुन माझे कान उपनिषदाप्रमाणे प्रत्यूत्पन्नमती झाले. धन्य झाले. मि मागे वळुन पाहिले. अेक रुच्रिमधुर श्रृतिमनोहर चतुरंग आणी दीसायला भ्रकुटिभंग आशि यव्वनाने मुसमुसत असलेली तरुण मूलगि होति अहाहा कीति सुंदर! तीचा बहीरंग किति गोरा होता. तीचा तो कटीप्रदेशापर्यंत पोंचनारा कुचसंभार पाहुन तर मि आश्चर्याने संभवनियच्च झालो. खरोखर अीतका लांबलचक, नीकटवर्ती आणी नृत्यमनोहर केशालाप मि कधिच्च पाहीला नव्हता. तीने अस्मानी रंगाचे लाल चुटूक पातळ नेसले होते आणी मोतिया रंगाचे फिकट निळे तलम झांपर घातले होते. तीच्या तलम झंपरमधुन तीचे यव्वनाच्या तारुण्याने पूष्ट झालेले नितंब बाहेर डोकावत होते. तीचे झंपर चोळीटाअीपचे असल्यामूळे तीचि टुमटुमित गोरि पोटरि मन वेधुन घेत होति. कीति सुंदर पोटरि होति तीचि. तीच्या हातात मोहीनि माशिकाचा आंक होता.

मी हातातल्या (माझ्या) हौंस माशीकातलि गोस्ट वाचन्याच्या निमित्या करून मदून मदून तीच्याकडे बघत होतो. *येवढ्यांत तिच्याबरोबरचे ग्रहस्थ मला म्हणाले, " मीष्टर, तुमी महाराष्ट्रिय दीसता. "

" यस् ! " मि म्हणालो.

" छान बर झाल. " ते ग्रहस्थ म्हणाले, " तूम्हाला कुटे जायचय ?"

" बॉम्बे ! " मी अत्तर दीले.

" काय करता आपन ? " त्याने वीचारल.

" मि यंदा अेल येल बिला जानार आहे. यंदाच बि. ये. झालोय. " मि सांगीतले.

" वा छान ! " ते ग्रहस्त म्हणाले, " हि माझि भाचि वीजया. तीपणसुद्धादेखील यंदा बि. ये. झालीय. "

वीजयेने दोम्ही हात जोडून मला अुत्थापन केले. मीहि तीला पुनरुत्थापन केलें. तीच्या अुत्थापनात आणी अभ्यवादनांत कीति शालीन्यत्व आणी सौजन्यता होति ! मि तिला विचारले, " कोनता वीषय होता बि. येला ? "

" हिस्टेरीया आणि अिकॉनॉमी " ति म्हणालि.

" अरे वा ! जमलच मग ! " मी अव्याजमनोहर आणि परभृतप्रभृति द्रुतवीलंबीत सानंद हर्षानें म्हणालो. तीच्या चेहऱ्यावर अभिव्यास आनंदाच्या हिमबिंदूची अष्टपैलु माणकाची लकेर आणी सौदामीनीसारखी बीजली शांतपनाणें वीलसीत करू लागलि. आमाचि दुष्टाद्रष्ट झालि. मनाला मन मीळाले. ऱ्हुदयाला ऱ्हुदय मीळाले. साताजल्मांचि ओळख पटलि. वीजय आणी विजया ! प्रेमाला प्रेम मीळाले. लैलाला मजनु मीळालि. बैजूला बाबरा मीळाली, होनाला बाळा मीळाली. हातिमला ताई मीळाली. हसनला रशीद मिळाली. समुद्राला गंगा मिळाली.

तिने म्हणाली, " तुम्हि मुंबैत कुटे रहाता ? "

" येस पी कालेजच्या रेसीडेंटमध्यें. " मी सांगितले. " पण तूमि कुठे राहता ? " मी वीचारले.

---

* मुखपृष्ठ पहा.

" मि मलबार हीलच्या टेकडीवर. " ति म्हणालि.

" अरे वा ! म्हंजे आमच्या रेसीडेंटपासुन अगदि जवळच की ! " मि सपिंड आनंदाने उद्गमव्याकुल होऊन म्हणालो.

ते ग्रहस्थ म्हणाले, " छान झाल वीजया ! तूला जोडि मीळालि मुंबैपर्यंत. हे पाहा मीस्टर वीजय, आमाचि वीजया सुटीच्यामध्ये मुन्चंडीला आलि होति. आता घरि परत मुंबअिला चाललि आहे. मि कुणि सोबत मीळेल काय हेच बघत होतो. तुम्हि भेटलात बर झाल. आता मि निच्चिंत झालो. तुम्ही दोघे गाडि आल्यावर जा. मि जातो घरी? "

असे म्हनुण ते ग्रहस्थ त्या गजबजलेल्या स्टेशणवर आम्हाला आयताच अेकांतवास देण्यासाठी म्हनुण वीजयेचा नीरोप घेवुन घरी गमन करायला गेले. मी आनि वीजया दोघेच राहिलो. स्टेशनवरहि जंक्शन गर्दि होति. थर्ड क्लासच्या तीसऱ्या वर्गाच्या डब्यात वीजयेचा गुदमरा होअिल म्हनुण मी दोघांचीही फस्ट क्लासचि तीकीटे काडलि. गाडि यायला थोडासा टाअिमिंग होता. म्हणुन मी हॉटेलमधुन हंटले पामरचे येक पाकिट वीकत घेतले आणि त्यांतलि येक शिग्रेट शिलगावलि. देसी सिगरेटीने वक्षस्थळाला आणी फुस्फूसाला त्रास होतो म्हणून मि नेहमि हंटले पामर सिगरेटच वापरतो.

वीजया माझ्याकडे टक लावून दृष्टिक्षेप टाकीत बसलि होति. ती तिच्या डाव्या पायावर तिचा उजवा पाय टाकुन बसलि होति. तिच्या पायाची टोपरी ( पायाचा घुडग्याखालचा भाग ) ओझरति दीसत होती. खरेच्च तीच्या टोपऱ्या कीति मनोज्ञ आणी शार्दुलवीक्रिडीताप्रमाणे परिणतप्रज्ञ होत्या. जनु काही अभीरामाची दुसरी प्रतिमाच.

यंग तरुणीच्या टपोऱ्याकडे असे बघणे बरें न्हवे म्हनूण मि द्रुष्टी फीरवून वसंत रूतूची शोभा पाहू लागलो. ति वसंताचि अर्वणीय शोभा पाहुन मी मुद्गल झालो. अहाहा ! तें निसर्गाचे दर्शन ! अहाहा, ते रुतुदर्शन ! वीजयेलासुद्धादेखील हे रुतुदर्शन घडवावें असे माझ्या मनांत आले—

—पन येवढ्यात तीलाठीच्या बाजुने, मुंबअीला जानारी मदरास मेल येत असल्याचे दीसले. गाडि धाड धाड करित आलि आणी प्लेटफार्म येताच आज्ञाधारक मुलाप्रमाणे थांबलि. तीसऱ्या वर्गाचे माणसे आत

जायला धडपडत होते. त्यांचि ति जिवनाचि धडपड पाहुन जिवो जिवस्य जिवनं या तत्त्ववेत्त्याची खात्रि पटलि. मि हमालाच्या डोक्यावर सामायन देवून पहील्या वर्गात इंटले पामरचे झरोके घेत घेत चढलो. माझ्याबरोबर वीजयापण चढलि. चढताना तीचा ओझरता धक्का मला लागला. माझ्या अंगातुन प्रेमसागराची लकेर चमकुन गेलि. सारे शरीर रोमांचानि पुष्पांकीत झाले. कदाचीत तीच्या पापाच्या मनोऱ्याच्या पायाचा दगड तर मि होणार नाहि ना असी अेक पूसटशी लघूशंका माझ्या मनाला चाटून गेली. परंतू माझे अंतक:रण सश्यश्यामल भारतमातेप्रमाणे सुजलाम आणी सुफलाम होते त्यामुळे मलायजसीतलामच्या या पापाला मी स्थळ दिले नाही.

डब्बा १ ल्या वर्गाचा असल्यामुळे डब्याच्यामध्ये आम्हि दोघेच होतो. बर्थकंट्रोलरला सांगून मि झोपण्याच्या दोन बर्थसुद्धा रीझवड केल्या होत्या.

गाडी सुरूं झालि. होटगि गेलि. थोड्या वेळानें टीकेकरवाडि गेली. सोलापूर आले. मी, सोलापुरात प्रशीद्ध असलेला सोलापुरी जगप्रशीद्ध चीवडा घेतला. आम्हि दोघानि चीवडा खात गप्पा मारित बसलो. चिवड्याची रुचि फारच श्रृतीमनोहर आणी नेत्रदीपक होति. म्हनुण मि पुन्हा दोन रुपयांचा चीवडा घेतला. स्टेशनवरच्या घड्याळांत रात्रिचे आठ वाजले होते. गाडि सूरूं झालि. आमच्या वाड्यीन गप्पा रंगात आल्या. सेक्सपीअर्स आणी बर्नाड शो यांच्या कादंबऱ्यावर खूपच चर्चा केलि. आणी या दोघा लेकखानि अीतक्या कादंबऱ्या लीहुन नाटक मात्र अेकही लीहिले नाहि याबद्दल शंका व्यतीत केलि. तीच्या मते सेक्स पीअर्सच्या कादंबऱ्या स्रेष्ठ होत्या तर माझ्या मते शोच्या. आणी मी तिला तसे पटवुनहि दीले.—' शायलॉक ' आणी ' व्हेनीस ऑफ मर्चेट ' या दोघा लेखकांच्या दोन्ही कादंबऱ्यांचे तौलनीकतामय वीवेचनत्व करून सोदाहरणासहित पटवुन दीले. मग आमचि गाडि मराठी वाड्याकडे वळलि. ( बसलेली गाडि सरळच चाललि होती. ) केशवसुतांना आपल्या कविता पुढे पुढे केशवकुमार या नावाने का लीहाव्या लागल्या यावरहि आम्हि बरेच तर्ककुतर्क केले. लोकमान्य टीळकानि ' गीतारहस्य ' लिहुन आपण ' रहस्य कथा ' ही लिहू शकतो हे ब्रीटीशांना दाखवून

दीले याबद्दल आम्ही त्यांना हात जोडुन अभिनंदन केले. नंतर, ‘ मेन ऑफ मॅन कंट्री ’ या पुस्तकाचे व्यंकटेश माडखोलकरानि भाषांतर केलेल्या ‘ माणदेसी माणसाचे ’ रसग्रहन झाले. माझा हा साहीत्याचा अभ्यूदयोत्तेजीत, नयनगलेल, अघटितघटनापटू आभ्यास पाहुन वीजयाला चंत्रा वाटला.

ती म्हणालि, “ तूमचा साहीत्याचा अभ्यास बराच नितांत रमाणिय दीसतो. ”

“ मि लेकख आसल्यामुळे आहे. ” मी ह्मणालो.

“आय्या ! तूम्ही लेखक आहेत ? तूमचे आडनाव काय ?” वीजयानें आच्चर्याने विस्कळीत होऊन म्हणालि.

“ वीजय केळकर ” मी म्हणालो.

“ आय्या ! सुप्रशिद्ध लघुकथालेकख वीजय केळकर तुम्हिच का ? मला तूमच्या गोस्टि कीत्ति कित्ती आवडतात म्हनूण सांगु ? ”

“ आस्स ? थ्यॅंकू ! ” मी म्हणालो.

“ तूम्हि शीकत असतानाच केवडे मोटे नाव कमावलेत हो ! कमाल आहे बाअी ! ” हे बोलतांना तीचा चेहरा निर्लेप तेजोमय आनदानें उत्फूर्त झाला होता.

ति म्हणाली, “ मि सगळ्या तुमच्या गोस्टि आवडिने वाचते. हॅंसमधालि “ गंगू जा जा ! ” हि गोस्ट, मोहीनितालि, ‘ यमूना ये ये ’ ही गोष्ट, आणी नवल माशिकांतालि, ‘ सरस्वति थांब थांब ’ ही गोस्ट या गोष्टि तर मला फारच नयनरम्य आणी सुगंधीत वाटल्या. ”

आम्हि बोलत आसताना मोहोळ, माढे जावून कूर्डुवाडि काधि आलि याचा पत्ताहि ( ॲड्रेस ) लागला नाहि. पंढरपूर–बारसीचे लोक गर्दि करून आत आले.

वीजया म्हणालि, “ वीजय, तुम्ही अितके विहंगम आणी ऱ्हुदयंगम लीहीता तरी कसे गडे ? तुम्हाला हि सूंदर भाषेचि देणगि परमेश्वराने दिली आहे. तुमचे एक एक शद्ब कसे योग्य असतात. किति जीवनमुद्गल अर्थ त्यात भरलेला असतो ! ”

मी म्हनालो, "त्यासाठि भाषेचा आध्ययनयुक्त आभ्यास करावा लागतो. ष्टडी करावा लागतो.सुद्धलेखण आणी व्याकर्न निट यावे लागते. मराठि,सौंस्कूत, आणी अींग्रजि भाषेवर प्रभूत्वतापणा असावा लागतो. मि या भाषेमधलि शेकडो पुस्तके वाचालि म्हनुण अीतके आकृष्ट मनोदय साहीत्य लीहू शकतो. अनेक पुस्तकांचें अतीशय थोडक्यात सार काढून मि त्यांचा संग्रह केला आहे. त्या संग्रहाचे नांव म्हनुण मी 'अतीसार संग्रहणी' असे ठेवले आहे."

"आय्या कीती गोड नाव आहे !" वीजया मध्येच म्हनाली.

"—तर मि काय सांगत होतो ? जनमनअभीरूचिपकडक गोष्टि लीहीणें हे काहि सोपे काम नाहि. शब्द नूसते नाचवीता, नाचवीता ( डॅन्सिग ) आले पाहीजेत. आता तुम्हाला गंमत दाखवितो हं थोडिसि."

"कसली गम्मत ?" वीजया अिस्मित करीत म्हणाली.

"आमच्या होटगेचाच शीवशरणाप्पा बूचनळ्ळी नांवाच्या अेका जवान तरुण अशा यंग युवकाने लीहिलेलि गोस्ट त्याणे मला वाचायला दिलि आहे. आणी वर सांगीतले कि, हौंसच्या कथावीशेषांकात छापून आनन्याचि व्येवस्था ( म्यानेजमेंट ) करा."

"आहे का ति गोस्ट ताशि ?" वीजयाने प्रुच्चा केलि.

"ही गोस्ट माझ्या हातातच आहे. मी येक प्यारा वाचुनच दाखवीतो. गोस्टिचे नाव आहे "तीचे लुगडे." अेका भाषेचा विरसाल नमूना.

"तीचि म्हाज्यावर लै म्हंजे लै मायंदाळ पिरीत हाय. पन येवा ति मला कश्याचि मिळति न काय , ति पाटलाचि प्वार, अंगान थ्वार, जवानिचा भार, छातिचा उभार. आन् मी ह्यो आसा. हाडकूळा आणी काटकूळा. पर अिच्या भन आयला कायबि होउ द्या. तीच्यासंगच लगीन करिल ह्यो पठ्या गब्रू. तीला चांगल लुगड देअील. खायला बर्पि देअिन. बामनाच्या पोरिवानि गूळूगूळू गूळूगुळु गोष्टि करीन. हूरडा खायला सेता-मंदी घेवूनश्याण जाअिन. मोप मोप मायंदळ पिरेम करीन. इतके करून बि ति मला न्हाअि मिळालि तर थुत् त्यच्यायला या जल्माच्या वरसावऽऽ...."

" अीश्य ! पूरे बाअी ! " वीजया ऊजवा नेत्र आणि नक्र मूरडित म्हणालि, " कुटे तूमच्या अन्योन्य–लावण्य गोष्ठि आणी कुटे ही भीकार द्रुतवीलंबीत आणी भुजंगप्रयात गोष्ट ! शी शि ! सी ! थु: ! "

वीजयेच्या मधूर, मीष्ट आणि गोड सहवासात दौंड स्ठेशण मागे पडून पूणे कधि आले आणी मधूशर्वारिचि गोड रात्र निम्मि कधि सपलि हें कळले नाही कि अज्ञात झाले नाही. नंतर आम्हा दोघाना नीद्रावंति देविने थोपटून थोपटून झोपाविले. मध्येच वार गाऱ्याचि झुळूक आलि. आणी मी जागा झालो. वीजयाच्या अंगावर तीला थंडि वाजु नये म्हणुन मी चादर पांगरली. मी झोपि गेलो. थोड्या वेळानें जागा झालो. तो काय आश्चर्य? ति चादर माझ्या अंगावर होति.

तीला ऊठवीले. म्हणालो, " माझि कीति काळजी घेतेस तु वीजया ? "

" आणी तुम्हि न्हाअी वाटत घेत माझि काजळी ? "

" वीजया. "

" वीजय. "

" तु माझि होसिल का ? "

अहाहा. माझे भाग्य आणी नशीब थोर. तुमच्यासारका महान बुद्धि-मुलभुत लेकख मला पती म्हनुण लाभतो. वीजय मला तूमचि पन्ती म्हनुन घेन्यान मला केवढे मोटेपण वाटते. "

" लग्नाचे ठरले ना ? "

" हे घे वचन. " ति म्हणाली.

तीने मला लग्नाचे वचन देण्यासाठि माझ्या हातात हात दीला तो तीच्या हाताचा शुक्रेंदुवत कर्णमधूर आणी रुचकर स्पर्श पाहून माझ्या चित्ताचा चकोर होऊन गेला. आणी ही जाग्रतावस्था आहे कीं स्वप्नावस्था आहे अशी गोड शंका मनाच्या लोणच्याला चाटुन गेलि. वीजया माझि होणार. तणाणे आणि मनाणें. वीजया-वीजय. वीजय–वीजया. कशि हर्म्य–प्रासादासारखि गगनचुंबि आणी पाताळगामि जोडि आहे.

म. अं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. ...४३४२ नों दि ........ २१
सि. ...ग.ग.... ...



येवडयात मुंबाअी आलि. मी टयाक्सी केलि. तिला घरि पोचवीलें. आणी रेशीडिंटमधी आलो. माझ्या आनंदाला शिमा न्हवति. सगळिकडे मला आणंद दीसत होता. बारीक गोस्टिंतहिदेखील अनंद दीसत होता. सारखे काम करावे असे वाटत होते. काम ! काम ! काम ! अगदि कामुक होवून मी कामदेवाचि अपासना करण्याचे ठरविले. काम-देवाचि अपासना केल्यानेच आपल्या राष्टाचा अुद्दार होणार आहे. लग्न झाल्यावर मी भारतमातेची शेवा करण्याचे ठरवीले आहे देशातल्या प्रत्येक तरुण युवकाने आत्मबलीदान करून आपल्या रक्ताचा भारतमातेच्या कपाळावर कुंकुमटीळक लावुन तीला अखंड सौभाग्यवति केलि पाहीजे. मी तसे ठरवीले.

* * *

दुसरे दीवशी वीजया माझ्याकडे आलि आणी रडत म्हणालि, " वीजय मला क्षमा करा. बाबानि कालच माझे लग्न दुसऱ्या अेका तरुणासि ठरवीले. मी तुमच्यावीशयी खुप सांगितले. पण अैकीनातच. "

असे म्हणून ती माझ्या छातिला टेकून रडू लागलि. मी तो आघात सहन करून आणी तीला धिर देवून त्या तरुणाबरोबर लग्न करण्यास सांगीतले. माझ्या स्वप्नाचा चकणाचुर झाला. वीजया जड पावलाने नीघून गेलि. दूसऱ्याचि होण्याकरीता नीघून गेलि. मी शुन्याकडे बघत तासचे तास घालवले. दुरून कुठुन तरी बाराचे ठोके पडले. आणी माझ्या प्रेमाचेही बाराच वाजले.


" अेक दील के टुकडे अेक हजार हुवे काही अिथे पडले, काहि तिथे पडले " मी गुनगुनू लागलो.

[ संपुर्ण स्वतंत्र गोस्ट ]

* * *

# माझें वृत्तपत्र-वाचन ३

मी वृत्तपत्राचा एक भोक्ता वाचक आहें. वर्तमानपत्र वाचतांना माझी अगदीं ब्रह्मानंदीं टाळी लागते. सकाळीं मी अंथरुणांतून उठायच्या आंतच दोन परोपकारी व्यक्ती माझ्यासाठीं दोन गोष्टी अगदीं तयार ठेवतात. यांपैकीं एक म्हणजे माझी पतिसेवापरायण पत्नी. ती अगोदर उठून चहा करते. (तो स्टोला पंप मारतांना होणारा कांकणांचा किणकिणाट इ०...!) आणि दुसरी व्यक्ति म्हणजे खिडकींतून अथवा फटींतून अजमासानें ( परंतु योगायोगानें बिनचूक ) माझ्या अंगावर वर्तमानपत्र भिरकावणारा पेपरचा ' लाइनवाला ' पोऱ्या.



चहा आणि वर्तमानपत्र यांची चाहूल लागल्यावर मी उठतों. कराग्रावरच्या ( नसलेल्या ) लक्ष्मीला वंदन करतों; आणि कोणाचे तरी चेहरे रामप्रहरींच दृष्टीला पडून दिवस बरा-वाईट जाण्यापेक्षां देवाचें दर्शन चांगलें या हेतूनें मी देवाला नमस्कार करतों. नंतर कोलगेट टूथ पेस्टनें दांत घासून तोंड धुतों. मी नेहमीं कोलगेट टूथपेस्टच वापरतों. कारण ती अधिक मधुर आणि चवदार आहे.

नंतर मी एका हातांत चहाचा कप आणि एका हातांत वर्तमानपत्र या परंपरागत पद्धतीनें घेऊन चहापान आणि वर्तमानपत्र-वाचन सुरू करतों.

मला एकापेक्षां अधिक वर्तमानपत्रें घेणें परवडत नाहीं. आणि खरें सांगायचें म्हणजे एक घेणेंहि परवडत नाहीं. परंतु मराठींतील कोणत्याहि

साहित्य-प्रकारापेक्षां वर्तमानपत्र-प्रकार सर्वांत कमी किंमतीचा आणि जास्त मोबदला देणारा असल्यामुळें मी वर्तमानपत्राचें वाचन अधिक पसंत करतों.

ललित वाङ्मय. गंभीर वाङ्मय किंवा आणि कसलें तरी वाङ्मय यांपेक्षां मला वर्तमानपत्रांतलें वाङ्मय अधिक प्रिय आहे. एखाद्या माणसाच्या जीवावर आधारलेल्या शेंदोनशें पानांच्या कादंबरीच्या चोपड्यापेक्षां वर्तमानपत्र हें नक्कीच श्रेष्ठ आहे. कादंबरीकारांना उगीचच नसल्यांतून असतें निर्माण करून त्यांतून फापटपसारा निर्माण करण्याची संवय असते. कादंबरीकार हे कांहींसे परमेश्वरासारखेच असतात. कांहीं तरी अवडंबर करण्याची दोघानांहि संवय आहे. आतां परमेश्वराचेंच पहा. त्यानें हें जगच केवढें प्रचंड करून ठेवलें आहे ! उगीच केवढा पसारा मांडून ठेवला आहे ! अगदीं देशस्थी खाक्या आहे त्याचा. परंतु या जगांतील असंख्य घडामोडी, वर्तमानपत्रें मात्र चारसहा पानांच्या चिटोऱ्यावर व्यवस्थितपणें देऊं शकतात. हा वर्तमानपत्रांचा केवढा गुण आहे बरें ! वर्तमानपत्रांचा आणखी एक विशेष म्हणजे तीं दररोज कांहीं तरी नवीन नवीन देत असतात. ‘ क्षणे क्षणे यन्नवतामुपैति, तदेव रूपं रमणीयतायाः ’ असें एक सौंदर्याचें लक्षण सांगितलें आहे. जें क्षणाक्षणाला नवीन बातम्या गोळा करतें आणि दिनादिनाला त्या नावीन्यपूर्ण बातम्या वाचकांना देतें त्या वर्तमानपत्राच्या ठायीं सौंदर्य आणि रमणीयता नाहीं असें कोण बरें म्हणेल ?

वर्तमानपत्रांत घडलेल्या बातम्यांबरोबरच न घडलेल्या बातम्याहि अधून मधून येतात. ‘ अगा जें घडलेंचि नाहीं, त्याची वार्ता पुसशी काई ? ’ हा रिकामटेकडा प्रश्न वर्तमानपत्रांना फारसा भेडसावीत नाहीं. कारण मागाहून या न घडलेल्या बातम्यांचा अिन्कार, खुलासा, दुरुस्ती इत्यादि करण्यास आणि त्यामुळें पुन्हा वर्तमानपत्राची जागा भरून काढण्यास उपयोग होतो.

वर्तमानपत्रें हीं परमेश्वराप्रमाणेंच एकदम कांहीं तरी अघटित घटना लोकांपुढें ठेवून सर्वांना चाट करून सोडतात. कालपर्यंत अगदीं नाकासमोर बघून सरळ वहाणारी ब्रह्मपुत्रा नदी एकदम आज दिब्रूगढच्या लोकांची

दाणादाण करून सोडते ही परमेश्वरी घटना जितकी अघटित तितकीच ही बातमीहि एकदम सकाळीं उठल्याबरोबर अघटित वाटते.

वृत्तव्यवसायांतील प्रत्येक व्यक्ति आणि संस्था मला देवाइतकी आदरणीय वाटते. वृत्तवितरण करणाऱ्या संस्थाच घ्या. ही संस्था आपल्याकडे पूर्वीं-पासूनच आहे. नारद हा आद्य 'रॉयटर' होय. त्याच्याकडे तिन्ही लोकांतील बातम्यांची मोनॉपली होती. त्यानंतर संजय. परंतु संजय हा कांहीं प्रोफेशनल (धंदेवाईक) रिपोर्टर नव्हता. भारतीय युद्धापुरती त्याची टेंपररी नेमणूक झाली होती. आजचे नारद आणि संजय म्हणजे, 'रॉयटर', 'पी. टी. आय.' 'हिं. स.' प्रभृति आहेत. एकाच वेळीं कोरिया, इंडोचायना (व्हीएटनाम, व्हीएटमिन्ह, बाओदाई, दि एन् बी एन् (गट्टी) फू, हो चि मिन्ह इत्यादि चमत्कारिक शब्दांसह), काश्मीर, इसराइल, माऊमाऊ, ग्वाटेमाला, सुवेझ, फ्रेंचभारत, म्लेंच्छभारत, फिरंगी-भारत इत्यादि ठिकाणचीं विविध लहान मोठीं युद्धें, लढाया, हल्ले, चकमकी, झकाझकी सारख्याच सफाईनें आणि अधिकृतपणें देणारे हे आधुनिक संजय पाहिले म्हणजे, एकाच युद्धाचें दळण दळीत बसणारा तो ओरिजिनल संजय अगदींच फिका वाटूं लागतो. नारदहि तसा अष्टपैलु बातमीदार होता असें म्हणतां येणार नाहीं. तो फक्त भांडणांच्याच बातम्या पुरवीत होता; आणि त्यांतूनच अधिक भांडणांच्या बातम्या निर्माण करीत होता. हा अगदींच एकांगीपणा झाला.

तेंच हल्लींच्या वृत्तवितरण संस्थांचे पहा. अनें बबर चढाई केल्याची बातमी ते जेवढ्या आवेशानें देतील तेवढ्याच जोरानें ते अचा बशीं झालेला समझोताहि देतील. त्यांना फक्त बातमी पाहिजे असते. बातमीकडे आणि जिच्यामुळें बातमी घडते त्या सुघटनेकडे अथवा दुर्घटनेकडे अगदीं, 'सुखदुःखे समे कृत्वा' अशा भूमिकेंतून पहाणारे हे वृत्तवितरक म्हणजे गीतेंत वर्णन केलेले स्थितप्रज्ञ होत. कसल्याहि संकटांत जावोत हे बातमीदार 'स्वे स्वे कर्मणि रत' असे असतात. बातम्या गोळा करायच्या आणि त्या दशदिशांना वाटून टाकायच्या हा त्यांचा बाणा. केवढीं थोर माणसें आहेत हीं !

वृत्तपत्र व्यवसायांत जिच्याविषयीं मला नितांत आदर वाटतो ती व्यक्ति म्हणजे संपादक ही होय. सर्वज्ञतेच्या बाबतींत, मला वाटतें परमेश्वरानंतर संपादकाचाच नंबर लागेल. संपादकाला अगम्य असा विषयच नाहीं, याची खात्री दररोजच्या अग्रलेखावरून पटतेच. वर्षाच्या तीनशें पासष्ट दिवसांत, तीनशें पासष्ट विषयांवर (कधीं कधीं एकाच दिवशीं दोन विषयांवर) आणि त्याला गुणिले त्याच्या नोकरीचीं वर्षें इतक्या विषयांवर विद्वत्ताप्रचुर अग्रलेख लिहिणारा संपादक पाहिल्यावर, उत्तर रामचरित्रांतील ऋषिकुमारांनीं अश्वमेध यज्ञाचा घोडा पाहिल्यावर, "'घोडा घोडा' म्हणतात तो हाच काय?" अशी एकमेकास पृच्छा केली, त्याचप्रमाणें, "'बृहस्पति बृहस्पति' म्हणतात तो म्हणजेच संपादक काय?" अशी मी स्वतःलाच पृच्छा करतों.

संपादकाला अग्रलेख लिहायला विषयाचें बंधनच नाहीं. बरें, ते अग्रलेख साधेसुधे नसतात. त्यांत जनतेला मार्गदर्शन केलेलें असतें, आक्रमक राष्ट्रांना त्यांत उपदेश (किंवा 'समज') केलेला असतो. (आणि दुसरे दिवशीं दुरुस्ती, तिसरे दिवशीं खुलासा आणि चौथे दिवशीं अधिक खुलाशाच्या नांवाखालीं जास्तींत जास्त गुंतागुंत अशी चार दिवसांची जागा भरून काढण्याची सोयहि या अग्रलेखांत कांहीं कांहीं संपादक धोरणीपणानें करून ठेवतात.)

कोणतीहि अवघड समस्या असो, संपादकाचा तीवर सल्ला नाहीं असें कधींच होत नाहीं. इंडोचायनाचा प्रश्न चौदाव्या अक्षवृत्तावर सोडवावा कीं, अठराव्या? ग्वाटेमाला या टिचभर राष्ट्राच्या बंडखोरपणाला आळा कसा घालावा? कम्युनिस्ट विरोधाची कावीळ झालेल्या मॅकार्थीला कसा आवरावा? सालाझारनें गोव्याचा हक्क सोडणें कसें निकडीचें आहे? संयुक्त महाराष्ट्र होणें कां आवश्यक आहे? (अग्रलेखाला विषय सुचला नाहीं कीं या विषयावर अग्रलेख आलाच म्हणून समजावें.) मुंबई कोणाची? दिब्रूगढची वारंवार पुरामुळें होणारी हानि कशी टळेल? जोमो केन्याटोचें भवितव्य काय? देशी कापडधंद्याचें कसें होईल? घोंगड्यांचा समावेश ग्रामोद्योगांत कां करूं नये? अनुच्चारित अनुस्वारांना ठेवावें कीं हाकलावें?

मधमाशा पाळणाऱ्यांची दुरवस्था कशी टळेल? राजस्थानमधील वाळवंट लागवडीस आणल्यास तिकडचा अन्नाचा प्रश्न (चुटकीसरसा) कसा सुटेल? मालेन्काव् कोठें चुकला आणि आयसेन हावर कसा हुकला? मराठी दुसरीचें अंकगणित बाजारांत कधीं येणार? शिवाजीकालीन मराठा, लोकांच्या खानदानी रहाणीचा कोल्हापूरच्या मराठ्यांवर झालेला संस्कार, नार्वेकर कुटुंबें मूळचीं नॉर्वे देशांतील आहेत काय? ठाण्याच्या टांगे-वाल्यांनीं टांग्याला दोन घोडे जुंपणें अवश्य आहे काय? फिलिपाईन बेटांनीं ग्रीनलंडवर चढाई केली, आणि या बाबतींत अमेरिकेनें तटस्थ धोरण स्वीकारलें तर भारतानें इंडोनेशियाच्या सहकार्यानें आणि ब्रह्म-देशाच्या सदिच्छेनें चढाई थांबविणें कसें निकडीचें आहे? इत्यादि असंख्य विषयांवर आणि समस्यांवर दररोज विद्वत्ताप्रचुर अग्रलेख लिहिणें म्हणजे काय लहानसहान गोष्ट झाली काय? कांहीं कांहीं संपादक अग्रलेखांतून जे 'अ' मोल सल्ले देत असतात ते जर त्या त्या संबंधित व्यक्तींनीं वाचले आणि त्याप्रमाणें वागायचें ठरविलें तर जगाला एकदम निराळें वळण लागून सर्वत्र आबादी आबाद झाल्याचें दृश्य दिसेल. रशिया, इंग्लंड, अमेरिका, चीन, जपान, जर्मनी इत्यादि देशांचें आणि त्याचप्रमाणें बाकीच्या जगाचें दुर्दैव कीं, त्या त्या देशांमधील पुढाऱ्यांना आणि प्रकाश-कांना मराठी भाषा येत नाहीं. नाहींतर किती चांगलें झालें असतें! माझ्या एका स्वप्नांत तर मालेन्कॉव्ह, चर्चिल आणि आयसेन हॉवर हे तिघेहि चक्क एका मराठी अग्रलेखावर अस्खलित मराठीमध्यें गंभीरपणें चर्चा करीत होते. ते रोज सकाळीं मराठींतले अग्रलेख वाचायचे आणि त्याप्रमाणें त्या दिवसाचा आपापल्या देशांतील राज्यकारभार चालवायचे. किती 'मराठी पण मधुर' स्वप्न आहे नाहीं? असो. तर तात्पर्य काय, हे मराठी अग्रलेख असे बहुमोलाचे असतात.

हे अग्रलेख मी दररोज वाचतों. (शप्पत!) त्यांत प्रचलित विषयां-वरचे विद्वत्ताप्रचुर लिखाण (दुरुस्तीसाठीं करून ठेवलेल्या चुकांसह) असतें. तें मी पाठ करतों; आणि माझ्या परिचितांमध्यें ते सर्व विचार माझेच आहेत अशा थाटांत सांगून टाकतों. (माझे मित्र–किंवा कोणाचेहि

अग्रलेखाच्या वाटेला कधीं जात नसतात. ) त्यामुळें माझ्या परिचितांमध्यें माझ्या सर्वगामी ज्ञानाविषयीं केवढा दबदबा आहे! (—आणि माझ्या अज्ञानाविषयीं त्यांचें केवढें अज्ञान आहे!)

अग्रलेखाच्या टाळक्यावर असलेलीं ब्रीदवचनेंहि वाचण्याचा मला नाद आहे. बहुधा तीं कोणत्या तरी संस्कृत श्लोकाचे चतकोर तुकडे असतात. या ब्रीदवचनांचा त्या त्या वर्तमानपत्राच्या धंद्याशीं आणि धोरणाशीं काय संबंध आहे हें अद्यापि मला समजलेलें नाहीं. कांहीं वर्तमानपत्रांतून, या वचनांच्याहि वरच्या बाजूला, "अमुक तमुक होई-पर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाहीं!" अशी घोर प्रतिज्ञा गेलीं थोडीं वर्षें छापून येत आहे. यांतील 'स्वस्थ बसणार नाहीं' याचा बोध अजूनहि मला झाला नाहीं. स्वस्थ बसणार नाहीं म्हणजे, रोज ही प्रतिज्ञा छापीत राहणार असा अर्थ घ्यायचा कीं काय? आणि प्रतिज्ञा रोज केवळ छापीत रहाण्यानेंच तिची क्रियाशीलता व्यक्त होते काय?

बातम्या वाचतांना मी चौकटींतल्या बातम्या अगोदर वाचतों. एका बाईला ( अर्थात् दूरच्या कोठल्या तरी गांवीं ) एक मुलगा झाला असून त्याला अग्नीप्रमाणें दोन तोंडें असून विष्णूप्रमाणें चार हात आहेत" असल्या बातम्यांपासून ते पुढाऱ्यांच्या भाषणांतील ( नसलेल्या ) विनोदी वाक्यांपर्यंत चौकटींतील बातम्या असतात. बऱ्याच वेळां चौकटींतील बातम्यांत कल्पकता आढळून येते. इतकेंच नव्हे तर एखाद्या कथेला किंवा लेखाला जन्म देऊं शकणारें असें कांहीं तरी त्या बातमींत सांपडतें. अशा चौकटींतील बातम्यांचा कथेसाठीं किंवा लेखासाठीं उपयोग करून घेणारा योजक लेखक मात्र पाहिजे. माझें स्वतःचेंच उदाहरण घ्या ना. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं मतदानासंबंधींच्या गंमतीच्या बातम्या दररोज वर्तमानपत्रांत चौकटीमध्यें छापून येत होत्या. मीं त्या वाचल्या वाचल्या आणि सरळ एके दिवशीं त्यांचाच लेख बनवून टाकला. ज्या वर्तमानपत्रांतून मीं या बातम्या वा ( वें ) चल्या होत्या त्याच वर्तमानपत्रांत तो लेख छापून आला. चौकटींतील बातम्यांत शोध, बोध किंवा विनोद यांपैकीं कांहीं तरी नक्की सांपडतें.

वर्तमानपत्र वाचतांना मी त्याच्याशीं एकरूप होऊन वाचतों. दुःखाच्या बातम्या, सुखाच्या बातम्या, महत्त्वाच्या बातम्या, फालतू बातम्या सगळ्याच प्रकारच्या बातम्या, मी इतरांप्रमाणें अगदीं निर्विकारपणें वाचीत नाहीं.—म्हणजे मला तसें वाचणें जमतच नाहीं. त्या त्या बातमीस अनुसरून माझ्या भावना हेलावतात, आणि त्याप्रमाणें मी मनांतल्या मनांत अनुरूप वाक्यें उच्चारतों. उदाहरणार्थ, गोया पोया हा खलाशी गेल्या वर्षीं इतरांचे प्राण वांचविण्याचें कर्तव्य करीत असतांना स्वतः बुडून मेला ही बातमी वाचतांना माझें हृदय भरून आलें. मी वाचतां वाचतांच त्या बातमीला वंदन करून अर्धा क्षण मान खालीं केली. मनांतल्या मनांत परमेश्वराला प्रार्थना केली कीं, " हे परमेश्वरा, गोया पोयाला सद्गति दे ! "

—आणि दीव, दमण, गोवें इत्यादि भाग जेव्हां आझाद सैनिक जिंकू लागले तेव्हां माझी छाती काय पण फुगून यायची ! मी त्या शूरांना वर्तमानपत्रावरच मानवंदना देऊं लागलों. मनांतल्या मनांत, " हे परमेश्वरा, रशियाच्या ' झारा ' पेक्षांहि ' साला ' असलेल्या सालाझाराचा ( कोटी कशी मस्तपैकीं भुक्कड आहे नाहीं ? ) जाम नायनाट करून टाक. " अशी प्रार्थना करूं लागलों.

संयुक्त महाराष्ट्राबद्दल किंवा मुंबईच्या प्रश्नाबद्दल विरोधी असे कोणाचे उद्गार वर्तमानपत्रांत वाचले कीं, मी त्या व्यक्तीवर मनांतून असा संतापतों कीं बस्स ! मनांतल्या मनांत परमेश्वरास म्हणतों कीं, ' हे परमेश्वरा, असल्या लोकांचा तू लगेच बंदोबस्त करून टाक बघू ! आणि अशा लोकांच्या नाकावर टिच्चून संयुक्त महाराष्ट्राच्या हद्दी पूर्वेस कलकत्त्यापर्यंत, पश्चिमेस द्वारकेपर्यंत, उत्तरेस श्रीनगरपर्यंत आणि दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत वाढवून टाक."

कोणत्या तरी जागतिक स्पर्धेंत एखाद्या महाराष्ट्रीयानें बहुमान मिळविला, किंवा एखाद्या अत्यंत महत्त्वाच्या जागेवर महाराष्ट्रीय मनुष्याची नेमणूक झाली असल्याची बातमी मीं वर्तमानपत्रांत वाचली कीं, माझें हृदय कसें उचंबळून येतें ! मी मनांत म्हणतों, " श्री–ज्ञानेश्वरायनमः, छत्रपति शिवाजी महाराजायनमः, महाराष्ट्रायनमः " (–आणि हा महाराष्ट्रीय

मनुष्य जर देशस्थ कृष्णयजुर्वेदी आपस्तंब असून तैत्तिरीय शाखेचा त्रिप्रवरान्वित कण्वस गोत्रीय ब्राह्मण ( रंगानें माझ्याइतका काळा ) असेल तर माझी छाती इतकी अभिमानानें भरून येईल कीं, विचारूं नका. परंतु वर्तमानपत्रवाले जातीचीं इतकीं डीटेल्स् देत नसल्यांमुळें माझा नाइलाज होतो. )

ग्रह्यसंस्काराच्या बातम्या वाचल्या कीं, मी परमेश्वरास प्रार्थना करतों, "या सर्वांना सद्गति दे." आणि मग मी क्षणभर स्तब्धता पाळतों.

फांशीच्या शिक्षेची बातमी वाचल्यावर मी सद्गदित होऊन जातों, आणि मनांतून परमेश्वरास प्रार्थना करतों, "परमेश्वरा, मानवांच्या ठायीं असलेल्या अमंगळ गोष्टींचा नाश करून सर्वांना अगदीं सोज्ज्वळ कर." असें म्हटल्यानंतर, "जें खळांची संकटी सांडो। तयां सत्कर्मीं रती वाढो। भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें ॥" अशी ज्ञानेश्वरींतील पसायदानाची ओवी म्हणतों.

दारूच्या भट्ट्या पकडल्याच्या बातम्या वाचल्या कीं, माझें अंतःकरण भडभडून येतें, आणि माणसें कधीं सुधारणार या चिंतेनें मन व्याकुळ होतें.

आमच्या पंढरपुरांतील बातम्या वर्तमानपत्रामध्यें आल्या कीं, मी अगोदर त्या बातमीला नमस्कार करतों; ती बातमी विठोबाच्या तसबिरीला नैवेद्य दाखवितात तशी दाखवितों आणि 'विठ्ठलाय नमः' असें म्हणूनच ती बातमी वाचतों. किती झालें तरी क्षेत्रांतील बातमी ती. आणि त्यांतूनहि ती माझ्या गांवची. तेव्हां एवढा विधि झालाच पाहिजे.

गरिबांनीं दाखविलेल्या प्रामाणिकपणासंबंधींच्या बातम्या वाचल्यावर माझें ऊर भरून येतें, आणि मी 'खाळाखळ्यैश्च वै खलु' असें स्वतःच रचलेलें निरर्थक संस्कृतछाप वाक्य मनांत म्हणतों. माझें मन आनंदातिशयानें, राष्ट्रभक्तीनें किंवा अशाच उत्कट भावनेनें उचंबळून आलें कीं, मी 'खाळाखळ्यैश्च वै खलु' असें मनांत म्हणतों. तसें म्हटलें म्हणजे मला बरें वाटतें. हें वाचून तुम्हीं मला भंपक म्हणाल. म्हणा पाहिजे तर. परंतु मी तसें म्हणत असतों त्याला काय करणार?

कांहीं कांहीं वृत्तपत्रीय बातम्या अशा असतात कीं, त्या नेहमीं छापून

येतात परंतु त्यांचें मूळ विसरल्यामुळें किंवा अगदीं पहिल्यादां जेव्हां ती बातमी छापून आलेली असते तेव्हां अनवधानानें ती वाचायची राहिल्या-मुळें पुढें तीसंबंधानें येणाऱ्या बातम्या पूर्वसंदर्भाच्या अभावीं नीट समजेनाशा होतात. दररोज त्याच विषयावरच्या बातम्या वाचूनहि त्यांचें मूळ कारण कोणतें हें माहीत नसल्यामुळें तें वाचन पोकळ ठरतें. या बाबतींतलें एक प्रसिद्ध उदाहरण देतों, म्हणजे मला काय म्हणायचें आहे हें अधिक स्पष्ट होईल.

व्हीएटनाम, व्हीएटमिन्ह ही भानगड आज नाहीं म्हटलें तरी गेलीं पांच वर्षें जवळ जवळ दररोज छापून येते. मीहि इतर वाचकांप्रमाणें व्हीएटनामी बातमी, परवाचें अज्ञान काल जमेला धरून आणि कालचें अज्ञान आज जमेला धरून वाचीत असतों. आतां तुम्ही लोक अगदीं खरें सांगा हं. रोज वर्तमानपत्र नियमानें वाचणारे असे कितीजण व्हीएटनामचें मूळ कारण सांगूं शकतील ? व्हीएटनाम हा इंडोचायनामधील अेक भाग आहे हें मला अगदीं अलीकडे म्हणजे ही लढाई थांबतां थांबतां कळलें. व्हीएटमिन्हांचे हल्ले कां होतात आणि फ्रेंच चढाई कां करतात हें मला दररोज वर्तमानपत्र वाचूनहि कळलें नाहीं. दि एन बी एन् फू पहिल्यांदां कोणाकडे होतें आणि पाडाव झाल्यावर कोणाकडे गेलें हें मी पुन्हा विसरून गेलों. बाओदाई कोणाच्या वतीनें वाटाघाटी करीत होता हें मला अजूनहि (शप्पत) माहीत नाहीं. हो चि मिन्ह हा कोणत्या पक्षाचा आहे या बाबतींत मी अजूनहि अज्ञानांतच आहें. परंतु मला माझ्या अज्ञानांतहि एक प्रकारचें आंतरिक समाधान वाटतें कीं, माझ्यासारखे अनेक वाचक असल्या बाबतींत माझ्याइतकेच ( स्त्रिया कांकणभर जास्तच ) अज्ञ आहेत. कांहींची तर माझ्यावर कडी आहे. मी माझ्या एका मित्राला सहज ( म्हणजे मुद्दाम ) म्हटलें, " अरे काल ' बाओदाई ' हा ज्वालामुखी पर्वत जागृत होऊन स्फोट झाला आणि त्यामुळें ग्रीनलंडमधले लक्षावधि लोक निराश्रित झाले. आणि त्यांतच दुसरें संकट म्हणजे- दि एन बी एन फू या नदीला महापूर येऊन अनेक गांवं वाहून गेलीं. " तेव्हां तो मित्र महानिसर्गापत्तींनीं स्तिमित होऊन हळहळला. बिचाऱ्याला वरील नांवें हीं ज्वालामुखीचीं

आणि नदीचीं आहेत असेंच खरोखर वाटलें. त्याचबरोबर ग्रीनलंडची लोकसंख्या लक्षावधि नसून कांहीं हजारच आहे आणि तेथील नद्यांना गांवें वाहून जाण्याइतका पूर येत नाहीं ( कारण तेथें नेहमीं बर्फच असतो ) हेंहि त्याला माहीत नव्हतें हें मला कळून आलें. असलें हें महाभयंकर अज्ञान पाहिल्यावर माझें अज्ञान थोडें वरच्या पातळीवरचें आहे याबद्दल मला समाधान वाटलें. ( तसा मी समाधानी आहें. पहा : माझा चेहरा. )

निरनिराळ्या जागतिक संघटना किंवा वड्या राष्ट्रांनीं बोलाविलेल्या परिषदा यांचीं संक्षिप्त रूपें लक्षांत ठेवतां ठेवतां किंवा मुळांत तीं कशाचीं संक्षिप्त रूपें आहेत हें कळतां कळतां माझी फारच त्रेधातिरपिट उडते. ‘ युनो ’ हें कशाचें संक्षित रूप आहे हें मात्र मला नक्की माहीत आहे. ( ‘ युनियन ऑफ नॅशनल ऑफिसर्स ’ याचें हें संक्षिप्त रूप आहे कीं नाहीं बोला ? ) पुढें पुढें ‘ युनेस्को, ’ ‘ इलो, ’ ‘ व्हू, ’ ‘ नॅटो, ’ ‘ सीटो ’ असलीं वाटेल तसलीं संक्षित रूपें येऊं लागलीं आणि मी तीं वाचून बुचकळ्यांत पडूं लागलों. ‘ लोकार्नो करार ’ हें काय त्रांगडें होतें हें मला कळलेंच नाहीं. हा करार मध्येंच कोठून उपटला आणि एकाएकीं कोठें गडप झाला कोणास ठाऊक ?

इराणच्या तेलाचें लेकटें कसें निर्माण झालें ? जॉर्डनचें म्हणणें काय ? सौदे अरेबिया आणि इस्राइल यांचे संबंध कां बरे नाहींत ? पख्तुन लोक कोण आणि त्यांना पख्तुनिस्तान कोठें पाहिजे ? माऊ माऊ चळवळ आफ्रिकेंत नेमकी कोठें आहे ? तेलासंबंधींच्या बातम्या ‘ तेल अवीव ’ मधूनच कशा तयार होतात ? फ्रान्सचीं मंत्रिमंडळें धडाधड कशीं कोसळतात ? ट्रूमन आणि आयसेनहॉवर यांच्यापैकीं ‘ डेमॉक्रेटिक ’ पक्षाचा कोण आहे आणि ‘ रिपब्लिक ’ पक्षाचा कोण आहे ? धुळें आणि जळगांव या दोन गांवांपैकीं कोणतें गांव पश्चिम खानदेशचें जिल्ह्याचें ठिकाण आहे आणि कोणतें गांव पूर्व खानदेशचें जिल्ह्याचें ठिकाण आहे ? अन्नमलाई हें ( खाद्य-पदार्थांची आठवण करून देणारें ) विद्यापीठ कोठें आहे ? कोर्टातर्फे प्रसिद्ध होणाऱ्या नोटीशींत कर्ता आणि क्रियापद कोठें असतात ? मराठी भाषा न समजणाऱ्या इंग्लंड, अमेरिका, रशियाप्रभृति देशांतील पंतप्रधानांना आणि

अध्यक्षांना, संपादक अग्रलेखांतून कां अिशारे आणि सल्ले देतात? इत्यादि गोष्टी रोज वर्तमानपत्र वाचूनहि मला माहीत नाहींत, हें आश्चर्यच नव्हे काय? मात्र याहि बाबतींत मला मनोमय खात्री आहे कीं, बऱ्याच नियमित *वाचकांनाहि माझ्या पंक्तीला बसण्याचा बहुमान मिळेल.*

*वर्तमानपत्र वाचतांना मला संपूर्णपणें अगम्य असलेला* एक भाग म्हणजे त्यांत येणारे वायदेबाजार, बाजारभाव, बुलियन इत्यादि होय. 'टाटा ऑर्डिनरीनें उच्चांक गांठला,' 'चांदी नरम,' 'सोने वायदा ८०-८०,' 'टाटा ऑर्डिनरीनें खाजगींत अखेर २२६–८–०,' 'अळशी तयार २२–१२,' 'कापूस आर्. सी. पी. भाव ६८२–८१ ६६० रु.' 'शिवराजपूर ६३–८, ६३–१२, ६४–८, ६३–८,' 'कपाशी गडगडली,' 'अळशी मंद' इत्यादि पारिभाषिक आकडे आणि भाषा मला कधींच समजत नाहीं. 'खाजगींत अखेर' म्हणजे काय कोणास ठाऊक? 'सोने वायदा' म्हणजे काय हेंहि मला कधीं कळलें नाहीं. आणि 'अळशी मंद' म्हणजे काय हें तरी कोणा लेकाला कळतेय? त्याचप्रमाणें प्रत्येक वस्तूच्या अथवा शेअरच्यापुढें असणारे आंकडे प्रत्येक तोळा, मण, टन यांचे आहेत कीं, रुपयांचे आहेत याचा शोध मला कधींच लागला नाहीं. तरीहि मी दररोज या सदरावरून नजर फिरवतोंच. (बंदा एक आणा टाकून पेपर विकत घेतलेला असतो; तो पुरेपूर वाचून काढलाच पाहिजे. कळो अथवा न कळो. एक आण्याची वसुली तरी झाली पाहिजे.) मला वाटतें माझ्याप्रमाणें असंख्य सर्वसामान्य वाचकांना या सदरांतलें फारसें कळत नसावें.

मात्र सर्वसामान्य वाचकांना कळणारे परंतु इतकीं वर्षें मुंबईत राहूनहि मला न कळणारे असे आंकडेहि वर्तमानपत्रांत दररोज येतात; आणि हे म्हणजे अमेरिकन कापसाचे. यांवर जुगार खेळला जातो हें सु (कु) विख्यातच आहे; परंतु मला अजूनहि हे आंकडे खेळण्याचा विधि काय असतो हें देवाशपथ कळलेलें नाहीं. या आंकड्यांचें काय करायचें, जुगारावर लावायचे पैसे कोणत्या महापुरुषाच्या हवालीं करायचे आणि आपलें नशीब कसें उघडायचें (किंवा उघडें पाडायचें) हें माझ्यासारख्या कर्मदरिद्र्याला

अनुक्रम ३३
आ. वा.
...१५०
दि. ९-७६
शाखा

कळलें नाहीं. जाऊं द्या. त्या वाममार्गाला मी जात नाहीं हेंच उलट ठीक आहे.

वर्तमानपत्रांतील जाहिराती वाचण्याचा मला दांडगा नाद आहे. बिचारे एवढे पैसे भरून जाहिराती देतात तर फुकटचें वाचायला काय जातें? बेंगाल्ळ मराठीपासून चमत्कारिक मराठीपर्यंत सर्व प्रकारच्या मराठीचे नमुने जाहिरातींतून वाचायला मिळतात.

वर्तमानपत्राच्या एकाच स्तंभांत 'संतति-नियमनाच्या उपकरणां'ची आणि 'वीर्योत्पादक औषधां'ची जाहिरात वाचून मला गंमतच वाटते. तसेंच 'पाळी न चुकण्या'ची आणि 'पाळी चुकविण्याची'' अशा जाहिराती शेजारीं शेजारीं वाचून मी वर्तमानपत्रवाल्यांच्या योजकतेनें चाट पडलों आहें.

याशिवाय भूत–वर्तमान–भविष्य जाणणाऱ्या आणि एका ताईतावर सबंध आयुष्याचें कोटकल्याण करणाऱ्या द्रष्ट्या 'प्रोफेसरां'च्या जाहिराती —('एक हिंदु,' 'तुमची भगिनी,' 'एक स्त्री,' 'कलावतीबाई,' 'गुणवंतीबाई' इत्यादि मोघम व्यक्तींच्या स्वानुभवि (?) अभिप्रायांसह) वाचून आपल्या देशांत मूर्ख लोक बरेच असल्यामुळें त्यांच्याकडून या शहाण्यांचेंच कसें कोटकल्याण होतें याची खात्री पटते.

वरील पद्धतीच्या जाहिरातींच्याच बहिणी म्हणजे अलीगढ-अमृतसरच्या केवळ पोस्टबॉक्स नंबरचा पत्ता असलेल्या जाहिराती. या प्रकारच्या जाहिराती वाचून माझी करमणूक होते.

आतां थोडा कंसांतील मजकूर लिहितों. खाजगी आवाजांत वाचा. मी जेव्हां पंधरा सोळा वर्षांचा होतों तेव्हां मला 'तें तसलें' अस्फुट कळूं लागलें होतें; आणि या बाबतींतलें कांहीं तरी जास्त जास्त कळावें अशी न कळत, मधुर जिज्ञासाहि माझ्या मनांत निर्माण होत होती. अशा मानसिक अवस्थेंत आणि वयांत असतांना मला, सचित्र तंग चोळ्यांची जाहिरात वाचण्याची आणि पहाण्याची संवय (म्हणजेच खोड) लागली होती. शिवाय जोडीला 'मदनमस्तपाका'चे गुणधर्महि, केवळ त्यांतील चावट वाटणाऱ्या मजकुरामुळें वाचावेसें वाटे. अर्थात् हें सारें थोडे दिवसच

टिकलें. पुढें मला तसल्या वाचनांत तथ्य वाटेनासें झालें. खालीपीली प्रकृतीची खराबी आणि मानसिक अधःपात !

' घरकामाला बाई पाहिजे ' या सदराखालीं ( किंवा सबबीखालीं ) लग्नाचें स्थळ जमविणाऱ्या जाहिराती वाचल्या म्हणजे मला गंमतच वाटते. " स्वयंपाकाला बाई पाहिजे. विधवा चालेल. मुलाबाळांचा व्याप नसावा. वय २८ चे आंत असावें. अव्यंग आणि ब्राह्मणांतील कोणत्याहि पोट-जातींची ( किंवा आपल्याला पाहिजे त्या जातींची ) चालेल. " ही किंवा असली जाहिरात वाचली म्हणजे या जाहिरातदारांना बाई पाहिजे कीं बाईल पाहिजे हें सहज कळतें.

" पेइंग गेस्ट पाहिजे. नोकरी करणाऱ्या तरुण ब्राह्मणास ( किंवा अन्य योग्य जातींचा ) योग्य मोबदला घेऊन घरीं ठेवून घेण्यांत येईल. " ही जाहिरात वाचली कीं, कां कोणास ठाऊक, सर्वांत आधीं ती जाहिरात देणाऱ्या सद्‌गृहस्थाची लग्नाच्या बाजारांत न खपणारी ( आणि बापाच्या डोळ्यामध्यें खुपणारी ) वयांत आलेली म्हणजेच वयाबाहेर गेलेली चकणी किंवा अन्य व्यंग असलेली मुलगी माझ्या डोळ्यांसमोर येते. तो गरजू तरुण पेइंग गेस्ट म्हणून घरांत रहायला आला कीं, आपल्या मुलीला त्याच्या तैनातीसाठीं ठेवायचें आणि हळू हळू त्याला (बिच्च्याऱ्याला) त्या मुलीच्या प्रेमांत ( तोंडघशीं ) पाडायचें अशा डावानें ही जाहिरात दिली जात असावी अशी शंका मला नेहमी येत असते. नाहींतर हल्लींच्या दिवसांत असे पैसे देऊन जाहिरात करून कोणता माणूस आपल्या कुटुंबवत्सल घरांत परक्या तरुणास ठेवून घेईल ? येथें ' आंतरः कोऽपि हेतुः ' असलाच पाहिजे.

चित्रपटांच्या जाहिराती मी जेवढ्यास तेवढ्याच वाचतों. त्यांचें तंत्र आतां मला पाठ झालेलें आहे. कसलाहि भिकार हिंदी चित्रपट असो, माहीत असलेलीं सगळीं चांगलीं विशेषणें लावलीं कीं, चित्रपटाची जाहि-रात तयार होते. प्रत्येक आठवड्याला नवीन उपटणाऱ्या ( आणि पुढच्या आठवड्यांत वारणाऱ्या ) चित्रपटानें मागच्या एकूण एक चित्रपटांचें लोक-प्रियतेच्या बाबतींतलें रेकॉर्ड मोडलें हें वाचून तर मला गंमतहि वाटेनाशी झाली ( मग आश्चर्य वाटणें तर सोडाच. )

मराठी चित्रपटवाले लोक विद्वानांना फुकटांत रावबून घेऊन आणि स्त्रीदाक्षिण्य आणि सभेचें आकर्षण राखण्यासाठीं एखाद्या प्रोफेश्वरीण बाईस अध्यक्षस्थान देऊन चित्रपटाची वाङ्मयीन चर्चा घडवून आणतात. ही चर्चा वर्तमानपत्रांत छापून येतेच. मात्र चर्चेला जाहिरातीप्रमाणें पैसे भरावे लागत नाहींत. वर्तमानपत्रांत पत्रें, चर्चा, भाषणें इत्यादि ' चकट फू ' छापलीं जातात, त्याचा सोयीस्कर फायदा मराठी सिनेमावाले घेत असावेत. अर्थात् हें मत खरें असेलच असें नाहीं. खरें मत आणखी तिसरेंच कांहीं तरी असायचें.

आतां वर्तमानपत्रांतील आणखी एक चौक राहिला. तो म्हणजे वर्तमानपत्रांतून पत्रें लिहिणाऱ्या पत्रलेखकांचा. मराठी भाषेंत विनोदाची वाण आहे, असें ओरडणाऱ्यांनीं यांतील कांहीं पत्रें जरूर डोळ्यांखालून घालावींत.

पत्रलेखकांना पत्रकार म्हणावें काय, विषयापासून मुंबईतील कोणत्या सार्वजनिक मुत्रींतील लघुशंकेचें पात्र बाजवीपेक्षां किंचित् उंच आहे या विषयापर्यंत; चाळींतल्या जिन्यांत आणि नळांत नसलेल्या दिव्यापासून रशिया–अमेरिकेची जीवश्चकंठश्च मैत्री कशी घडवावी यावरच्या रामबाण उपायापर्यंत किंवा मृतांचीं श्राद्धें कां करावींत यापासून जिवंत माणसांचींहि श्राद्धें कां करूं नयेत या विषयापर्यंत सर्व प्रकारचीं पत्रें, पत्रलेखकांच्या यथाशक्ति ज्ञानाप्रमाणें वर्तमानपत्रांतील राखीव जागेंत स्वतेजानें विलसत असतात हीं पत्रें फारच मनोरंजक असतात. ( सरकारनें या पत्रांवर अजून 'करमणूक–कर' कां बरें बसविला नाहीं ? )

कोड्यांच्या पुरवणींत विजयी वीरांचे सहकुटुंब फोटो येतात. तेहि मोठे ( अ ) प्रेक्षणीय असतात. विशेषतः ' हेड ऑफ फॅमिली ' नें घेतलेली फाकडोजीरावांची पोज, त्याच्या बायकोची लाजरी अंगचोर पोज, नुकतेंच पातळ नेसूं लागलेल्या मुलीची जणूं काय ' दाखवायच्या ' वेळची पोज, लहान मुलांच्या ( जीं डावी मांडी आणि उजवी मांडी पालथी घालून सतरंजीवर बसलेलीं आहेत ) हेकण्या, चकण्या आणि भिकण्या पोजेस्, अशा व्यक्ती तितक्या पोजेस असलेले हे फोटो पाहिले म्हणजे माझी फारच करमणूक होते. फोटो फारच भिकार आणि हंसूं येणारे निघाले म्हणजे,


कोडेवाले संपादक त्या फोटोखालीं कांहीं तरी ( म्हणजे कांहीं तरीच ) गमतीचा मजकूर लिहून मखलाशी करतात आणि त्या फोटोंतल्या माणसांच्या हास्यास्पदतेवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतात. ही मखलाशी वाचून तर मला दुप्पट हंसू येतें. असो.

तर मी एकंदरींत असें वर्तमानपत्र वाचतों. वृत्तपत्रें, त्यांच्याशीं संबंधित असलेल्या संस्था आणि व्यक्ती यांच्याबद्दल मला काय वाटतें आणि मी वर्तमानपत्र कसें वाचतों याबद्दल बरें वाईट मीं वर लिहिलें आहे. हें वाचून बहुतेकांना आत्मानुभूतीचा आनंद मिळावा अशी अपेक्षा करून येथेंच ' स्टॉप प्रेस ' करतों.

* * *

# सकाळचं दूध ४

मीं गेल्या बऱ्याच वर्षांत दुधासंबंधीं अनेक प्रयोग केलेले आहेत. अजिबात दूध न घेण्यापासून ते स्वत:ची गाय पाळण्यापर्यंत मीं बरेच उपद्व्याप केलेले आहेत. परंतु काय कोणास ठाऊक, दुधाचं नि माझं अजूनहि नीट जमत नाहीं. माझं नि बायकोचंहि कित्येक बाबतींत जमतं परंतु दुधाचं जमू नये याच मला आश्चर्य वाटतं. कुणाला प्रेम धार्जिणं नसतं, तर कुणाला लग्न



धार्जिणं नसतं; परंतु दूध धार्जिणं नसणारा मात्र माझ्या माहितीप्रमाणं मी एकटाच आहें.

दुधाच्या त्रासांतून सुटका करून घेण्यासाठीं मीं मागं एकदां दूध न पितां चहाच पिण्याची घोर प्रतिज्ञा केली होती. परंतु प्रतिज्ञेचे शब्द पुरे व्हायच्या आंतच चहालाहि दूध लागतंच याची आठवण होऊन माझी प्रतिज्ञा तिथंच बारगळली.

दूध हा पदार्थ पाण्यापेक्षां बराच दाट असतो हें मला वयाच्या तेराव्या वर्षीं कळलं—शप्पत ! माझं गांव आहे पंढरपूर. माझं तें रम्य बालपण तिथंच गेलं—आईचा मार खात खात. क्षेत्रांतले धंदेवाले लोक, आहे तोच माल दुप्पट करून विकण्यांत मोठे हुशार असतात. ऐन यात्रेच्या दिवसांत दूध नांवाचा जो पातळ द्रव मिळतो त्याला दूध म्हणावं कां पाणी म्हणावं असा पेंच मी मी म्हणणाऱ्या तज्ज्ञांना पडला आहे. दूध म्हणावं तर

तें पांढरं नसतं आणि पाणी म्हणावं तर तें पाण्याप्रमाणं स्वच्छ, पारदर्शक नसतं. हें दूध, परमेश्वराप्रमाणंच, गिऱ्हाइकाला पेंचांत टाकणारं असतं. परमेश्वर आहे म्हटलं तर दिसत नाहीं, नाहीं म्हणावं तर त्याचं अस्तित्व जाणवतं. असलंच त्रांगडं या पंढरपुरी दुधाच्या बाबतींत होतं. 'नीर क्षीर न्यायां'तला तुमचा हंस जर आमच्या गांवचं दूध प्यायला येईल तर, त्या बिचाऱ्यावर, जलमिश्रित दुधांतील, दूध तेवढंच प्यायचं हें आपलं कौशल्य नाइलाजानें सोडून देऊन त्यांतल्या भरपूर असणाऱ्या पाण्यावरच गुजराण करण्याचा प्रसंग येईल. मला वाटतं, बाळपणाचं पुराण पुरे आतां.

तें रम्य बालपण गेलं. शाळा संपली आणि मी मायपोट मुंबईला नोकरीसाठीं आलों. इथून पुढं मात्र मला दुधाचा प्रश्न भेडसावूं लागला. दुधाला भूलोकींचं अमृत म्हणतात. कुणीं महाभागानं ही कविकल्पना लढविली कुणाला ठाऊक? दुधाची एक का कटकट आहे? तशांत मुंबईत दुधाचे प्रकार पुष्कळ. दुधाच्या धंद्याचे प्रकार पुष्कळ. दुधाच्या वेळा पुष्कळ. दूध घेणारे पुष्कळ आणि पिणारेहि पुष्कळ. या अनेक पुष्कळांच्या गुंतागुंतीनं तर मी प्रथम बावचळून गेलों.

दुधाच्या बाबतींतला कसलाहि प्रश्न असो, तो माझ्या मानगुटीवर यक्ष-प्रश्नासारखा बसतो. माझ्या पुढच्या यक्षप्रश्नांची लिस्टच देतों ना तुम्हांला.

दूध सकाळीं घ्यावं कीं दुपारीं घ्यावं, कीं आपलं संध्याकाळीं गोरज मुहूर्तावर घ्यावं हा एकांत तीन प्रश्न असलेला पेंच मला प्रथम पडला. बरं दूध घ्यायचं तें वसईवाल्याकडून घ्यायचं का भय्याकडून घ्यायचं? का आपलं घरगुती घ्यायच की डेरी फार्ममधून घ्यायचं, कीं आपलं सरकारी घ्यायचं हे प्रश्न दत्त न म्हणतांच माझ्यापुढें उभे राहिले. बरं दूध घ्यायचं ठरलं. परंतु तें कसलं घ्यायचं? आपलं नेहमींचं गायीम्हशीचं घ्यायचं, कीं टोन्ड घ्यायचं, कीं स्किम मिल्क घ्यायचं, कीं, पाश्चराइझ केलेलं घ्यायचं या विवंचनेनं मी बेजार झालों. सगळं ठरलं. पण दूध घ्यायचं तें बाटलींतून घ्यायचं का कडीवाल्या बरणींतून? का आपलं कल्हईची कटकट नसलेल्या स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांतून? या बाबतींतला पात्रापात्र विचार करण्यांतहि मी कांहींसा अपात्र ठरलों.

माझे हे वरचे प्रश्न मीं कसे सोडवले तें माझें मलाच माहीत. यक्षाला पुरून उरलेला धर्मराजसुद्धां या प्रश्नांनीं हैराण झाला असता.

शेवटीं वसईवाल्याकडून दूध घ्यावं असं मी ठरवलं. वसई म्हटलं कीं तो किल्ला, ते फिरंगी, " किल्ला सर होत नसेल तर माझं मस्तक तोफेनं उडवा म्हणजे तें तरी किल्ल्यांत पडेल " अशी चिमाजी अप्पांची घोर प्रतिज्ञा, ती " हरहर महादेव ' ची गर्जना--सारा सारा इतिहास कसा डोळ्यांसमोर येतो ! परीक्षेच्या वेळीं मात्र या इतिहासानं कुठं दडी मारली होती कुणास ठाऊक ? हकनाक साडेतीन मार्क बुडाले. शस्त्रपाणी मराठ्यांनीं टोपीकर फिरंग्यांना आपलं पाणी पाजलं तें या वसईतच. अशा या भूमींतलं दूधसुद्धां पाणीदार नसेल तरच नवल. ( आतांच्या ' पाणी ' शब्दावरच्या पाणचट कोट्या ऐकतांना श्रोत्यांनीं हंसावं अशी माझी इच्छा आहे. ) अशा या वीरभूमींतून येणाऱ्या महापुरुषाचं दर्शन दररोज सुप्रभातीं ब्राह्ममुहूर्तावर व्हावं या उदात्त हेतूनं मी वसईवाल्याच दूध सुरू केलं. प्रथम कांहीं दिवस त्यानें निर्भेळ दूध घातलें; आणि पुढंहि तो निर्भेळच दूध घालीत असे. परंतु ' निर्भेळ ' या शब्दाच्या अर्थाबाबत त्याच्यांत नि माझ्यांत मौलिक मतभेद निर्माण झाला. निर्भेळ म्हणजे ज्यांत कसलीहि भेळ नाहीं असा त्याचा अर्थ होता; आणि ज्यांत फक्त नीराची म्हणजे पाण्याची भेळ आहे असा माझा अर्थ होता. ( ह्या आणखी एक पाणचट कोटी. आज दुपारींच मराठींतले सुप्रसिद्ध लेखक श्री. अमुक अमुक यांची कादंबरी वाचल्याचा हा परिणाम बरं. वेळ मिळायची खोटी कीं केलीच कोटी अशी त्यांची कीर्ति आहे म्हणे ! )

वसईवाल्याचं दूध स्वस्त असे एवढाच याचा दर्शनी फायदा होता. सूर्योदयापूर्वीं उठून चहा घेण्याची मला किती आवड आहे ! माझी ही माझ्या अगोदर उठली आहे, तिनं स्टोव्ह पेटवला आहे, पंप मारतांना कांकणांचा मंजूळ स्वर निघत आहे, ती म्हणत आहे, " ऐकलंत का ? चहा झालाय्. उठायचं. " अशीं ठराविक सांच्याचीं मनोराज्यं मीं कैकदां मनांत घोळवलीं. परंतु माझी ' ही ' आणि वसईवाला माझ्या मनोरथांची ' उत्पद्यन्ते विलीयन्ते ' अशी अवस्था करून टाकतात. कांकणांच्या मंजूळ

आवाजाऐवजीं वाघासारख्या डरकाळ्या तिच्या घोरण्याच्या रूपानं ऐकायला येतात. वसईवाल्याला पहांटे लौकर येण्याबद्दल वारंवार बजावलं; परंतु कधीं कधीं त्याच्या पहांटेची मर्यादा साडेसात किंवा आठपर्यंतहि जाऊं लागली.

मी एके दिवशीं रागानं त्याला म्हणालों, " अरे गृहस्था, " तर तो म्हणतो कसा, " का म्हणतां ? "

" अरे तूं असा आठ आठ वाजतां येऊं लागलास तर व्हायचं कसं ? "

तेव्हां तो म्हणाला, " मास्तरसाब का करावं ? आमची इरार लोकल आज लेट झाली की न. बरं हें केळ्याअ बौंड घ्या. "

गाडी लेट होण्याची वसईकरांची परंपरागत थाप मारून त्यानं केळफूल बायकोच्या हातीं दिलं. पुढं दुधांत आणखीं थोडं थोडं पाणी मिसळून त्यानं फुकट दिलेल्या केळफुलाचे पैसे वसूल करून घेतले.

शेवटीं वसईकराच्या दुधाला, थापेला, आणि फुकट दिलेल्या वस्तूंना मी कंटाळलों आणि त्याचं दूध बंद केलं.

वसईकराचं दूध बंद केलं नि भय्याचं दूध सुरू केलं. भय्या पहांटे बिनचूक यायचा नि दार ठोठावयाचा. भय्या या बाबतींत नियमित होता. परंतु त्याच्या दुधाचा रंग आणि डेन्सिटी म्हणजे घनता त्याच्या काशीच्या गंगामाईइतकीच होती. केमिस्ट्रीच्या भाषेंत बोलायचं झाल्यास, मूळ शुद्ध दूध जर वन नॉर्मल ( I· N. ) धरलं तर भय्याचं दूध पॉईंट वन नॉर्मल ( O· I. N. ) इतकं डायल्यूट होतं, असं म्हणावं लागेल. आम्हीं तें दूध ' जान्हवीतोयं परमं पवित्रम् ' अशा भावनेनें चहांत घालून पीत होतों. भय्याच्या दुधावर साय यायची तीसुद्धां कशी अगदीं डाक्याच्या मलमली-सारखी. सीतेनं ती साय पाहिली असती तर तिनं रामाजवळ कांचनमृगाच्या कातड्याच्या चोळीचा हट्ट न धरतां, भय्याच्या दुधावर येणाऱ्या तलम सायीची चोळी करून द्या असा हट्ट धरला असता.

मी एकदां भय्याला म्हणालों, " भय्याजी, दूध में कितना पानी डालता है ? "

तेव्हां तो म्हणाला, " क्या कहत हो मास्टरजी ! हमारा दूध तो चंदनके गंधके माफक दाट होता है । हमारे दूधमें सिर्फ शक्कर डालो । बासुंदी बन जायेगी । मंगता है तो दुधको डिग्री लगाइये । "

कसली डिग्री लावायची त्या पुळकावणीला ? लॅक्टोमीटर पृष्ठभागावरच तरंगायचा. त्याच्या या गंगाजलाला मी कंटाळलों आणि एक दिवस त्याला ' जयरामजी ' म्हणालों.

यानंतरचा प्रयोग म्हणजे, मी दुधाच्या दुकानांतच जाऊन दूध आणायचं ठरवलं. दुकानांत एक भय्या झोंप घेत बसलेला असायचा. त्याला दोन चार हांका मारल्या म्हणजे तो एक तृतीयांश जागा व्हायचा; आणि राहिलेल्या दोन तृतीयांश झोंपेंतच तो मला दूध द्यायचा. पहांटे उठून दूध आणायला बाहेर जायचं आणि दुकानदाराला, त्याच्या नांवाची भूपाळी म्हणून उठवायच ही नसती कटकट माझ्या नशिबीं आली. दुधाच्या बाबतींत त्रास सोसायचा हें जणुं काय माझ्या नशिबांतच लिहिलंय्. दूध वसईवाल्याच असो नाहीं तर भय्याचं असो; पहांटे किंवा सकाळीं उठून मलाच घ्यावं लागत असे. माझी सौभाग्यवती झोंपली म्हणजे झोंपलीच. तिला उठवतांना, " नवरात्र संपलें, दसरा उजाडला " ह्या चालीवर " सत्तावीस तारीख सपली, अठ्ठावीस तारीख उजाडली; ऊठ आतां बाई ! " असं म्हणून तिला उठवावं लागतं आणि ती झोंपतेहि लौकर आतां मी इथं बोलतोय ना, तर ती घरीं झोंपलेली असेल; म्हणून तर मी असं बोलतोंय्.

दुधाच्या त्रासामुळं मी वारंवार दूधवाले बदलले कीं, ती उगीच म्हणजे खालीपिली माझ्यावर चिराचिरते. पण पहांटे दुधाच्यापायीं मला काय यातना होतात, याचा तिला पत्ताहि नसतो; सुखी आहे बिचारी !

पहांटे खूप गारवा असतो, किंवा पावसाळ्यांत पाऊस असतो म्हणून मी घरांतून शिळ्या दुधाचा चहा घेऊन दूध आणायला जायचं ठरवावं आणि कपाट उघडून पहावं तर बायकोनं माझ्या चहाच्या इच्छेसहित दुधावर विरजण घातलेलं असतं. याला साहित्यांत ' सहोक्ति ' अलकार म्हणतात.

पहांटेच्या दुधाच्या त्रासाला कंटाळून मी एक दिवस हिला दुपारीं दूध आणीत जाण्याबद्दल सांगितलं. परंतु मुंबईच्या फॅशनप्रमाणं दुपारीं महिला मंडळांत तिला जायचं असल्यामुळं तिनं माझ्या सांगण्याला हुड्डत् केलं. दूध आणण्याऐवजीं दुधाच्या प्रॉब्लेमवर तिनं महिलामंडळांत एक विद्वत्ता-प्रचुर व्याख्यानहि दिलं होतं. परंतु तें विद्वत्ताप्रचुर नव्हतं असं मला मागाहून कळलं. 'तानसा कम वैतरणा'-प्रमाणं 'पाणी कम दूध' असा एक दुधाचा तलाव तयार करावा आणि घरोघर दूध नळानं पुरवावं अशी एक योजना तिनं मांडली होती आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे बऱ्याच महिलांनीं ती योजना उचलून धरली. एवढी मोठी योजना त्यांनीं कशी उचलली तें त्यांचं त्यांनाच माहीत. सांगायचं तात्पर्य काय, हल्लीं बायका चपात्या करण्यापेक्षां, चपात्या करायच्या प्रॉब्लेमवरच फार बोलतात आणि सरळ दुकानांत जाऊन दूध आणण्यापेक्षां दुधाच्या समस्ये-वर चक्की व्याख्यानं करण्यांतच त्या पटाईत झाल्या आहेत. मी एकदां आमच्या हिला म्हणालों, "तुला कार्लाईलचं एक वाक्य सांगतों. तो म्हणत असे, 'दुसऱ्यांना प्रामाणिकपणानं वागायला सांगण्यापेक्षां स्वतःच प्रामाणिकपणानं वागा म्हणजे जगांतला एक बदमाष तरी कमी होईल.' याच चालीवर माझं तुला असं सांगणं आहे कीं, दूध आणायला तूं तुझ्यापासूनच सुरुवात कर. म्हणजे दुधाची एका माणसाची समस्या तरी सुटेल."

माझ्या या बहुमोल उपदेशाचा तिच्यावर तिरपांगडाच परिणाम झाला. मानेला गुंतागुंतीचा हिसका देऊन ती म्हणाली, "कळतात हो मेलीं असलीं घालून पाडून केलेलीं बोलणीं. त्यापेक्षां सरळ महिला-मंडळांत जाणं बंद कर म्हणून सांगा ना. स्त्रियांचा विकास तुम्हांला कसा पहावेल!"

ही आतां स्त्रियांच्या आत्मविकासावर मला भाषण सुनावणार या भीतीनं मी हबकून गेलों आणि विषय तिथल्या तिथंच गुंडाळला.

बाहेरच्या दुधामुळं रोज होणाऱ्या कटकटीला मी कंटाळून गेलों आणि शेवटीं घरींच गाय ठेवण्याचं मी ठरवलं. मुंबईतील पांचव्या मजल्यावरची

खोली मीं सोडली आणि तेवढ्यासाठीं मुद्दाम उपनगरांत रहायला गेलों. एका सुप्रभातीं मी सवत्स गोमाता घरीं आणली. माझ्या सौभाग्यवतीनें दुरूनच तिच्या दिशेनें हळदकुंकू वाहून नि नीरांजन ओवाळून सांस्कृतिक विधि पार पाडला. हल्लीं सर्वत्र सांस्कृतिक कार्यांची चळवळ सुरू आहे ना. महिलाहि त्यास अपवाद नाहींत माझा एक मिस्किल मित्र त्यांच्या सांस्कृतिक चळवळीला, ' सांस्कृतिक वळवळ ' म्हणतो. म्हणूं दे. आपण तिकडे लक्षच देऊं नये.

लहानपणापासून गाईची धार काढणें या गोष्टीविषयीं मला फार उत्सुकता होती. यशोदा धार काढीत आहे आणि हातांत पेला घेऊन गोपालकृष्ण यशोदेच्या मागें उभा आहे हें मी पाहिलेलं सर्वांत पहिल गोदोहन. मी त्रिगारींत होतों तेव्हां " काका उठा; हा पहा रामा आला. रामा रामा, गाईला चारा घाल; गाई गाई, धार दे " या क्लासिकल धड्यामुळेंहि मला धार काढण्याची उत्कंठा होती. भगवद्गीतेंतहि ' दोग्धा गोपालनंदनः ' असा धार काढण्याविषयींचा फार महत्त्वाचा उल्लेख आलेला आहे. एक दोन वर्षांपूर्वीं एका मराठी चित्रपटांत मराठीचा प्रोफेसर पंचा नेसून गाईची धार काढीत आहे हें दृश्य पहातांच मी तिथल्या तिथंच प्रतिज्ञा केली कीं, " बस्स् ! मीहि एक दिवस धार काढणार ! "

ही सुवर्णसंधि मला गाय आणल्यामुळें मिळाली. पहिलंच मूल घरांत जन्माला आलं कीं, स्वयंपाकघरांतून " बरं का, बाजारांतून येतांना बाळासाठीं वेखंड आणि दृष्टीचे मणी आणा " अशीं पत्नीचीं वाक्य ऐकतांना ज्या मानसिक गुदगुल्या होतात तशा गुदगुल्या, " बरं का, बाजारांतून येतांना गायीसाठीं गवत आणि पेंड घेऊन या " ही बायकोची आज्ञा ऐकतांना मला होऊं लागल्या.

पहिल्या दिवशीं, मी पंचा नेसून उत्साहानं गायीची धार काढायला बसलों. आंचळाला हात लावून चरवींत पडणाऱ्या दुधाचा ' चुर्र चुर्र ' असा आवाज होतोय् न होतोय् तोंच माझ्या पार्श्वतनूवर त्या परमपवित्र गोमातेनें आपल्या मागील चरणारविंदयुग्माचा प्रहार केला. किती झालं तरी, तेहतीस कोटी देवांना पोटांत सामावून घेणाऱ्या गोमाते-

चीच ती लाथ ! लागल्याशिवाय कशी रहाणार ? मी कंबरडं चोळीत तिची प्रार्थना करूं लागलों, " हे गोमाते, तू असं कां वरं करतेस ? हा नामदेव विठ्ठलरूपी तुला विनवीत आहे,--' तूं माझी माउली मी तुझें वासरूं, नको पान्हा तोडूं, विठाबाई " पान्हा न तोडण्याचा साधुसंताचा दाखला देऊन पाहिला. परंतु तिनं पान्हा तोडला, पान्हा चोरला. एकंदरींत स्त्री जात चोरटी असते हेंच खरें. गायी पान्हा चोरतात आणि बाई हृदय, वय किंवा नवऱ्याच्या खिशांतले पैसे चोरते.

शेवटीं संस्कृत दुसऱ्या पुस्तकांतील, ' किं क्रियते तया धेन्वा या न सूते न दुग्धते ' या वाक्याची आठवण होऊन मी तिला निकालांत काढायचं ठरवलं. एवढ्यांत माझ्या सौभाग्यवतीला धर्मशास्त्राचा उमाळा आला आणि ती म्हणाली, ' विकतां कशाला गोमातेला ? ' पुढं ती म्हणाली, ' ज्याच्या घरीं गाय । तिथें श्रीविष्णूचे पाय,' 'ज्याचे घरीं दहीं, दूध तूप । त्याचें वर्णावें काय रूप ' अशी गोमाता-प्रशस्ति तिनं गाऊन दाखवली. आणखी वर म्हणाली, " तुम्हांला पोसायला जड होत असेल तर एखाद्या गोरक्षणसंस्थेला देऊन टाका. ब्राह्मणांनीं गाय विकायची का असते ? " झालं ! तिचं म्हणणं खरं ठरलं ! रोख पैसे देऊन विकत घेतलेली गाय मीं गोरक्षणसंस्थेला ' सप्रेम भेट ' म्हणून दिली.

आठ दहा दिवसांनीं गोरक्षणाच्या व्यवस्थापकांकडे मी दिलेल्या गाईचं क्षेमकुशल सहज विचारलं. तेव्हां ते म्हणाले, " वा बुवासाहेब, तुम्ही खरे उदार आहांत बुवा ! बाकीचे लोक गोरक्षणाला भाकड जनावरं देतात आणि वैरणीच्या खर्चानें आम्हांला हैराण करतात; पण तुमची गाय अगदीं नंदिनी, कपिला, कामधेनु इत्यादि श्रेष्ठ गायींच्या कुलांतली दिसतेय्. सकाळ संध्याकाळ मिळून पांच शेर दूध देते !"

हें ऐकतांच मला धक्काच बसला. काय इरसाल गाय होती ! माझ्याकडे असतांना एक थेंबभरहि दूध न देणारी ही गाय त्या सार्वजनिक गोठ्यांत खुशाल पांच पांच शेर दूध देऊं लागली अं !

दुधाच्या बाबतींतला गाय ठेवण्याचा प्रयोग करून झाल्यावर सरकारी दुधाकडे वळायचं तेवढें बाकी होतं. हें दूध घेण्याचं मी इतके दिवस

टाळत होतों. त्याचीं कारणं तीन चार आहेत. तो अर्ज, तें कार्ड काढणं, त्या रिकाम्या बाटल्या विकत आणणं, पहांटे अमूक ते तमूकपर्यंत गेलं तरच दूध मिळणं हीं बंधनं मला नको होतीं आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे रोजच्या रोज रोख द्यायला ' चैसे प ' कुठुन आणायचे ! वीस तारखेच्या पुढं आमच्या घरीं तंग परिस्थिति जाहीर होते.

परंतु दुधासंबंधींचे सर्व प्रकार झाले असल्यामुळं सरकारी दूध घेण्याच्या बाबतींत जें सव्यापसव्य करावं लागतं तें सर्व मीं केल. पगाराच्या दिवशींच एका पेटींत दररोज दुधाला लागणारे पैसे काढून ठेवले. पहांटे उठून आणि पिशवींत बाटल्या घालून, बाटल्यांचा ' खडड् खडड् ' असा आवाज करीत जवळच्या केंद्रांत जाण्याचा नवा उपद्व्याप मीं सुरू केला. इतके दिवस दुधाच्या बाबतींत जो त्रास होत होता त्यांत क्यूमध्यें उभा राहणं याची एक भर पडली. दुधाची गाडी आणि आपला नंबर कधीं येतो याची वाट पहाणं या गोष्टीहि त्याच्या जोडीला आल्या. क्यूमध्यें उगीच उभं रहायचें त्यापेक्षां कांहीं तरी उद्योग पाहिजे म्हणून मला हळूं-हळूं विड्या फुंकत उभं राहण्याची संवय झाली. त्यामुळं हा नवाच खर्च उपटला. शिवाय माझ्या शेजारच्या नंबरांतले लोक ' दीपप्रदीप—न्याया ' नें माझ्या विडीवर आपली विडी शिलगावून मला त्रास देत तो निराळाच. आणखी म्हणजे माझ्या दुधाच्या बाटल्या सौभाग्यवतीच्या सुप्रसिद्ध फुटक्या हातांतून फुटायच्या तो भूर्दंड वेगळाच. अशा रीतीनं सरकारचं हें पॅश्चराइज केलेलं राष्ट्रीय दूध मुळांत स्वस्त आणि चांगलं असूनहि मला श्रमाच्या आणि खर्चाच्या दृष्टीनं महागांत पडूं लागलं. शिवाय पावसाळ्यांतल्या पावसांत, हिंवाळ्यांतल्या थंडींत, दुधाच्या गाडीचा आणि आपल्या नंबराचा मुहूर्त साधतां साधतां मी हैराण होऊन गेलों; आणि केंद्रावरचं दूध चांगलं असूनहि मला तें नाइलाजानं बंद करावं लागलं.

शेवटीं आमच्या घरापासून जवळच राहणाऱ्या एका बाईकडे दुपारचा रतीब सुरू केला. परंतु त्यामुळं सुटीच्या दिवशीं दुपारीं कुठं बाहेर जायचं असलं कीं अडथळा निर्माण होऊं लागला. आणि हिच्या महिला मंडळाच्या कार्यांतहि व्यत्यय येऊं लागला तेव्हां एके दिवशीं मी दूध-


वालीला सांगितलं, " उद्यांपासूनं दूध सकाळींच घालत जा. " तिनं दुसऱ्या दिवसापासून सकाळीं घालायला सुरुवात केली आणि त्याच दिवशीं मला रेडिओचं आमंत्रण आलं कीं, ' सकाळच्या दुधा ' वर बोला म्हणून. सकाळच्या दुधानं मी इतका वैतागून गेलों होतों कीं, काय कप्पाळ बोलायचं या विषयावर असं मला प्रथम वाटून गेलं. तरीपण इतकं बोललोंच. हुश्श !

( ऑल इंडिया रेडिओच्या मुंबई केंद्राच्या सौजन्यानें. )

* * *

# चंद्र अमेरिकेचा : अक्कल माझी ! ५

प्रेसिडेंट आयसेनहॉवरसाहेबांच्या अमेरिकेंत सध्या ' चंद्र ' ( कृत्रिम उपग्रह ) बनविण्याचा उद्योग चालू असल्याचीं वृत्तें सर्वत्र प्रसिद्ध झालीं आहेत. हा चंद्र शास्त्रीय दृष्ट्या कसा बनविला जाणार आहे, तो पृथ्वीभोंवतीं कशी ' लाइन मारणार' आहे, इत्यादि तपशील मला मुळींच माहीत नाहीं. ( येथें वाचकांनीं ' हुश्श ' करावें. स्वत:ला सर्व माहीत आहे, या चुकीच्या समजुतीखालीं चुकीची माहिती बरोबर म्हणून देण्यापेक्षां हा माहीत नाहीं म्हणून सांगायचा सरळसोट मार्ग चांगला. या कारणासाठीं हुश्श ! ) परंतु माहिती नसली म्हणून काय झालें ? इतर काल्पनिक अक्कल चालवायला काय हरकत आहे ? म्हणून, मला या अमेरिकन चंद्राच्या निमित्तानें जी अक्कल सुचली, ती मी खालीं ( गरीब बिचाऱ्या ) मराठी वाचकांसाठीं देत आहें.




श्री. खांडेकरांना ' दोन ' या आंकड्याचें भारी वेड आहे. 'दोन ध्रुव' ( परमेश्वरी कृपेनें दोन ध्रुव मुळांतच अस्तित्वांत आहेत ), ' दोन मनें ' इत्यादि शीर्षकांचें साहित्य पाहिलें म्हणजे त्यांच्या ' दोन–प्रेमा ' ची ( ' प्रेमां ' ची नव्हे, ) खात्री पटते. इतके दिवस चद्र एकच असल्यामुळें त्यांना चंद्राबद्दलचें शीर्षक या पद्धतीनें वापरण्याचा मोकाच आला नव्हता. आतां १९५८ मध्यें अमेरिकन चंद्र तयार झाला म्हणजे एकंदरींत दोन चंद्र होतील, तेव्हां श्री. खांडेकरांना 'दोन चंद्र' नांवाची कादंबरी लिहितां येईल!

अमेरिकन चंद्र निर्माण होणार हें वाचून एका जुन्या गोष्टीची प्रकर्षानें आठवण होते. ती गोष्ट म्हणजे श्रीरामाची. बिचाऱ्या श्रीरामानें रडून रडून आकांत केला होता; परंतु त्याला आकाशांतील चंद्र कांहीं मिळाला नाहीं. पद्मिनीचें तोंड आरशांत पाहूनच अल्लाउद्दीन खिलजीनें ज्याप्रमाणें जिभल्या चाटल्या त्याप्रमाणें, श्रीरामाला आरशांतील चंद्राचें प्रतिबिंब पाहूनच समाधान मानून घ्यावें लागलें. ( अल्लाउद्दीन आणि श्रीराम यांच्या दृष्टांतांत जो कालविपर्यास ऊर्फ ' Anachronism ' झाला आहे त्याबद्दल क्षमस्व ! ) लढाईत इंद्रालाहि मदत करणाऱ्या दशरथासारख्या पित्याला एवढा बालहट्ट कांहीं पुरा करतां आला नाहीं.

—पण ही मंडळी या जमान्यांत असती आणि त्याच श्रीरामानें तसाच चंद्रासाठीं हट्ट धरला असता तर दशरथ राजानें अयोध्येहून आयसेन-हॉवरला पत्र पाठवून तातडतोब पार्सलनें एक अमेरिकन चंद्र मागवून घेतला असता. हा चंद्र फूटबॉलच्या आकाराचा असणार आहे म्हणे ! रामाला हा आटोपशीर चंद्र फारच आवडला असता. ( बाकी, सूर्यवंशी रामानें चंद्रासारख्या परप्रकाशी वस्तूचा हट्ट धरणें म्हणजे त्याच्या दृष्टीनें जरा ' बिलो डिग्निटी ' च वाटतें. )

चंद्रामुळें समुद्राला भरती–ओहोटी लागते. कोळ्यांचीं गाणीं रचतांना मराठी कवींनीं या प्रसंगाचा बराच चिचका वेळोवेळीं उडविलेला आहे. आतां सृष्टींत आणखी एका चंद्राची भर पडून भरती–ओहोटीची भानगड अधिक गुंतागुंतीची झाली, तर त्याच प्रमाणांत 'समिंदर–गीतां'त अधिक घोटाळा होणार.

एका मराठी लेखकानें ऐन दिवाळींत आकाशामध्यें पौर्णिमेचा चंद्र प्रकाशत ठेवला होता ! ही चूक लेखकाशिवाय बाकी सर्वांच्या लक्षांत आली. आतां ही चूक क्षम्य ठरण्याची संधि आयती चालून येत आहे. अमेरिकन चंद्राला चालू चंद्राप्रमाणें कलांची भानगड असणार नाहीं. तो दररोजच पूर्ण असणार. त्यामुळें ऐन दिवाळींतहि तो पूर्ण दिसणार. तेव्हां ५८ सालापासून सदरहू चूक बरोबर म्हणून समजण्याचा योग येणार आहे. कदाचित् या भावी अमेरिकन चंद्राला दृष्टीपुढें आणूनच या लेखकानें

द्रष्टेपणानें ही तथाकथित चूक करून ठेवली असावी. आपल्याकडे पूर्वी बरेच लेखक द्रष्टे होऊन गेले होते, यावरून हा तर्क बरोबर ठरावा.

चंद्र म्हटला कीं चांदणें आलेंच. ( जसें, बुवा म्हटला कीं बाई आलीच ! ) आतां या अमेरिकन चंद्राला चांदणें पाडायला प्रकाश असणार कीं नाहीं, याची कल्पना नाहीं; तथापि चंद्र म्हटल्यावर चांदणें असणारच असें गृहीत धरूं. हा चंद्र अमेरिकन असल्यामुळें तो 'स्टाँच–अँटी–कम्युनिस्ट' असणार. आपल्या चालू चंद्राची सर्वांभूतीं समान दृष्टि असल्यामुळें तो सर्वत्र सारखाच प्रकाशतो. म्हणून त्याचा दृष्टांत घेऊन, 'माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां समु ॥' असें साधूंच्या समबुद्धीचें ज्ञानेश्वरांनीं वर्णन केलें आहे. परंतु हा अमेरिकन चंद्र लाल देशावर चांदणें पाडणार आहे कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. त्यामुळें पृथ्वीभोंवतीं फिरण्याची कक्षा या नव्या चंद्राला मोठ्या खुबीनें आंखावी लागणार आहे —लाल देश चुकवून त्याला फिरावें लागणार आहे.

लौकर भूक लागणारीं माणसें संकष्टी–चतुर्थीला या चंद्राचेंच दर्शन घेऊन जेवणावर ताव मारतील, तर रमजानचे उपवास सोडतांना मुसलमानहि सोयीसाठीं याच चंद्राचें दर्शन घेऊन काम भागवून घेतील.

नवकवींना या कृत्रिम चंद्रावर काव्य करण्याची उबळ येईल. 'जिथें मारतो चंद्र 'डॉलरी' । टांग जरासी नव–चीनाला ॥' असलीं काव्यें निर्माण होऊं लागतील !

चालू चांदोबा भागला म्हणजे निंबोणीच्या झाडामागें लपतो. परंतु नव्या चांदोबासाठीं, "चांदोबा, चांदोबा, भागलास का, भागलास का ? 'आइक'च्या मागें लपलास का, लपलास का ?" असलें नवीन गाणें रचावें लागेल.

प्रेमाचा आणि चालू चंद्राचा भलताच घनिष्ट संबंध आहे. 'मुखचंद्र' 'चंद्रमुखी', 'प्रिये, तो पाहिलास का चद्र ?' इत्यादि सबबींखालीं लक्षावधि वेळां कवींनीं आणि प्रेमिकांनीं चंद्राला प्रेमांतून गडबडा लोळवून काढलें आहे. यामुळें बिचारा चंद्र अगदीं मेटाकुटीला येऊन हैराण झाला

आहे. आतां नवीन चंद्र आल्यावर जुन्या चंद्राची थोडीशी तरी सुटका होईल. कांहीं प्रेमिक जुन्या चंद्राकडे बघून प्रेयसीला म्हणतील, " लाडके, तो पाहिलास का चंद्र ? " तर कांहींजण नव्या चंद्राकडे बघून म्हणतील, " सजणे, चंद्राकडे बघ, तो आपलं प्रेम कसं हंसत पहात आहे ! " (अधिक उदाहरणांसाठीं चावून चिकट झालेलीं चंद्राच्या साक्षीचीं प्रेमकाव्यें वाचा. )

चंद्राला, ' निशानाथ ', ' रजनीकांत ' इत्यादि ' रात्रीचा नवरा ' ( रात्रीच्या वेळचा नव्हे--खुद्द रात्ररूपी स्त्रीचा ) या अर्थाचीं नांवें आहेत. परंतु आतां दुसरा चंद्र आल्यावर दोन्ही चंद्ररूपी पतींचें पत्नीत्व रात्रीला स्वीकारावें लागणार, बिचाऱ्या रात्रीची कुचंबणा होणार. रात्रीचा पूर्वार्ध एका चंद्रानें व्यावयाचा आणि उत्तरार्ध दुसऱ्या चंद्रानें भोगायचा, असा समजूतदारपणा दोन्ही चंद्रांनीं दाखविला तर सर्व कांहीं ठाकठीक होईल. ( पहा : द्रौपदीचा आदर्श. ) दोन्ही चंद्रांनीं पांडवांप्रमाणें वागण्याचें ठरवावें. नाहीं तर एकाच स्त्रीसाठीं आपापसांत लठ्ठालठ्ठी करणाऱ्या सुंद आणि उपसुंद यांच्यासारखी दोन्ही चंद्रांची ' आइटीकी फाइटी ' ( मारामारी या अर्थी नवीन रूढ शब्द ) होईल.

या नवीन चंद्रामुळें पाकिस्तानसारख्या राष्ट्राची मोठी पंचाईत होणार आहे. आपल्या चालू चंद्राची कोर आणि चांदणी हें त्याचें धर्मचिन्ह आहे; आणि पाकच्या राष्ट्रध्वजावरहि यांचीच योजना केलेली आहे. परंतु आतां कोणता चंद्र राष्ट्रध्वजावर वापरावा याचा पाकिस्तानला विचार पडला असेल. कारण, नाहीं म्हटलें तरी पाकिस्तान हें धर्मनिष्ठ राज्य आहे; म्हणून त्याला जुना ' चांदतारा ' सोडणें अशक्य आहे. आतां दुसरी गोष्ट पहा. हल्लीं पाकिस्तानला लष्करी आणि अन्य प्रकारचें साहाय्य देऊन अमेरिकेनें जन्मोजन्मींचें ऋणी करून ठेवलें आहे. या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होण्यासाठीं आपल्या राष्ट्रध्वजावर नवीन अमेरिकन चंद्राची योजना करावी कीं काय, असा विचार पाकिस्तानच्या डोक्यांत येण्याची शक्यता आहे. धर्मनिष्ठेचा जुना चांद, कीं राजकारणी मैत्रीचा नवा अमेरिकन चांद, अशी पाकिस्तानची द्विधा अवस्था झाली असेल.

सध्या सौरवर्ष आणि चांद्रवर्ष अशा दोन प्रकारांनीं कालगणना करण्यांत येते. यापुढें अमेरिकन चांद्रवर्षहि अस्तित्वांत येण्याची शक्यता आहे. या चंद्राची पृथ्वीभोंवतीं होणारी प्रदक्षिणा किती दिवसांची आहे हें पाहून त्यावरून महिन्यांचा अवधि ठरविण्यांत येईल. नवीन चंद्राचा वेग फार असून त्याची प्रदक्षिणेची कक्षा लहान असल्यामुळें त्याची पृथ्वीप्रदक्षिणा भराभर होईल. म्हणजे महिना फारच थोड्या कालावधीचा होईल.——आणि अर्थात् पगार भराभर लौकर मिळत जाईल !

जन्मकुंडलींत नव्या अमेरिकन चंद्रासाठीं जागा निर्माण करावी लागेल. कोणत्याहि माणसाच्या राजकीय मतप्रणालीवरून नव्या चंद्राची त्याच्यावरची इष्टानिष्ट दृष्टि फलज्योतिषी सांगूं लागतील, ( उदाहरणार्थ, एखाद्या कम्युनिस्टाची कुंडली पाहून ज्योतिषी त्याला म्हणेल, " कॉम्रेडसाहेब, हा अमेरिकन चंद्र तुम्हांला वक्री आहे. त्यामुळें हा सगळा त्रास आहे बघा. जर तुम्ही त्याची शांति कराल, म्हणजे कम्युनिस्ट पार्टी सोडाल—तर सर्व कांहीं झक्क होईल ! " )

नवीन चंद्राला ग्रहण लागतें का तेंहि पहावें लागेल. ग्रहण लागणार असेल तर पंचांगवाल्यांना त्याचीहि सोय करावी लागणार. या ग्रहणाचा वेध, स्पर्श, ग्रहणकाळ, मोक्ष, त्याचीं फळें इत्यादींचा सांगोपांग विचार करावा लागेल. जुनें पंचांग आणि दृक्प्रत्ययाची हमेशा हमी देणारें टिळक —पंचांग यांतील ( नेहमींचा ) गणितविषयक भेदहि या बाबतींत न विसरतां कायम ठेवण्याची दक्षता पंचांगकर्त्यांना घ्यावी लागेल. धार्मिक समजुतीप्रमाणें, राहू चंद्राला ग्रासतो म्हणून ग्रहण लागतें. चंद्राच्या मुक्ततेसाठीं जपजाप्यादि धर्मकृत्यें आणि दानें करावींत असा धार्मिक आदेशहि आहे. हें सगळें जुन्या चंद्राबद्दल झालें. परंतु नवीन चंद्राला राहूहि नवीनच पाहिजे आणि तो अर्थात् रशियानें शास्त्रज्ञांमार्फत तयार केलेला असणार. हा रशियन राहू चंद्राला किती ग्रासणार यावर त्याचें अपूर्ण अथवा खग्रास ग्रहण अवलंबून असणार !

या ग्रहणकालांतहि धार्मिक लोक धर्मकृत्यें करतील. साप, विंचू, इत्यादींच्या मंत्रांना उजळा देण्याऐवजीं, मांत्रिक लोक, ' ॲटम बॉंब, '

'एच् बॉंब' इत्यादि मंत्रांचा (फॉर्म्युले) जप करून त्या मंत्रांना उजळा देतील. ब्राह्मण लोक वैदिक मंत्रांऐवजीं, 'ॐ नमोऽमेरिकायैनमः' हा मंत्र जपत बसतील. ग्रहण सुटल्यावर गोरगरीब आणि भिकारी लोक हल्लीं, 'दे दान, सुटे गिराण। ताम्रदान, वस्त्रदान, अन्नदान' असें ओरडत फिरतात. परंतु अमेरिकन चंद्राचें ग्रहण सुटल्यावर हे लोक, 'दे दान सुटे गिराण। डॉलरदान, लष्करदान, मार्शल-योजना-दान, युसिस-दान' असें ओरडत फिरतील आणि आपले लोक त्यांना प्रतीक म्हणून अनुक्रमें भोंकाचा पैसा, खेळण्यांतले शिपाई, संसार-सुधार-योजनेचा कागद आणि वाचना-लयांतून पळविलेलीं पुस्तकें यांचीं दानें करतील.

विरही प्रेयसी नेहमीं प्रियकरासंबंधींचे प्रश्न विचारून चंद्राला बेजार करतात. (ऐका: हिंदी आणि मराठी सिनेमांतील जोगियामधील गाणीं.) आतां तुम्हीच सांगा, हा लेकाचा प्रियकर कोठें उलथला किंवा गायब झाला, हें त्या बिचाऱ्या चंद्राला काय माहीत? तरी पण प्रेयसी 'चदा जा रे जा रे। पियाका संदेशां लारे ऽऽऽ' (हिंदी बहुतेक चुकलें आहे वाटतें. चलता है!) असा प्रेमळ हुकूम सोडतात. त्यामुळें चंद्राची फारच तारांबळ उडते. आतां अमेरिकन चंद्र आल्यावर चालू चंद्राचा निम्मा भार कमी होईल. ('सारख्याच स्थितींतील व्यक्ती एकत्र आल्यावर सुख दुणावतें आणि दुःख विभागलें जातें,' हा सिद्धांत आठवा.) एका विरही प्रेयसीनें चालू चंद्राला पियाचा संदेश आणायला पाठविलें तर दुसऱ्या प्रेयसीला त्याच वेळीं नव्या चंद्राला पियाला धुंडाळण्यासाठीं पिटाळतां येईल.

स्त्रियांच्या तोंडाला चंद्राची उपमा (दृष्टांत, रूपक, अपन्हुति इत्यादि अलंकारहि आलेच') द्यायची हें आतां युगानुयुगें ठरून गेलें आहे. त्रेतायुगातील रामायणांतहि तीच उपमा आहे, द्वापारयुगांतल्या महा-भारतांतहि तीच उपमा आहे, आणि कलियुगांतील कालिदासापासून पुण्यांतील फडतूस बोळांतील टिनपाट कवीपर्यंत सर्वांनीं हीच उपमा वापरून तिचा पार खिमा करून टाकला आहे! नाटकांतील गाण्यांतहि हीच उपमा तानांच्या गुंतवळींत गुरफटून बसली आहे. समोर दिसत

आहे तें प्रियेचें मुख ( समानार्थी शब्द: थोबाड, मुस्काड, थोतर, त्वांड, गाडगें इ.—अधिक माहितीसाठीं रागावलेल्या नवऱ्याच्या शिव्या ऐका. ) आहे, आणि आकाशांत दिसतो तो चंद्र आहे, हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट असून आणि स्वतःलाहि तें ठाम माहित असून नाटकांतील प्रियकर अजागळ बावळटपणानें प्रेयसीला उद्देशून 'कोणता मानूं मी चंद्रमा' या गाण्याचें दळण दळूं लागतो ! चंद्र कोणता मानावा याचा तुला पेंच पडला आहे होय लेका ? घे आतां ! आकाशांतच आणखी एक चंद्र उपटणार आहे ! आतां तुझ्या प्रियेचें 'चंद्रमुखी' थोबाड बाजूला ठेवून आकाशांतल्या कोणत्या चंद्राला तूं मानणार आहेस तें सांग अगोदर !

अमेरिका हा भांडवलदारांचा, श्रीमंतांचा देश आहे; त्यामुळं श्रीमंतांना हा नवा चंद्र अधिक प्रिय वाटेल. श्रीमंताचा उडाणटप्पू तरुण मुलगा प्रियेची आराधना करतांना, " हे अमेरिकन चंद्रमुखी प्रिये, तुझ्या प्रेमांत डॉलरचं सौख्य आहे ! तूं माझ्या प्रेमाचा डॉलर असून मी तुझ्या प्रेमाचा बंदा ( श्लेष ) रुपया आहें.( 'बंदा सेवक'प्रमाणें ) ' असें म्हणूं लागेल.

चंद्रांतून अमृतधारा स्रवत असतात अशी एक कविकल्पना आहे. नवीन चंद्रांतून काय स्रवणार आहे याची तूर्त कल्पना नाहीं. तथापि त्यांतून डॉलर्स स्रवूं लागले तर बरें होईल असें मला वाटतें तेवढेच खर्चायला होतील ! पाऊस पडतांना, वरच्या वरच ज्याप्रमाणें वाफेचें पाण्यांत रूपांतर होऊन तो जमिनिवर पडतो, त्याप्रमाणें या डॉलरांचेहि वरच्या वरच रुपयांत रूपांतर होऊन रुपये स्रवावेत, म्हणजे 'एक्सचेंज'ची भानगड मिटली.

पूर्वीच्या काळाप्रमाणें पुन्हा जर समुद्रमंथन करायची वेळ आली, तर 'चौदाव्या रत्ना' नंतर हें अमेरिकन चंद्राचें पंधरावें रत्नहि घुसळून काढावें लागणार. 'चौदाव्या रत्ना'नंतर याचा नंबर असल्यामुळें याचे गुणधर्म कसे असणार आहेत कोण जाणे ! मात्र हें 'रत्न' 'लक्ष्मी-रत्ना'ला अमेरिकेंत घेऊन जाईल.

भाऊबीजेच्या दिवशीं, ज्यांना भाऊ नाहीं अशा स्त्रिया चंद्रालाच भाऊ समजून ओंवाळतात. अशा स्त्रियांना यापुढें आणखी एक भाऊ

मिळणार आहे. या ओंवाळण्यामुळें दोन्ही चंद्रांना घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण त्यांनीं ओंवाळणी कांहीं टाकायची नाहीं. ‘ खालीपिली ’ ओवाळून घ्यायचें !

गुमास्ता-कायद्याप्रमाणें चालू चंद्राला अमावास्येच्या दिवशीं सुट्टी असते. शिवाय रोजचे कामाचे तासहि वेताचेच असतात. पहिल्या पंधरवड्यांत पूर्व–रात्रपाळी वाढत्या तासांनीं करावी आणि दुसऱ्या पंधरवड्यांत उत्तररात्र—पाळी उशीरां येत जाऊन करावी, अशी सोयीस्कर नोकरी चालू चंद्राला आहे. परंतु नव्या चंद्राला गुमास्ता-कायदा लागू नाहीं असें वाटतें. त्यामुळें नवीन चंद्र अगदीं दमून जाईल.

प्रियकर जवळ नसला म्हणजे चंद्राचें चांदणेंहि प्रियेला सूर्याच्या उन्हासारखें पोळतें, ( असें म्हणतात ! ) परंतु तेंच, प्रियकर जवळ असला म्हणजे कसें थंडगार लागतें ! ( पहा : ‘ रामजोशी ’ चित्रपटांतील सवाल-जबाब, चोपडी किं. १ आणा. ) कम्युनिस्टांनाहि हें अमेरिकन चांदणें पोळणार आहे. मात्र कारण निराळें आहे. तें चांदणें अमेरिकन आहे म्हणून त्यांना दाहक वाटणार आहे. या चांदण्यांतून हिंडतांना अमेरिकन विचार आपल्या डोक्यांत (?) शिरूं नयेत म्हणून त्यांना चांदण्यांतूनहि डोक्यावर छत्री धरून आणि डोळ्यांना लाल रंगाचे गॉगल्स लावून फिरावें लागेल. लाल गॉगल्स लावल्यावर त्यांना चांदणें कांहींतरी शीतल वाटेल.

अमेरिकन चंद्र आकाशांत विलसूं लागला म्हणजे रशियाच्या पोटांत दुखूं लागेल. मग पोटदुखी थांबावी म्हणून रशियन शास्त्रज्ञहि आपला स्वतंत्र चद्र तयार करून आकाशांत सोडतील, आणि मग काय विचारतां राव ? एकंदर तीन चंद्र पृथ्वीभोंवतीं ‘ लाइनी ’ मारूं लागतील. एकाच तरुणीमागें तीन टोळभैरव ‘लाइन’ मारूं लागले म्हणजे जशी त्या सुंदरीची अवस्था होते, तशी पृथ्वीची अवस्था होणार आहे. संभाव्य रशियन चंद्र झाल्यावर या लेखांत वर दिलेल्या सर्व गोष्टी आणखी एकपटीनें वाढून घडूं लागतील. मग सगळाच हाहा:कार उडेल.

नंतर ‘ जिनीवा–परिषदे ’ सारखी एखादी राजकीय परिषद् भरवून ‘ नि:शस्त्रीकरणा ’ सारखा ‘ नि:श्चंद्रीकरणा ’चा ठराव ‘ बड्यां ’च्या समोर

चर्चिला जाईल. वाटाघाटी होतील, एकमेकांना औपचारिक मेजवान्या देऊन आणि वाटाघाटी फिसकटल्या असें सांगून ‘ बडे ’ आपापल्या देशीं परत जातील.

——आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशींच्या वर्तमानपत्रांत पुढील बातमी येण्याचा संभव आहे.

“ अंतरिक्षांत अमेरिकन चंद्र आणि रशियन चंद्र यांची टक्कर होऊन दोन्ही चंद्रांचा चक्काचूर झाला ! ”

रशियाच्या ‘ तास ’ वृत्तसंस्थेची ‘ अधिकृत ’ बातमी पुढीलप्रमाणें आढळेल : “ अमेरिकन चंद्र खलास झाला असून रशियन चंद्र सुखरूप आहे. ”

आणि रॉयटरची स्टॉप प्रेसची बातमी,——“ मात्र ‘ऑरिजिनल’ चंद्र ( मेड बाय् गॉड, खात्रीसाठीं पहा : पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारे । त्यानें निर्मियलें सारें ) सुखरूप आहे ! ” अशी येईल.

* * *


ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि

# लेखणी-मित्र



## ( अर्थात् हजार साहित्य-पाक-क्रिया )

आपली मराठी मायबोली किती श्रेष्ठ आहे हें सर्वांना माहीतच आहे.




( उदा०-'माझा मऱ्हाटाचि बोलु कौतुकें । परि अमृतातें पैजा जिंके' 'संस्कृत भाषा देवें केली । मराठी काय चोरें निर्मिली ?', 'म्हणतात, जे मराठी भाषा होणार ती असे नष्ट । मारा टप्पल त्यांच्या डोक्या-वरती असे नतद्रष्ट', 'मराठी असे आमुची मायबोली'...इ. इ. )

'इये मराठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी'

असे ज्ञानेश्वर महाराजांनीं उद्गार काढले आहेत. ज्ञानेश्वरांच्या काळांत तें ठीक होतें. त्या काळांत नुसता ब्रह्मविद्येचाच सुकाळ झालेला होता. परंतु हल्लीं बघावें तों वाटेल त्या कलांचा आणि विद्यांचा सुकाळ झाला आहे.

ही काय, हजामत-विद्या ! मग घ्या तिच्यावर पुस्तकें : 'श्मश्रूः तंत्र आणि मंत्र', 'आमची कातरी : आमचा वस्तरा', 'कर्तरी' चा ( डोक्यावर ) 'कर्मणि' प्रयोग' असा लगेच ग्रंथाचा सुकाळु होतो. ( मराठी जनता ज्ञानाची बहुत भुकेली. म्हणून हा ग्रंथसंभार ) कोणत्याहि भिकार विषयावरचें पुस्तक संस्कृतप्रचुर शब्द वापरून तें भारदस्त करण्याचें मराठी लेखकांचें कसब आगळेंच. तें रसिक वाचकांच्या नजरेंत भरावें.

या अनेक पुस्तकांतून मला आवडलेलें पुस्तक एकच आहे. (खरोखरच आवडलें आहे.) आणि तें म्हणजे, 'गृहिणीमित्र' अथवा हजार

साहित्य पाकक्रिया ' हें होय. पुस्तक असावें तर असें. फूटपाथवर एक प्रत आढळायची नाहीं. ( सगळीं पुस्तकें दुकानांत किंवा स्वयंपाकघरांत ) दर तिसऱ्या चौथ्या वर्षी तीन–चार हजारांची नवीन आवृत्ति तयार ! ( विचारा : बलवंत पुस्तक भांडार, मुंबई ४. )

पुस्तक फारच रसाळ आहे. पोटांत फारच कासावीस होऊं लागलें आणि स्वयंपाक व्हायला अजून अवकाश आहे असें दिसलें कीं, मी हें पुस्तक वाचीत बसतों. मला पाहिजे तो पदार्थ बनविण्याची कृति मी वाचीत बसतों.

"...उत्तम मलईचें दहीं एक शेर आदल्या रात्रीं फडक्यांत टांगून ठेवा. दुसऱ्या दिवशीं तें फेसा. त्यांत बदामाचे काप, चारोळे, पिस्ते, वेलदोड्यांची पूड, केशर, जायफळ, साखर घाला. नीट मिश्रण करा आणि स्टेनलेस स्टीलच्या डावेनें वाढायला द्या... "

अहाहा ? वाचतांना काय सुखद गुदगुल्या होतात ! डोळ्यांसमोर ( त्या रम्य उपाशी पोटीं ) काल्पनिक ताटांत श्रीखंडाची छोटीशी टेकडी दिसूं लागते. मी अंगठ्याजवळच्या बोटानें तें श्रीखंड चव घेत घेत आणि जिभेवर त्याची गोडी घोळवीत घोळवीत खात 'आहें असा गोड भास मनाला होतो. तात्पर्य काय तर हें पुस्तक असें छान आहे. ( किंमत रु. ५, ट. ख. नि. )

परंतु...परंतु मराठींत साहित्याची तांत्रिक आणि शास्त्रीय माहिती देणारीं पुस्तकें थोडींच आहेत आणि जीं आहेत त्यांत दम नाहीं. ( असें म्हणतात. कदाचित् खोटेंहि असेल. ) ' गोष्टी कशा लिहाव्यात ' या विषयावरील पुस्तकांत गोष्टींपेक्षां गोष्टींच्या जंतर-मंतरालाच महत्त्व दिलेलें आहे. ' विनोद कसा करावा ' या पुस्तकांत दिलेल्या विनोदाच्या भयंकर मीमांसेनें विनोदाला चारी मुंड्या चीत केलें आहे. 'कविता कशा कराव्या' या पुस्तकाला ' वृत्त-तर्पण हें नांवच अधिक शोभून दिसतें. ' लेख कसे पाडावेत ' या पुस्तकाच्या नांवांतच त्याची कार्यक्षमता समाविष्ट आहे. मराठी माणसाला लेखन करण्याचा दांडगा हव्यास असल्यामुळें कांहीं धंदेवाईक लेखकांनीं हीं पाठ्यपुस्तकें तयार केलीं आहेत. परंतु सर्व पुस्तकां-

तून जडजंबाळपणा, मीमांसा, तांत्रिकता, तार्किकता, मौलिकता, चर्चा, परिसंवाद, मतें, मतभेद, टीका, टीपा, टिप्पणी, वाङ्मयीन मूल्यमापन ( आणि त्यांच्या फूटपट्ट्या ) यांचाच सुकाळ झाला आहे. जें कांहीं सांगायचें तें चटकदारपणें किंवा लोकांना पचेल अशा पद्धतीनें सांगायचें कोणालाच जमलें नाहीं हें येथें ( खोटें बोलून ) नम्रपणें सांगावेंसें वाटतें. ( कारण आतां माझी अक्कल पुढें दामटायची आहे. )

आतां आपण ' साहित्य ' हा शब्द घेऊं. प्रथम साहित्य म्हणजे काय ? ( याला मूलभूत शंका म्हणतात. ) लेखक, संपादक, एजंट आणि रद्दीवाला यांना वाढत्या श्रेणीनें पैसे मिळवून देणारा, पांढऱ्याचें काळें करणारा उद्योग म्हणजे साहित्य. ( इंग्रजींत ज्याला ' लिटरेचर ' म्हणतात त्या अर्थींहि साहित्य हा शब्द वापरल्यास चालेल असें कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे. वाचकांस ही व्याख्याहि मान्य व्हावी. ) बरें. आपण साहित्य हा शब्द आणखी कोठें वापरतों ? स्वयंपाकासाठीं जे पदार्थ आपण वापरतों त्यांनाहि साहित्य असेंच म्हणतात. ( विचारा : हिला. )

आतां मुद्द्याकडे वळूं या. साहित्यशास्त्रावरील जें लेखन करायचें तें स्वयंपाकशास्त्राच्या धर्तीवर केल्यास अधिक सयुक्तिक दिसेल हें सांगायला थोडेंच पाहिजे ? ( छट् ! मुळींच नाहीं ! )

मी वर ' गृहिणीमित्रा ' चा उल्लेख कां केला हें आतां तुमच्या ध्यानांत आलें असेलच. मराठींत साहित्याचे प्रकार दिवसेंदिवस भेद-पोटभेद यांच्यासहित वाढत चालले आहेत. जगाच्या प्रारंभीं फक्त पुरुष आणि स्त्री हीं एवढींच होतीं. परंतु पुढें मुलें, मुली, नातू, पणतू, खापर-पणतू, काका, मामा, आजी, आत्या, आई, बाबा, मावशी, काकू, वन्सं, दीर, भावजय, मेहुणी, जाऊ, साडू, सासू, सासरा, व्याही, जांवई, आणि वरील सर्वांच्या असल्याच नात्यांचा गुंतवळा वाढत गेला. साहित्यांतहि नेमकें हेंच झालें आहे. प्रथम गद्य आणि पद्य ही जोडी होती. ( लिंगाकडे काणाडोळा करावा ) परंतु पुढें पद्यांतून महाकाव्य, काव्य, खंडकाव्य, प्रदीर्घ काव्य, कविता, किंचित् कविता, आरत्या, अभंग, लावण्या, पोवाडे, भजनें, स्तोत्रें इत्यादि अनेक फाटे निघाले. आणि गद्याचा गबाळ विस्तार

तर भलताच वाढला. कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, लघुनिबंध, निबंध, प्रबंध, लघुकथा, लघुतमकथा, रूपककथा, रहस्यकथा, नाट्यछटा, माती, मसण, दगड नि धोंडे. ( टीप : शेवटचे चार हे साहित्य-प्रकार नव्हेत. )

प्रत्येक साहित्य-प्रकार कसा हाताळावा किंवा कसा लिहावा हें मला या लेखांत सांगायचें आहे. ( च्या मारी ! मग ही कंथा कशाला ? ) मी हें सारें गृहिणीमित्र या स्वयंपाकशास्त्राच्या धर्तीवर सांगणार आहें. त्यामुळें कथनशैलींत अभिनवता येईल आणि स्वयंपाक करतां करतां बायकांनीं ही माहिती वाचली तर त्याहि हां हां म्हणतां फाडकन् लेखिका बनून जातील. ( अन् स्वयंपाक कोण—आपले '—'हे करणार काय ?—आगाऊ वाचक. )

मला वाटतें आतां आपण चुलीला पेटवण घालूं या.

* * *

## लघुकथा

( अर्थात् साहित्य–आमटी )

**साहित्य**—उत्तमपैकीं अर्धाशेर इंग्रजी रद्दी, ऑफिसांतून मारून आणलेले कागद अर्धा डझन, शाई, टाक इ.

**कृति**—अर्धा शेर इंग्रजी रद्दींत पॉकेट साईजचें एक पुस्तक बसतें. घरीं आल्यावर तें वाचीत पडावें. नडणाऱ्या शब्दांसाठीं डिक्शनरीचा आधार घ्यावा. नंतर मेंदूच्या सुपांतून तें पाखडावें. ज्या कथांचें भाषांतर करणें जमणार नाहीं, त्या कथा कोंडा, कचरा म्हणून टाकून द्याव्यात. राहिलेल्या कथा शिजवायला ठेवाव्यात. कथा शिजल्यावर तिला ' मौलिक–कथा ' या संज्ञेची फोडणी द्यावी. नंतर पाल्हाळाचें पाणी घालून ती पातळ करावी; आणि तींत पदरचें तिखटमीठ घालावें, मग, जणूं कांहीं स्वतःच लिहिली आहे अशा आनंदाची उकळी आली कीं, लघुकथेची आमटी तयार झाली असें समजावें. नंतर ' परस्पर–प्रशंसा–मंडळा 'तील मंडळींना ही आमटी चाखायला द्यावी.

" —कथेंतील संज्ञाप्रवाहाची व्यक्तांतून अव्यक्ताकडे तिरकस आत्मानु-भूतीच्या आशयानें, मखमली रात्रीच्या किरमिजी प्रकाशांतून अभिगमन करण्याची भावस्पर्शी, भावगंधी, उदात्त आणि मौलिक वाङ्मयाच्या मूल्य-मापनाच्या मानदंडाशीं संलग्न अशी प्रमाथी आणि परिणत प्रज्ञतेची अनुभूति प्रव्यक्त करणारी ही कथा किती सोपी आणि कोणालाहि सहज कळण्यासारखी आहे " असा या मंडळींचा अभिप्राय पडला कीं, आमटी माल झाली आहे असें खुशाल समजावें. असा अभिप्राय नाहीं पडला कीं आमटी अजून शिजायची आहे असें समजावें. तींत मनोव्यापाराचें पाणी घालून ढवळावें.

( टीप : इंग्रजी रद्दीची तुरीची डाळ आणतांना नीट पाहून आणावी मॉम् ( खरें म्हणजे मोघॅम ), मोपाँसा, चेकॉव्ह, टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्कि झ्वाइग या जातीच्या डाळी आणूं नयेत. यांची मऱ्हाटी आमटी ओरपून ओरपून लोकांना त्यांची खाणावळींतील आमटीइतकी धडकी भरलेली आहे. म्हणून दुसऱ्या डाळी. त्यांचीहि आमटी वाचकांना आवडावी. )

अशा प्रकारें आमटी तयार झाल्यावर तींतले सर्व पदार्थ विलायती नसून देशीच आहेत ना याची खात्री करून घ्यावी. म्हणजेच–तें विलायती सूप नसून देशी आमटीच आहे ना हें पहावें. मग मासिकांच्या द्रोणांतून रसिक वाचकांना खुशाल वाढावी. ( रेशनच्या जमान्यांत वाटेल तें भुरका-यची संवय झालेल्या वाचकांना ही आमटीहि आवडावी. )

( टीप : आजची बटाट्याची भाजी उरली कीं, दुसरे दिवशीं तिचे गरमागरम बटाटेवडे तयार होतात. पहा : ' आजचा मेनू ' हा हॉटेलां-तील ' ताज्या ' पदार्थांचा बोर्ड ) लघुकथेचेंहि तसेंच आहे. रेडिओकडून प्रेमपत्र आलें कीं, हीच छापून आलेली प्रेमकथा घ्यायची, तिच्यांत फेर-फाराचें आणि संवादाचें पीठ घालायचें आणि ' स्वतंत्र नाटिकेचे ' आमटीं-तील थालिपीठ ( हा नवीन खाद्यप्रकार. तोहि लोकांना आवडावा. ) लावून वाऱ्यावरून वाढावें. अन्न वाया जाऊं द्यायचें नाहीं ( तेंहि पर-ब्रह्मच. )

* * *

## कादंबरी

( अर्थात् साहित्य–पुरणपोळी. )

**साहित्य**—पाश्चात्य लेखकांच्या कादंबऱ्यांची पाव मण रद्दी, ऑफिसांतून लाटबंद मारून आणलेले कागद सुमारे एक ग्रोस, ( त्यांतील कांहीं कागद चि. बंड्या, चि. छबी यांनाहि उपयोगी पडावेत. ), डिक्शनरी ( न विसरतां ), शाई, टाक इ.

**कृति**—वरील रद्दी ( समजेल एवढी ) वाचून काढावी. न समजणारा भाग ( महत्त्वाचा नाहीं असें समजून ) खडे, कचरा समजून टाकावा. नंतर मेंदूच्या जात्यांत या कादंबऱ्या घालून त्यांचें मराठी पीठ तयार करावें. ( आयला ! गंमतच आहे ! ) नंतर ग्रामीण, प्रादेशिक, राजकीय, ऐतिहासिक किंवा सामाजिक समस्यांच्या पाण्यांत तें भिजवून चांगलें तिंबावें. ( म्हणजे चांगली ' कणीकच तिंबायची ' म्हणा ना. )

इकडे वर्णनाची हरभऱ्याची डाळहि शिजायला लावावी. शिजून झाल्यावर, सफाईदार आणि शैलीदार भाषेच्या वरवंट्यानें ती छानपैकीं वाटून काढावी. ( तात्पर्य, तिच्यावरून ' वरवंटा फिरवावा. ' ) वाटतांना तिच्यांत नायक–नायिकेच्या प्रेमाचा आणि गोड चुंबनांचा गूळहि घालावा. नंतर हें पुरण त्या कणकेंत घालून एकेका प्रकरणाची एक एक पोळी, कागदाच्या पोळपाटावर, शाईचें तेल लावून, लेखणीच्या लाटण्यानें लाटावी. नंतर ती दिवाळी अंकाच्या तापल्या तव्यावर भाजावी. ( ' तापल्या तव्यावर पोळी भाजतात ' तशी. ) नंतर पूर्वनियोजित स्तुतीचें लोणकढें तूप लावून वाचकांच्या पानावर गरम गरम असतांनाच वाढावी. ( गरम असतांना ती खायची काय टाप लागली आहे ? आणि थंड झाल्यावर चांगली लागायला पोळीची तरी काय टाप लागली आहे ? )

नंतर पुस्तकरूपी सहस्रभोजनांत ( म्हणजे हजार प्रती काढणें ) याच पोळ्या याच वाचकांना पुन्हा आग्रहानें वाढाव्यात. सार्वजनिक वाचनालयें आणि फुकटे वाचक यांना या शिळ्या पोळ्या फार आवडतात. या पोळ्या पांच–पांच, दहा–दहा वर्षेंहि टिकतात. ( विचारा कादंबरी प्रकाशित करून खड्डयांत पडलेल्या प्रकाशकांना. )

* * *

## ग्रामीण कथा

( अर्थात् साहित्य–खिचडी )

**साहित्य**—शेत किंवा मळा सुमारें वीस एकर, एक विहीर, मोट, बैल ज्वारीचें उभें पीक, रणरणतें ऊन, न्याहारीचें बोचकें, एक हैबती, एक धुर्पदी ( त्याची अस्तुरी )

**कृति**—शेत छानपैकीं नांगरून त्यांत ज्वारीचें पीक उभें करावें. प्रभात वर्णन, निसर्गवर्णन आणि शेतवर्णन या तीन वर्णनांच्या धोंड्यांची चूल मांडून तीवर कथेची तपेली चढवावी. या तपेलींत हैबतीचा मर्दपणा, धुर्पदीचा टचपणा ( ती उभार छाती, तें उफाडयाचें अंग इ. इ.), पांखरांचा चिवाचिवाट, मोटेचा कुंइ कुंइ आवाज, गांवांतील भांडणें, दोघांचें जिवापाड प्रेम, न्याहारीच्या वेळचें प्रेमप्रकरण ( " ...कारभारने, कांद्याची चट्णी लै ग्वाड झालीया... " "...अवो ! अवो ! कुनी बगत्याल कीं ! सोडा न्हवं... " इ० ), हैबतीच्या बापाला गांकऱ्यांकडून धमकी, मग हैबतीचें शौर्य, इत्यादि गोष्टींचे तांदूळ, डाळी, मसाला घालून ही कथा शिजवावी, शिजेपर्यंत मधून मधून तींत गांवांतील कुटाळकीचें पाणी ओतीत जावें. चांगली वाफ आली कीं तपेली खालीं उतरून ठेवावी. मग मासिकांच्या पत्रावळीवरून किंवा रेडिओच्या वाऱ्याच्या ताटांतून ही खिचडी वाढावी. ही ' ग्रामीन कथे 'ची खिचडी बहुजणसमाजाला फारच आवडते.

( टीप: वरील खिचडींत हैबती–धुर्पदी ऐवजीं गांवांतील इनामदारांचा मुंबईला शिकणारा अरविंदा आणि त्याची प्रेयसी घातली, आणि तीवर नागर-प्रेमाच्या नारळाचा कीस ( वाटल्यास KISS ) आणि सुसंस्कृत चावटपणाचें तूप सोडलें कीं ही खिचडी पांढरपेशा सुशिक्षितांनाहि आवडते. ( वाचा: गिरगांव आणि दादर येथील चाळींतील पांचव्या मजल्यावरील खोलींत बसून लेखकांनीं पाडलेल्या ' संपूर्ण वास्तववादी ' कथा ).

* * *

## नवकाव्य

( अर्थात् साहित्य—मटनाचा रस्सा )

**साहित्य :** पिपांत मेलेले उंदीर एक डझन, लूत भरलेलें एक कुत्रें, हाडकें दोन रत्तल, रक्त दोन शेर, मांसाचा लगदा चार रत्तल, अश्लील शब्द दोन डझन, भकासपणा दोन रत्तल, जीवनाची उबग वीस शेर, दुर्बोधता दहा शेर, जंतू दोन लाख.

**कृति :** एक डझन उंदीर घ्यावेत. ते ओल्या पिपांत आठ दिवसपर्यंत झाकून ठेवावेत. नंतर झांकण उघडावें. झक्कपैकीं दुर्गंधी आली कीं, उंदीर छान मुरले आहेत असें समजावें. हे उंदीर आणि लूत भरलेलें कुत्रें एका मोठ्या पातेल्यांत घालून जीवनाच्या उबगेच्या वीस शेर पाण्यांत शिजायला ठेवावें. रस्सा रटरटा शिजूं द्यावा. तोंपर्यंत इकडे गरम मसाल्याची तयारी करावी. मांसाचा लगदा दोन शेर रक्त मिसळून वाटावा. वाटतांना त्यांत थोडथोड्या प्रमाणांत दहा शेर दुर्बोधता मिसळावी. दुर्बोधता त्यांत एकजीव झाली म्हणजे दोन रत्तल भकासपणा मिसळावा. नंतर हा वाटलेला गरम मसाला रश्यांत घालावा आणि कसल्या तरी दांड्यानें तो रस्सा ढवळावा. थोड्या वेळानें त्यांत दोन रत्तल हाडकें सोडावींत, आणि मग दोन लाख जंतूहि सोडावेत.

हें सर्व घातल्यावर रस्सा आणखी कांहीं काळ रटरटूं द्यावा. शेवटीं त्यांत दोन डझन अश्लील शब्द आणि वाक्प्रयोग यांच्या झणझणीत मिरच्या टाकाव्यात. थोड्या वेळानें हा रस्सा चाखावा. तो न पचण्याइतपत झाला आहे असें वाटलें कीं, रस्सा तयार झाला असें समजावें, नंतर तो प्रथम कंपूमधील मंडळींना खायला द्यावा. तो मस्त झाला असल्याचें पूर्वनियोजित सर्टिफिकेट घ्यावें. मग महाराष्ट्रांतील रसिक वाचकांना तो वाढायला घ्यावा. या रश्यावर ताव मारतांना फारच मौज येते, ही अगदीं खरी कथा आहे.

मुंबईत मटनप्लेट हाउसें बरींच आहेत. ( उदा० ' ॐ धी न्यू शिवाजी दरबार मटनप्लेट हौस, ' ' धी न्यू जनता पब्लिक मटनप्लेट सदन, '

आबा भंडारी यांची 'धि मटन प्लेट खानावळ' इ० इ० ) या खाणावळींची मटनाचा रस्सा करण्याची पद्धति वेगळी आणि नवकाव्याचा मटनाचा रस्सा करण्याची पद्धति आगळी. फक्त 'श्रीकृष्ण भोजणालयां' तच हा रस्सा तयार होतो. विद्यार्थी क्रियापदांचा मुकटा नेसून सोवळ्यानें हा रस्सा वाढण्यांत येतो. महाराष्ट्रांत रसिक वाचक फारच थोडे असल्यामुळें हा रस्सा थोडयांच्याच वाटयाला येतो.

हा रस्सा खाऊन पोटाला तडस लागली म्हणजे या रश्याचा चर्चानामक पंचनामा करतांना फारच मौज येते.

( टीपः—रस्सा खाणाऱ्यांनीं बरोबर खिशांमधून तिरकस आशय, अभिव्यक्ति, डेप्थ, मर्यादा, संज्ञाप्रवाह, जीवनाच्या नैराश्याची विस्तृत व्याप्ति आणि विकृत तृप्ति, भावगंधाचा भावस्पर्श, निराशा आणि महत्त्वाकांक्षा यांचा सायको काटकोन, संवेदना आणि मूड यांचा व्युत्क्रम-कोन जीवन$^2$–सुख$^2$ = ( जीवन + सुख ) ( जीवन–सुख ) असलीं समीकरणें इत्यादि पाचक शब्द ठासून भरून न्यावेत; आणि चर्चा करतांना मधून मधून सोडून द्यावेत.

नवकाव्याचा रस्सा पचायला फार जड आहे. ( साला, हजम नहीं होता ! ) तो पचण्यासाठीं मागाहून चर्चा करावीच लागते. तरच तो पचतो.

* * *

## नाटक

### ( अर्थात् साहित्य-थालिपीठ )

**साहित्य** : इब्सेन, जेम्स बॅरी, मोलियर प्रभृति पाश्चात्य नाटक-कारांचीं वाचनालयांतून किंवा मित्रांकडून लांबविलेलीं इंग्रजी नाटकें, विद्यार्थ्यांच्या परीक्षांतील उत्तर-पुस्तिकांमधील पाठकोरे कागद सहा ते आठ डझन, डिक्शनरी, शाई, टाक, बिडया किंवा सिगारेट ५०० नग, वाढ-लेल्या दाढीचे खुंट इ. इ.

**कृति** : वरील श्रेष्ठ नाटककारांच्या नाटकांचें मराठी पीठ तयार करावें. त्यांत स्वतःच्या जादा अकलेचे कांदे चिरून घालावेत. नंतर पदरच्या पात्रांचा

मीठ मसाला घालावा. नंतर हें पीठ देशी वातावरणाच्या पाण्यांत कालवून तिंबावें. नीट तिंबून झाल्यावर कोणत्या तरी नाट्यमहोत्सवाच्या तव्यावर वशिल्याचें किंवा ' त्वयार्धं मयार्धं ' चें तेल लावून थालिपीठ थापावें. मग रंगभूमीच्या चुलीवर हा तवा प्रेक्षकांच्या तिकीटरूपी ताटानें झांकावा. वाफ येऊं द्यावी, तीन तासांत फक्कडपैकीं थालिपीठ तयार होतें. मग हें थालिपीठ पुढच्यांतील लोकांच्या आणि लेखकांच्या स्तुतीचें लोणी लावून लावून वाढावें. या थालिपीठाची रुचि उच्च अभिरुचीच्या रसिकांसच ज्ञात होण्याजोगी आहे. म्हणून तें पुढील रांगांतील लोकांनाच वाढायला बरें आहे.

" वा ! हें नाटकच जणूं कांहीं मूळ ( ओरिजिनल ) असून जेम्स बॅरीनेंच त्याचा अनुवाद केला आहे असें वाटतें ! " असे मार्मिक उद्गार ( समयोचित आणि फ्री पासाला जागून ) मर्मज्ञ साहित्यिकांनीं काढले कीं थालिपीठाचा बेत झक्क जमला आहे असें समजावें. थालिपीठ मस्त झालें आहे कीं नाहीं हें समजायला एवढीच कसोटी आहे.

या थालिपीठांत अकलेच्या कांद्यांऐवजीं बेअकलेचा भोपळाहि घालतात. अर्थात् त्याचीहि रुचि आगळीच ! तेंहि रसिकांना आवडावें.

* * *

## गूढ आणि प्रतीकात्मक काव्य

( अर्थात् साहित्य–सार )

**साहित्य :** संस्कृत-मराठी शब्दकोश. कागदाचे कपटे, शाई, टाक, पिंपळाचें झाड, श्रावणांतली झड, युगेंयुगें, अनंत, व्योम, दिशांदिशांतुन इत्यादि ( उडाणटप्पू शब्द ) आणि कवीचें डोंबलें.

**कृति**—दुर्बोध प्रतीकाचें पातेलें मुक्तछंदाच्या चुलीवर ठेवावें. तींत गूढतेचें तूप आणि क्लिष्टतेचे जिरें घालून चुरचुरीत फोडणी तयार करावी. मग त्या पातेलीमध्यें वाचकांच्या बापासहि न कळणाऱ्या ' खोल आशयाचें ' पाणी दाबून ओतावें. पाणी उकळूं लागलें कीं, कवीला जें कांहीं डोंबलें सांगायचें आहे त्या डोंबलाचीं संस्कृत–मराठी आमसुलें त्यांत घालावीत. मग त्यांत पारावर सळसळणाऱ्या पिंपळपानांचा कढीलिंब घालावा.

मनाच्या कप्प्यांत खोल रुतून बसलेल्या विस्मरणाच्या स्मृतीचे आलें ठेचून घालावें. ‘ युगायुगांतुनि ’ व्योमाच्याहि पलीकडे ! अनंत काला अन् दिक्पाळा । ठोकर मारुनि तुटली तंगडी । ’ इत्यादि शब्द आणि वाक्य-प्रयोगाचा मीठ—मसाला घालावा. ( अलगुजासारख्या फुंकून वाजवायच्या वाद्यांतून ‘ सूर ’ छेडण्याच्या अभिनव शोधाची मिऱ्यांची पूडहि घालावी. ) हें सार बराच वेळ उकळूं द्यावें. नंतर कवीनें चमचाभर सार चाखून पहावें खुद्द त्यालाहि त्याची चव कळली नाहीं कीं साराची भट्टी ‘ ए वन् ’ जमली असें समजावें. मग पातेलें खालीं उतरावें. नंतर मासिकांच्या वाटीं-तून रसिक वाचकांना प्राशन करायला द्यावें. महाराष्ट्रांत जे अगदीं थोडे रसिक आहेत त्यांना हें सार भुरकतांना फारच मौज येते. तुम्हांला कदा-चित् खोटें वाटेल, परंतु ही अगदीं सत्यकथा आहे ( खटावकरांच्या खाणा-वळींतील ठेकेदार मेंबरांना विचारा. )

* * *

## नवकथा

( अर्थात् साहित्य—पुलाव )

**साहित्य**—उलट्या खोपडीच्या कल्पना दोन डझन, अश्लीलपणा दोन शेर, मनोविश्लेषण दहा शेर, दुर्बोधता पंधरा शेर, विकृति पांच शेर, चमत्कारिक उपमा दोन रत्तल, सावळा गोंधळ वाटेल तेवढा, कागद, शाई इ.

**कृति**—वाङ्मयीन नवयुगाच्या तपेलींत पंधरा शेर दुर्बोधतेचें पाणी घालावें. पाण्याला आधण आलें म्हणजे त्यांत दहा शेर मनोविश्लेषणाचे तांदूळ घालावेत. तांदूळ अर्धवट शिजले म्हणजे त्यांत दोन शेर अश्लील-तेचा फ्लॉवर चिरून ( किंवा चीरफाड करून ) घालावा, चमत्कारिक उपमांचे ओले वाटाणे दोन रत्तल घालावेत. ( उदा० “ मेंदूच्या बरणींतून आठवणीच्या लोणच्याची फोड काढली, ” “ प्रेमभंगाच्या काट्यानें त्याच्या हृदयाची सायकल पंक्चर झाली.” इ० )

थोड्या वेळानें, ‘ दीर—भावजयीचें मनोव्यापारांतून झालेलें प्रेमप्रकरण ( किंवा प्रेम आणि ‘ प्रकरण ’ ), नवरा आणि धाकटी मेहुणी ( भिन-

लग्नाची ) यांची समस्या, वीस वर्षांचा तरुण आणि पस्तीशीच्या पुढची टुमटुमीत पोटाची सुखासीन पुरंध्री यांचें! ( मनोविश्लेषणात्मक ) आगळेंच लफडें इत्यादि सांवळ्या गोंधळाचा मसाला या पुलावांत वाटेल तेवढा घालावा. अधिकस्य अधिका रुचिः।

पुलाव अशा प्रकारें तयार झाल्यावर तो वाढायला घ्यावा. परस्परांची मुक्तकंठानें स्तुति करणाऱ्या ( अर्थात् समोरासमोर. पाठीमागें नव्हे. ) साहित्यिकांचीं पानें मांडावींत आणि पुलाव वाढावा. वाढल्यावर त्यावर विकृतीच्या खोबऱ्याचा कीस घालावा, पुलाव खात असतांना ब्रह्मदेवाच्या खापरपणजालाहि कळणार नाहीं अशा भयंकर गूढ भाषेंत पुलाव-चर्चा साहित्यिकांत सुरू झाली कीं, पुलाव क्लास झाला आहे असें समजावें.

* * *

## किंचित्-कविता

### ( अर्थात् साहित्य-चटणी )

**साहित्य** : श्री. वि. आ. बुवा यांच्या किंचित् कवितांच्या लंगोट्या, टेबल-कॅलेंडरच्या बाद तारखांच्या कागदांचे कपटे, पेन्सिलीचें थोटुक, पाव तोळा कल्पकता, एक तोळा भिकार अनुकरण, $\frac{1}{2}$ तोळा चिंतनीय विचार, अर्धा तोळा मिस्किलपणा.

**कृति** : बुवांच्या निवडक भिकार किंचित् कवितांच्या अनुकरणाचें खोबरें पाव रत्तल घ्यावें. तें आपल्या बेअक्कलेच्या पाट्यावर ठेवून त्यावर स्वतःच्या भिकारपणाचा वरवंटा फिरवावा. त्यांत पाव तोळा कल्पकतेचें मीठ घालावें, चिंतनीय विचाराच्या मिरच्या अर्धा तोळा घालाव्यात, कल्पनादरिद्री अनुकरणाचा लसूण एक तोळा वास येण्यासाठीं ( अर्थात् अनुकरणाचा वास ) घालावा. हे सर्व पदार्थ घातल्यावर पुन्हा नीट वरवटा फिरवावा. किंचित् कवितेची छान चटणी होते. मग ती मासिकांच्या 'पानां'वर ( श्लेष ) डाव्या बाजूच्या कोपऱ्यांत वाढावी. तिखट खाल्लें कीं शिवी हसडायची या मानवी स्वभावास अनुसरून किंचित् कवितेच्या चटणीला एक चांगली हडसून शिवी मिळाली कीं चटणी फक्कड झाली आहे असें समजावें.

( टीप—किंचित् कवितेचा आकार शब्दांचें पाणी घालून वाढविला कीं, लगेच तिचें आख्या कवितेच्या आमटींत रूपांतर होतें. ) " मला डिक्शनरी द्या मी तुम्हांला काव्यच काय महाकाव्याचा बाप देतों. " असे तेजस्वी उद्‌गार एका मेकॅनिकल इंजिनीअरानें काढले आहेत.

अस्तु ! ' लेखणी मित्र अथवा हजार साहित्य पाकक्रिया ' या शीर्षकाखालीं मीं अल्पमतीनें मला माहीत असलेल्या कांहीं साहित्य-पाक-कृती दिल्या आहेत. अन्न हें परब्रह्म ! साहित्य—अन्न हेंहि परब्रह्म ! त्याचें सेवन लोकांस सुखदायक घडावें.

खरें म्हणजे बोलल्याप्रमाणें हजार पाकक्रिया द्यायला पाहिजे होत्या. परंतु बोलल्याप्रमाणें वागायचे हे दिवस का आहेत ? (विचारा : तसें वागून खड्डयांत पडलेल्या लोकांना ) म्हणून थोडक्यांत हा खटाटोप. तोहि रसिकांना आवडावा. ' चार शब्द ' या सोज्ज्वळ सबबीखालीं चार हजार शब्द जसे प्रस्तावनेंत वाढतात त्याच चालीवर परंतु उलट्या पद्धतीनें हजार पाक—क्रियांचा फापट पसारा आठ दहा पदार्थांच्या कृतींतच आणून त्याला आटोपशीर रूप दिलें आहे.

मुख्य पदार्थ कसे बनवायचे (आणि नंतर वाचकांना कसें बनवायचें) हें वर सांगितलें आहेच. मराठी लोक जात्याच हुषार. ता म्हटलें कीं ताकभात हें त्यांना लगेच ज्ञान होतें. याच पद्धतीनें ते अनेक पदार्थ तयार करतील. जास्त पदार्थ येथें दिल्यास वाचकांना अजीर्ण होईल. म्हणून हें एवढेंच पुरे.

ही साहित्य पाकक्रिया म्हणजे अभिनव प्रकार, बहुतांना हा साहित्य-प्रकार पाहून अचंबा वाटावा. ( साहजिकच आहे. ऐसें कदापि घडलें नव्हतें. )

साहित्याचा स्वयंपाक वर तयार आहे. या दिवाळी अंकाच्या ताटांतून ( आतां पुस्तकाच्या ताटांतून ) हा नैवेद्य वाढून मी तो श्रीमन्महाराष्ट्र-शारदेला समर्पण करतों. ( रॉजर्सचा सोडा अडीच आण्यांत मिळतो. )

* * *

# ७ बुवा-वाणी

भारताची प्राचीन परंपरा ही तत्त्वजिज्ञासूंची, मोक्षमार्गावरील वाटसरूंची आहे आणि त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रीयांच्या मनावर भगवद्गीतेंतील विचारांचा फार पगडा बसला हा विचार भागवतधर्माच्या तीर्थक्षेत्रीं वास करीत असल्यानें माझ्या मनांत कोठें तरी दडून राहिलेला होता. कोयनेला-भोंवती साखरेचें अवगुंठन असलें म्हणजे लहान मुलेंहि तें हौसेनें घेतात. त्याचप्रमाणें



भारतांतील बहुसंख्य जनतेला कोणतीहि विचारसरणी सांगावयाची म्हणजे तिला धार्मिक भाषेचें आणि वृत्तीचें आवरण पाहिजे, हेंहि मला पटूं लागलें होतें. राजकीय व्यासपीठापेक्षां धार्मिक व्यासपीठाभोंवतीं जमणारीं माणसें अधिक भावनाशील व श्रद्धाशील असतात, हेंहि मीं पाहिलें होतें. व्याख्यानाला उभा राहून श्रोत्यांकडून टाळ्या आणि हार घेण्यापेक्षां प्रवचनकार-बुवा म्हणून कपाळाला बुक्का लावून घेणें आणि श्रद्धाशील पुरुष व भगिनी-वर्गाच्या कायमच्या आदरभावाचा धनी होणें हेंच मला अधिक मोलाचें वाटेल. त्या दिवशीं रात्रीं अंथरुणावर पडल्यावर हेच विचार माझ्या डोक्यांत पिंगा घालीत होते. लेखक बुवा प्रवचनकार बुवा होणार या सुखद कल्पनेनें मी झोंपी गेलों आणि—

स्वप्नांत मीं एक महान् वटवृक्षाच्या प्रशस्त पारावर बसलों होतों.

कर्मजिज्ञासु, ब्रह्मजिज्ञासु असा जनसंमर्द पुढें बसला होता. एका बाजूला भगिनी होत्या. ( त्यांच्या त्यांच्या भावांच्या )

मी सर्वांना म्हणालों,

' आजचं प्रवचन आतां आटोपलं आहे. आतां कुणाला निरनिराळ्या विषयांवर प्रश्न विचारायचे असल्यास त्यांनीं ते विचारावेत.'

असें म्हणून मी लोकांकडे तेजःपुंज दृष्टीनें पाहिलें.

एकजण उठून म्हणाला,

' गुरुजी, एक प्रश्न विचारूं का ? '

' मी तेंच सांगितलंय आतां.' मीं कांहींसं खोंचकपणें म्हणालों.

' जगात परमेश्वर आहे काय ? '

' नसायला काय झालंय ? आहेच कीं तो ! आपल्याला ज्या गोष्टी दिसत नाहींत त्या अजिन्नात नाहींत असें म्हणणें तर्काला सोडून आहे. एक भिकारी होता तो नेहमीं ओरडून सांगे ' या जगांत शंभर रुपयांची नोट नाहींच मुळीं ! ' तें ऐकून एकदां एका माणसानें त्याला विचारलें, ' तूं हें भलतंच काय म्हणतोस ? शंभराची नोट कुठंहि मिळते; दिसते. ती नाहीं असं कसं तूं म्हणतोस ? ' तेव्हां भिकारी म्हणाला, ' मीं अजून उभ्या जन्मांत ती कधींहि पाहिलेली नाहीं. मग मीं तिचं अस्तित्व मानावं तरी कसं ? '

' वरील भिकाऱ्याप्रमाणेंच परमेश्वर ज्यांना दिसला नाहीं ते भिकारी होत; कर्मदरिद्री होत. तो दिसला नाहीं याचं कारण ' तो नाहीं ' हें नसून, आपण ज्ञान-दरिद्री आहोंत हें होय. आपल्याला परमेश्वर—दर्शनरूपी शंभराची नोट अजून मिळाली नाहीं; दिसली नाहीं.'

दुसऱ्या एकानें विचारलें,

' महाराज, जगांत नेहमीं युद्धं कां होतात हें सांगाल काय ? '

' युद्धं हीं भगवान् श्रीकृष्णाच्या म्हणजेच प्रत्यक्ष परमेश्वराच्या आदेशानं होतात. '

' तें कसं काय ? ' त्यानें मध्येंच पृच्छा केली.

‘ गीतेंतच श्रीकृष्णांनीं, “ ततो युद्धाय युज्यस्व ” असा अर्जुनाला आदेश दिलेला आहे. म्हणून तर अर्जुनाप्रमाणेंच सामर्थ्यवान् असलेलीं बडीं राष्ट्रें नेहमीं कांहीं ना कांहीं तरी खुसपट काढून युद्ध करीत असतात ! ’

‘ तरी पण युद्ध करणं हें क्षुद्र बुद्धीचं लक्षण नव्हे काय ? ’ मध्येंच प्रश्न विचारण्याची खोड असलेल्या या माणसानं मला विचारलें.

‘ तसं मुळींच नाहीं. उलट श्रीकृष्णांनीं, ‘ क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ’ असाच लढायला नेट देणारा आदेश दिलेला आहे.’

‘ पण या युद्धांतून पापाच्या राशीच निर्माण होणार नाहींत काय ? ’ माझें उत्तर संपावयाच्या आंतच त्या माणसानें मध्येंच तोंड खुपसून प्रश्न विचारला.

‘ यांत पाप मुळींच नाहीं. कसं तें पहा. ‘ हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् ’ म्हणजे ‘ युद्धांत मेलास तर तुला स्वर्ग मिळेल ’ अशी श्रीकृष्णांनीं हमी देऊन ठेवलेली आहे. तेव्हां या अवनीतलावरील अधिकांत अधिक लोकांना ( नरकाची प्राप्ति न होतां ) स्वर्गांत सुंदरपैकीं जागा मिळावी या उदात्त हेतूनं बडीं युध्यमान राष्ट्रें महायुद्धें घडवून आणून, असंख्य लोकांना स्वर्गांत जागा मिळवून देण्याचं महत्पुण्य पदरीं बांधून घेत असतात. हल्लींच्या जागेच्या टंचाईच्या दिवसांत, स्वतःची बिल्डिंग असलेला सासरा आपल्या जांवयाला देखील जागा द्यायला कांकू करतो. अशा स्थितींत स्वर्गासारखी ‘ सर्व सुखसोय ’ युक्त अशी जागा मिळवून देणारीं युध्यमान राष्ट्रें आणि महायुद्धें केवढं पुण्यकार्य करीत आहेत ! ’

‘ स्वभाव हा कायम राहणारी गोष्ट आहे कीं, परिस्थितिप्रमाणें बदलणारी गोष्ट आहे ? ’ दुसऱ्या एका श्रोत्यानें मला प्रश्न विचारला.

‘ स्वभाव बदलत नाहीं असं आपण नेहमीं म्हणतों. पण तें खोटं. उलट स्वभाव बदलल्याशिवाय रहात नाहीं, असं म्हणणच अधिक उचित होईल. ’

‘ याचं थोडसं स्पष्टीकरण करून सांगाल काय ? ’ त्यानें विचारलें.

‘ होय. आपलं नारळाचंच उदाहरण घ्या. नारळ झाडावर जेव्हां फळाचा आकार घेतो तेव्हां आंत फक्त पाणीच असतें. दुसरें कांहींहि

नसतें. तें पाणीहि मधुर असंच असतं ! तहान शमविणारं असतं; श्रमांचा परिहार करणारें असतें. पुढें त्या पाण्याची जागा हळूहळू खोबरें घेतें. कालांतरानं आंतलं पाणी नाहींसं होऊन सुकं खोबरं तेवढं शिल्लक राहतं. तें खोबरं घाण्यांत घालून आपण त्याचं तेल काढतों. तें तेल कढईत घालून आपण उकळायला ठेवलं आणि त्यांत जर पाण्याचे चार थेंबच टाकले तर काय होतं ? तें तेल 'चुर्र ऽ ऽ' असा आवाज करून पाण्या-वर किती गरम होतं ! पाण्याला आपल्यांत सामावून न घेतां आपल्या उष्णतेनं त्याचा नाश करून टाकतं. ही झाली गरम तेलाची गोष्ट. परतु थंड तेलांत जर आपण पाणी टाकलं तर तिथंहि पाण्याला खालीं दाबून आपण वर रहाण्याची तेलाची प्रवृत्ति दिसून येते. हें तेल तरी मूळ कोण होतं म्हणा पाणीच ना ? पण पुढं पुढं स्थित्यंतर होत गेलं तें पहा. स्वभावाचहि असं आहे. आपला मूळचा स्वभाव आपल्याला प्राप्त होणाऱ्या परिस्थितीप्रमाणें बदलत जाऊन तो इतका बदलतो कीं कधीं कधीं वरील तेल–पाणी न्यायानं आपल्या मूळच्या स्वभावाला तो मारकहि ठरेल.'

'दारिद्र्याचं कोडं कसं सोडवावं ?' एका गरिबानें विचारलें.

'शब्दकोडं सोडवून.' मीं उपाय सुचविला.

हें ऐकतांच श्रोतृसमाजांत हास्याची एक लकेर उमटली.

'कठोर हृदयाचा मनुष्यहि कधीं मृदुता दाखवूं शकतो काय ?'

'न दाखवायला काय झालं ? एक तुरुंगाधिकारी होता. तो इतका कठोर हृदयाचा, निर्दय होता कीं, तुरुंगांत आलेले बडे बडे चोर, दरोडे-खोर, डाकूसुद्धां त्याला पहातांच चळचळां कांपायचे. त्याला एक चार वर्षांची मुलगी होती. ती फारच गोड आणि सुंदर होती. तो अधिकारी एकदां बाहेर जायला निघाला असतांना त्या मुलीनें त्याच्या धोतराचं टोंक घट्ट धरून ठेवलं आणि हट्टानं 'जाऊं नका बाहेर !' असं ती म्हणूं लागली. त्या चिमुकल्या पोरीचं घट्ट धरणं तें काय ? एवढा महा-विक्राळ अधिकारी एक पाऊल कांहीं पुढं टाकूं शकला नाहीं ! एक हिसडा दिला असता तर त्या मुलीचा हात सहज सुटला असता. परंतु हें बंधन

साधं नव्हतं. स्नेहबंधन होतं. तिथं शक्ति अपुरी पडते. आणि कठोर माणूसहि या ठिकाणीं स्नेहमय होऊन गुंतून राहतो.'

'ज्ञानेश्वरींत याच मुद्द्यावर फारच सुंदर दृष्टांत दिलेला आहे. ऐका त्या ओव्या.

> जैसा भ्रमर भेदी कोडें । भलतैसे काष्ठ कोरडें ।
> परि कमळकळिकेमाजी सांपडे । कोंवळिये ॥
> तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणें ।
> ऐसें कठिण कोंवळेपणें । स्नेह देखा ॥

'भुंगा अत्यंत कठीण लांकूड सुद्धां सहज पोखरून टाकूं शकतो हें आपल्याला माहीतच आहे. एकदां काय झालं? हा भुंगा एका कमलाच्या फुलांत जाऊन बसला. तें कमळ सूर्यास्ताच्या वेळीं आपोआपच मिटलें. आणि भुंगा आंत अडकून बसला. आतां बाहेर कसं यायचं? लांकूड पोखरून टाकणाऱ्या भुंग्याला हें कमळदळ फाडून यायला काय कठीण होतं? सहज शक्य होतं तें. पण त्यानं तो मार्ग अवलंबिला नाहीं. कमल-पुष्पाच्या ठिकाणीं त्याचे प्रेमसंबंध गुंतलेले होते. तो कमळाशीं स्नेहरज्जूनें बांधला गेला होता. म्हणून कमळाला यत्किंचित्‌हि इजा करायला तो राजी नव्हता. प्रसंग बांका आला. सूर्योदय होईपर्यंत कमळ उमलण्याची शक्यता नाहीं. आणि तोंपर्यंत आंत गुदमरून जायची पाळी येणार! पण कमळदळ फाडून बाहेर यायचं नाहीं असं त्यानं ठरविलं आणि तो आंतच राहिला. याला म्हणतात स्नेहबंधन! आपण ज्याला अतिशय कठोर म्हणतों अशा व्यक्तींचा कोमलपणाहि तितकाच महान् असतो. भुंग्याच्या गोष्टीवरून तुम्हांला हें पटलं असेलच.'

'भूदानानं देशांतलं दारिद्र्य नाहींसं होईल काय?'

'दारिद्र्य नाहींसं होईल कीं नाहीं हें नेमकं सांगतां येणार नाहीं.' मी म्हणालों, 'परंतु श्रीमंती मात्र नाहींशी होईल.'

'साम्यवादाची व्याख्या काय?' एका श्रोत्यानें विचारलें.

'सर्वांनीं एकाच पातळीवर दरिद्री रहाणें.' मी तत्परतेनें म्हणालों.

'मुंबई शहराचं भूदान करावं काय? केल्यास हें दान कुणीं कुणास करावें?' हलवायाच्या दुकानावर तुळशीपत्र ठेवणाऱ्या एका महाभागानें मला पेंचांत टाकण्यासाठीं प्रश्न विचारला.

'खरं सांगायचं म्हणजे मुंबईला भूदानाच्या चळवळींतून वगळलंच पाहिजे. कारण मुंबईचं दान कुणीं कुणास द्यायचं हाच तर इथं महत्त्वाचा मुद्दा आहे. दान महाराष्ट्रानं द्यायचं म्हटलं तर सध्यां ती गुजरातच्या मालकीची आहे असा अर्थ होतो आणि महाराष्ट्रानं दान द्यायचं म्हटलं तर हातची मुंबई आपण होऊन गुजरातला द्यावी लागेल! म्हणून मुंबई शहर भूदानांतून वगळावं हेंच उत्तम' मीं खुलासा केला.

'जगांत माणसांच्या जाती किती आहेत?' एकानें जातीय प्रश्न विचारला.

'दोनच! एक सज्जनांची आणि दुसरी कम्युनिस्टांची!' मीं उत्तर दिलें.

'परमेश्वर आणि मालेन्कॉव्ह यांच्यांत कांहीं साम्य आहे काय?' एका साम्यवाद्यानें मला विचारलें.

'आहे तर! हे दोघेहि लोकांच्या दृष्टीला कधींच पडत नाहींत आणि त्यांचं अस्तित्व मात्र विश्वांत आणि कम्युनिस्ट राष्ट्रांत पदोपदीं प्रकर्षानं जाणवतं.' मी म्हणालों.

'निष्काम कर्मयोग करायचा असल्यास काय करावं?' एका कर्म-जिज्ञासूनें विचारलें.

'बिनपगारी नोकरी करावी' मीं उपाय सुचविला.

'ब्रह्म सत्य आहे काय?' एका ब्रह्मजिज्ञासूनें विचारलें.

'तें अधिकृतरीत्या कुणाला खोटं आहे असं ठरवितां आलं नाहीं, तोंपर्यंत तें सत्य आहे असं म्हणायला हरकत नाहीं.' मी मखलाशीनें उत्तर दिलें.

'जगांत सत्यें किती आहेत.?' एका सत्यवानानें मला विचारलें.

'कमींत कमी दोन आणि तें भांडणाऱ्या दोन पक्षांपैकीं प्रत्येकाकडे एक एक असतं.'

'लोकांच्या मनोरंजनासाठीं आपली काया रात्रंदिवस सार्थकी लावणाऱ्या व्यक्तीस आपण काय संज्ञा द्याल ?' एकानें विचारलें.

'वेश्या !' मी चटकन् बोलून गेलों आणि मागाहून जीभ चावली. पण तेवढ्यांतूनहि कांहीं टारगट श्रोते हंसलेच !

'जीवन म्हणजे काय ?' एका जगूं इच्छिणाऱ्यानें प्रश्न केला.

'भगवद्गीतेंत, 'अव्यक्तादीनि भूतानि...' या श्लोकामध्यें श्रीकृष्णांनीं 'नसणें आणि नाहींसें होणें याच्या दरम्यानचा काळ म्हणजे भूतमात्रांचें जीवन' अशी जीवनाची व्याख्या दिलेली आहे हेंच म्हणणें आधुनिक उदाहरणानं स्पष्ट करून सांगतों 'मॅटर्निटी हॉस्पिटल आणि सार्वजनिक हॉस्पिटल यांच्या दरम्यानचा काळ म्हणजे जीवन होय !' मीं सांगितलें.

तें ऐकतांच श्रोत्यांतील डॉक्टरांनीं एकमेकांकडे ब्रह्मदेव आणि यम याच्या भूमिकांतून पाहिलें.

'अक्षर–वाङ्मय कोणतं ?' एक साहित्यिक श्रोत्यानं प्रश्न विचारला.

'अंकलिपीचं पुस्तक !' मीं उत्तर दिलं. कारण त्या पुस्तकांतले अंक आणि अक्षरं हींच काय तीं जास्तींत जास्त वर्षं चालत आलीं आहेत आणि पुढंहि असंख्य वर्षं चालत रहाणार आहेत.

'गरिबांनीं गरिबांकडून मदत घ्यावी कां श्रीमंतांकडून ?' एका गरजू माणसानें मला विचारलें.

'अर्थात् श्रीमंतांकडून. गरिबांकडून मदत घेतल्यास ती देणारा गरीब अधिकच गरीब होईल. एकदां काय झालं, समोरासमोरून दोन भिकारी येत होते. एकाच्या अंगावर लंगोटी होती आणि दुसरा संपूर्ण दिगंबरावस्थेंत होता. त्या दिगंबरानं लंगोटीवाल्याकडे कपड्याची याचना केली. त्या दिगंबर भिकाऱ्याची गरीबी पाहून लंगोटीवाल्या भिकाऱ्याला त्याची दया आली; आणि त्यानं आपली लंगोटी काढून त्याला दिली. या दानधर्मामुळें आपण स्वतःच भिकारी झालों हें मात्र तो विसरला म्हणून मदत किंवा दान घ्यायचं तें नेहमीं श्रीमंताकडूनच घ्यावं.'

'ऊर्ध्वमूलमधः शाखा' असं गीतेंत म्हटलेलं आहे म्हणजे काय !' एका उलट्या खोबडीच्या माणसानं मला विचारलें.

' या संसाररूपी अश्वत्थवृक्षाचं, सर्वोत्तम ब्रह्म हें ' मूळ ' असून तें ' ऊर्ध्व ' म्हणजे सर्वश्रेष्ठ आहे आणि माया ही त्याची शाखा असून ती ' अधः ' म्हणजे खालीं आहे म्हणजेच निकृष्ट आहे. नाथांच्या घरची खूण- सुद्धां अशीच उलटी आहे. हाच मुद्दा आधुनिक उदाहरणांनीं स्पष्ट करून सांगतों. एखाद्या इमारतीचा पाया रचणं किंवा तिचा दरवाजा उघडणं, हीं गवंड्याचीं किंवा नोकरांचीं कामं होत. परंतु पायाभरणी किंवा उद्घा- टनाच्या निमित्तानं आपले श्रेष्ठ मंत्री हीं कामें करीत असतात. आणि याच्या उलट गोष्ट सांगतों. किराणा मालाचा दुकानदार, ऑफिसचा शिपाई किंवा हमाल, हीं माणसं सामान्य असूनहि त्यांना हल्लींच्या राज्यांत सभेचें अध्यक्षस्थान दिलं जातं, त्यांच्या हस्तें ध्वजारोहण होतं आणि उद्घाटनहि होतं. जे वरच्या जागेवर असतात त्यांनीं निकृष्ट कामं करायचीं, आणि जे निकृष्ट असतात त्यांनीं वरच्या लोकांचीं कामं करायचीं ही आपल्या राज्यांतली पद्धत म्हणजेच 'ऊर्ध्वमूलमधः शाखे'च उदाहरण होय !, मीं सोदाहरण पटवून दिलें.

' सर्वांत उत्तम राज्यपद्धति कोणती ? ' एका राजकारणी महाभागानें मला प्रश्न विचारला.

कोणतीच राज्यपद्धति नसणं ही सर्वांत उत्तम पद्धति आहे. कोणत्याहि पद्धतीच्या राज्यकर्त्यांच्या कायद्यांवाचून आणि दंडुक्यावाचूनहि समाजरचना सुरळीत चालत राहिल्यावर कसलीहि राज्यपद्धति पाहिजेच कशाला ? '

' लोकशाही राज्यपद्धतींत कांहीं दोष आहेत काय ? ' एका निवडून आलेल्या आमदारानें मला विचारलें.

' होय. एक महादोष आहे. तो म्हणजे लोकशाहींत मूर्खांच्या प्रतिनि- धींना बहुमत मिळून राज्य करण्याचा अधिकार मिळतो. जगांत मूर्खच बहुसंख्य असतात आणि लोकशाहींत बहुसंख्यांकांचेंच सरकार असतें. यावरून मी काय म्हणतों तें ध्यानांत आलं असेलच. '

' कम्युनिझमचं भवितव्य काय ? '

' त्यांचा वरचेवर बदलणारा सर्वशक्तिमान् परमेश्वर ठरवील तें. तोच त्यांचा कर्ताकरविता आहे.'

अनुक्रम
विभाग ७७
क्रमांक

‘ बुद्धि श्रेष्ठ कीं श्रद्धा श्रेष्ठ ? ’ एका ‘ बुद्धिजीवि ’ माणसानें विचारलें.

‘ अर्थात् श्रद्धा श्रेष्ठ आहे. ’ मीं बुद्धिवाद्याची जिरवीत म्हटलें, ‘ म. गांधी म्हणत असत कीं, जिथं बुद्धि संपते तिथून श्रद्धा सुरू होते. हाच सिद्धांत आणखी थोडासा ताणून असं म्हणतां येईल : जिथं मूर्खपणा संपतो तिथून बुद्धि सुरू होते ! आणि जिथं बुद्धि संपते तिथून श्रद्धा सुरू होते ! आतां असं पहा, जगांतला बहुतेक मूर्खपणाच अजून संपलेला नाहीं. तो संपल्यावर—अर्थात् संपला तरच—बुद्धि सुरू होणार. आणि मग बुद्धि संपल्यावर श्रद्धा सुरू होणार. म्हणजे तें जवळ जवळ अशक्यच आहे. आणि अशक्य गोष्ट शक्यापेक्षां केव्हांहि श्रेष्ठच असते. यावरून बुद्धीपेक्षां श्रद्धा श्रेष्ठ आहे हें आपोआपच सिद्ध होतें. ’

‘ जगांत शहाणा कोण आहे ? ’ एका स्वतःला शहाणा समजणाऱ्यानं मला प्रश्न विचारला.

‘ तसं पाहिलं तर जगांत शहाणा कुणीच नाहीं. स्वतःला किंवा दुसऱ्याला जेव्हां आपण शहाणे समजतां तेव्हां, जे कमी मूर्ख आहेत त्यांना शहाणे म्हणतों, असा अर्थ घ्यायचा असतो. कारण मूर्खपणा हा आपला स्थायीभाव असून चुकणें हा स्वभाव आहे ’ मीं शहाणपणाची मीमांसा केली.

‘ घरदार करून राहिलं म्हणजे जीवनाला स्थैर्य आलं असं समजायला कांहीं हरकत आहे काय ? ’ एका घरवाल्या मालकानं मला विचारलें.

‘ अर्थात् ही चुकीची कल्पना आहे. याला स्थैर्य म्हणतां येत नाहीं. घर करणं ही तें गहाण टाकण्याची किंवा विकण्याची पूर्वतयारी आहे. घरदार करून रहाण्यालाच आपण, ‘ स्थैर्य प्राप्त झालं ’ असं अदूरदर्शीपणानं म्हणतों. आपल्याला कावळा—चिमणीची गोष्ट माहीत आहे. कावळ्यानं आपलं घर शेणाचं बांधलेलं होतं आणि चिमणीनं आपलं घर मेणाचं बांधलेलं होतं. दोघांनींहि घरं बांधलीं होतीं म्हणून तीं खुषीत होतीं. परंतु उन्हाळ्यांत बांधलेलं आपलं शेणाचं घर पावसाळ्यांत वाहून

जाणार याची कावळ्याला जाणीव नव्हती आणि हिवाळ्यांत बांधलेलं आपलं मेणाचं घर उन्हाळ्यांत वितळून जाणार याची चिमणीलाहि जाणीव नव्हती, आपल्या घराचीहि हीच अवस्था असते याचा प्रसंग येईपर्यंत आपल्याला विसर पडतो.

' भारताचा उद्धार कसा होईल? ' विधायक कार्याची कोरडी आस्था बाळगणाऱ्या एका महोदयानें मला विचारलें.

' असले रिकामटेकडे प्रश्न न विचारतां कंबर कसून आणि ताडकन् उठून कामाला लागल्यानंच भारताचा उद्धार होणार आहे.

मी हा आदेश इतका तडाखेबंद दिला आणि त्याचा खुद्द माझ्यावरच इतका परिणाम झाला कीं, मी स्वतःच स्वप्नांतून आणि झोपेंतून ताडकन् जागा झालों.

—मीं स्वतःकडे पाहिलें. न्याहाळून पाहिलें. दिवा लावून आरशांत पाहिलें. म्हणजे मी आपला ' वि. आ. बुवा ' आहें, अशी मीं स्वतःची समजूत करून घेतली आणि ' ही बुवाची वाणी ' मग लिहून काढली.

* * *

हल्लीं हल्लीं, कां कोणास ठाऊक, मी महान् योगी आहें, असें मला



अकारण वा सकारण वाटूं लागलें आहे. कारण योगी अथवा साधु–सत्पुरुष यांच्या ठायीं जे जे गुण असतात किंवा ज्या ज्या गुणांमुळें माणसावर साधुत्व लादलें जातें ते ते गुण माझ्या ठिकाणीं प्रकर्षानें वास करीत आहेत असा आत्मसाक्षात्कार मला होऊं लागलेला आहे. मी त्या पदास कसा कसा लायक आहे हेंच आतां सांगतों.

## निष्काम कर्मयोग

कोणतेंहि कर्म करायचें तें निष्काम-बुद्धीनें केलेलें असावें असें जो करतो तो भगवद्गीतेच्या आधारें ‘ योगी ’ या संज्ञेस पात्र होतो. हा कर्मयोग मी नेहमींच करीत असतों. ( हल्लींचा कर्मयोग म्हणजे आपल्या कर्मांत लिहिलेली नोकरी. ) कालमानपरिस्थितीमुळें ‘ निष्काम ’ या शब्दाचा अर्थ थोडासा प्राकृत घेतला पाहिजे, नाहीं तरी बरेच संस्कृत शब्द पुढें पुढें प्राकृतांत रूढ होतातच. ‘निष्काम’ याचा अर्थ ( निस् = नाहीं + काम = काम ) ‘ काम न करणें’ असा घ्यायचा. आतां ‘निष्काम कर्मयोगा’कडे वळूं या. आपापलें कर्म करणें म्हणजे कर्मयोग. हल्लींचें कर्म म्हणजे नोकरी. मी ऑफिसांत जाऊन कर्मयोगाचे कागद पुढ्यांत ठेवतों आणि काम मात्र करीत नाहीं. थोडक्यांत सांगायचें म्हणजे काम न करतांच मी काम केल्याचा देखावा निर्माण करतों. यालाच मी ‘ निष्काम कर्मयोग ’ असें म्हणतों. कामावर येणें हा ‘ कर्मयोग ’ आणि येऊनहि काम न करणें हा ‘ निष्काम कर्मयोग ’.

आतां दुसरी गोष्ट म्हणजे आमचे नोकरीदाते म्हणतात,

"कर्मण्येवाधिकारस्ते, मा फलेषु कदाचन." म्हणजे, नुसतें काम करण्याचा तुमचा अधिकार. फळाची म्हणजे पगाराची आशा धरूं नका. (मिळाला तर मिळेल.) त्यामुळें गीतेंतल्या मूळ अर्थाबरहुकूमहि मी दरमहा 'निष्काम कर्मयोग' च करीत असतों.

## वसुधैव कुटुंबकम्–वृत्ति

खरे मोठे लोक असतात ते संबंध जगाकडेच 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्तीनें म्हणजे सगळें जग हें एकच एक कुटुंब आहे अशा वृत्तीनें पहात असतात. आणि काय योगायोग पहा, मीहि तसेंच पहात असतों. सकाळचा चहा शेजाऱ्याकडे किंवा मित्राकडे घेण्यांत मला मुळींच परकेपणा वाटत नाहीं. तीच बुद्धि कोणाकडेहि (बिन बोलावितां) जेवायला जायच्या वेळीं. 'अवघें विश्वचि माझें घर' अशा उच्चतम भूमिकेंत वावरणारा मी, या सर्वांकडे, हे कोणी परके आहेत अशा क्षुद्रबुद्धीनें कधींच पहात नाहीं. जणुं कांहीं मी प्रत्येकाच्या कुटुंबांतीलच आहे, अशा आत्मीयतेच्या आणि व्यापक भूमिकेंतून मी इतरांकडे चहापाणी, जेवण इत्यादि उरकून घेतों. परंतु या बाबतींत दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, माझे परिचित लोक अद्यापि एवढया उच्च पातळीवर आलेले नाहींत. त्यामुळें माझ्या या 'वसुधैव कुटुंबकम्–वृत्ती'ला ते 'परस्पर चहापाणी, जेवणखाण उकळण्याचा उपद्रव आणि उपद्व्याप' अशी क्षुद्र संज्ञा देतात. परंतु मी या निंदेकडे लक्षच देत नाहीं. मी आपलें स्वीकृत कार्य करीतच रहातों. 'निंदन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु' या भर्तृहरीच्या उक्तीप्रमाणें अगदीं मख्ख रहातों. असें वागणाऱ्यालाच भर्तृहरीनें 'धीर पुरुष' असें म्हटलें आहे. तो खरा गुणवेत्ता होता खरें!

## पैसा : विष

या जगांत पैसा म्हणजे प्रत्यक्ष विष आहे. अगदीं 'पोटॅशियम सायनाइड' आहे. आजपर्यंत या विषानें अनेकजणांचे बळी घेतले आहेत. अशा भयंकर विषाला माझे नातेवाईक आणि मित्र तरी निदान बळी पडूं

नयेत म्हणून मी नेहमीं प्रयत्नांत असतों. पैसा हा विष असूनहि लोकांना त्याचा मोह सुटत नाहीं. म्हणून मी माझ्या नातलगांकडून आणि मित्रांकडून, ' उसने, कर्जाऊ ' अशा रूपानें पैसे काढून घेतों आणि माझ्याजवळ ठेवून देतों. अज्ञानाच्या पंकांत रुतून बसलेल्या माझ्या नातलगांना आणि मित्रांना मात्र माझ्या सत्कार्याकडे सम्यग् दृष्टीनें पहातांच येत नाहीं. ' मीं पैसे बुडविले ' असा विपरीत अर्थ ते करतात. वास्तविक, भगवान् शंकरानें हालाहाल विष पचविलें ना तसेंच मींहि 'पैसेरूपी विष' पचविलेलें असतें. आणि निदान मला दिलेल्या पैसेरूपी विषांतून तरी मीं माझ्या सुहृद्जनांची यथाशक्य मुक्तता केलेली असते. परंतु हे अज्ञ लोक ! त्यांना अंतीं खऱ्या सुखाकडे नेणाऱ्या सत्कार्यांची जाणीव असते कोठें म्हणायला ?

## आत्मौपम्य बुद्धि

कोणत्याहि गोष्टीकडे आत्मवत् किंवा आत्मौपम्य बुद्धीनें जो पहातो तो मोठा माणूस होय, तो साधु होय किंवा योगी होय. हें तर मी फारच उत्तम रीतीनें करीत असतों, लोकांकडून वाचायला आणलेलीं पुस्तकें, मासिकें, गांवाला जातांना मागून आणलेला होल्डॉल, फिरकीच्या झांकणाचा तांब्या, इत्यादि वस्तूंकडे मी लगेच आत्मवत्–बुद्धीनें पहातों. मी या किंवा कोणत्याहि दुसऱ्यांकडून मागून आणलेल्या वस्तूंकडे तात्रडतोब इतक्या आत्मीय भावनेनें पहातों कीं, ती वस्तु दुसऱ्याची आहे याचें मला विस्मरणच होतें. ' आपपर जया नाहीं । चैतन्या जैसें ' अशा उच्चावस्थेला पोंचलेल्या माझ्या मनाला असले क्षुद्र विचार शिवतच नाहींत. असली ' आत्मवत्–दृष्टि ' यायला फारच उच्च प्रकारची मानसिक पातळी यावी लागते. असलें आत्मवत्-बुद्धीनें पहाणें फक्त योग्यांना ( किंवा विनयानें म्हणजे मलाच ) जमतें.

## समाधानी मी

' ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असूं द्यावें समाधान ' असें एक संतवचन आहे. संतांच्या काळांत तें ठीक होतें. त्यांचा अनंत त्यांना कोठें कां होईना ठेवीत तरी होता. परंतु हल्लींच्या जागाटंचाईच्या काळांत अनंत

कोठें ठेवायलाहि तयार नाहीं. असें असूनहि मी समाधानी आहें. मी निरनिराळ्या मित्रांकडे मुक्काम ठोकीत असतों. आणि दिवस समाधानानें घालवीत असतों. आतां तुम्हीच सांगा, मला अनंतानें कोठेंच ठेवलेलें नसूनहि मी समाधानी आहें कीं नाहीं! मी असा वेळीं-अवेळीं गेलों म्हणजे मित्राची बायको मित्रासमोर (स्वयंपाक घरांत मला ऐकूं येईल अशा बेतानें) मला शिव्या देते आणि निंदाहि करते. परंतु तुम्हीच सांगा मोठीं माणसें निंदेला का भितात? तीं निंदा आणि स्तुति यांच्या अतीत गेलेलीं असतात. मी तर कोणी निंदा करूं लागला कीं चक्क गीतेंतले 'स्थितप्रज्ञा' चें वर्णन असलेले श्लोक म्हणत बसतो, अशा वेळीं याच्या-सारखें समाधान नाहीं.

## निर्विकार मनोवृत्ति

वृत्तपत्र-वाचन तर मी फारच निर्विकारपणें करीत असतों.वाटेल ती बातमी असो, मी सारख्याच स्थितप्रज्ञबुद्धीनें वाचतों. भूकंपाच्या तडाख्यानें हजारों माणसें मरोत किंवा मोटारच्या धक्क्यानें एखादाच मरो, मी माझी वृत्ति कधींच ढळूं देत नाहीं. शेवटीं 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' हेंच खरें. म्हणून मी वाचन चालू असतांनाचें चहापानहि थांबवीत नाहीं. गांधीजी ज्याला महापुरुष समजत होते त्या टॉल्स्टॉयची आई मेली तेव्हां प्रेताची उत्तरक्रिया व्हायच्या आधींच टॉलस्टॉयला सपाटून भूक लागली. टॉलस्टॉयसारखा महात्मा आणि आईसारख्या सर्वश्रेष्ठ व्यक्तीचा मृत्यु! एवढ्या दोन महान् गोष्टी असतांनाहि टॉलस्टॉयला कांहीं वेळ भूक थोपवून ठेवावी लागली. 'भलत्याच वेळेला कशाला मरून बसली' असा विचारहि त्याच्या मनांत येऊन गेला असेल! शेवटीं सांगायचें म्हणजे त्या सद्गृह-स्थाला भूक लागली असूनहि जेवतां आलें नाहीं. परंतु मी मात्र वर्तमान-पत्रांतल्या कितीहि भयंकर बातम्या वाचून माझें साधें चहापान सुद्धां थांबवीत नाहीं किंवा टॉल्स्टॉयप्रमाणें भावनेच्या आहारीं जात नाहीं.

जगाकडे एवढ्या त्रयस्थ आणि निर्विकार भूमिकेंतून पहाणें फक्त परम-हंस दीक्षा घेतलेल्या योग्यांना आणि संन्याशांनाच जमतें. बाकीचे मध्येंच गडबडतात.

एखाद्या इमारतीला आग लागलेली असली आणि ती विझवली जात असतांना ( किंवा नसतांना ) मी ती आग बघत उभा राहतों. तेव्हां मला जनकराजाचीच आठवण होते. तो योगियांचा राजा विदेही जनक आपली मिथिला–नगरी जळत असतांना, 'मिथिलायां विदग्धायां न मे दहति किंचन' असें म्हणत अगदीं निर्ममवृत्तीनें ती आग बघत उभा होता. मीहि जनका-प्रमाणेंच सन्माननीय बघ्याच्या भूमिकेंतूनच आग (किंवा आगी) पहात असतों आणि ही आग बघतांनाच, 'स्वतःची एवढी मिथिला नगरी' जळत असतांना ती तशीच जळूं देणारा तो महापुरुष जनक कोणीकडे आणि दुसऱ्यांच्या ( आपण होऊन ) पेटलेल्या इमारती विझविण्याचा उपद्व्याप करणारे हे फायर ब्रिगेडचे क्षुद्र पोटार्थी नोकर कोणीकडे असा विचार माझ्या मनांत डोकावून जातो. अर्थात् हे फायरब्रिगेडचे नोकर आणि इमारतीचे मालक हे ऐहिक गोष्टींच्या मागें लागलेले अज्ञ असल्यामुळें त्यांच्या अंगीं जनकाप्रमाणें किंवा माझ्याप्रमाणें उच्च पातळीवरून ऐहिक गोष्टींच्या नश्वरते-कडे किंवा विनाशाकडे पहाण्याची दृष्टि आलेली नसते. ते तसेच वागायचे.

## स्थितप्रज्ञता

स्थितप्रज्ञता हा गुण तर माझ्या ठिकाणीं फारच उत्तम उत्कटतेनें वास करीत आहे. कलियुगांत पुढें जन्माला येणाऱ्या माझ्यावरून तर श्रीकृष्णानें द्रष्टेपणानें अर्जुनाला गीतेंतील ' स्थितप्रज्ञाचीं लक्षणें ' सांगितलीं नाहींत ना अशीहि एक शंका माझ्या मनाला चाटून जाते. ( अशा निरनिराळ्या शंका माझ्या मनाला वेळोवेळीं चाटून गेल्यामुळें माझें मन अगदींच गुळगुळीत झालेलें आहे. ) माझी स्थितप्रज्ञता बर कांहीं ठिकाणीं दिसून आलीच आहे. ' सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ' अशा विचारप्रणालीचा मी मनुष्य आहें. कोणी माझी स्तुति करो किंवा ऑफिसांत साहेब बिनपाण्यानें करो, मी दोन्ही ठिकाणीं सारखीच ( मख्खपणाची ) वृत्ति ठेवतों. केवढी ही समतोल वृत्ति ! ( चौथ्या दशांशस्थानापर्यंतहि नेमकें वजन दाखविणाऱ्या ' मायक्रो-बॅलन्स ' वरहि ही वृत्ति तोलून घ्यावी ! एक मिलिग्रॅम इकडे नाहीं कीं तिकडे नाहीं. )

माझ्या या वृत्तीला कांहींजण कोडगेपणा आणि गाढवपणा असें म्हणतात. परंतु ज्ञाते याच वृत्तीला ' स्थितप्रज्ञ वृत्ति ' असें म्हणतात.

## संयमी मी

' या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ' असें संयमी मनुष्याचें वर्णन गीतेंत केलेलें आहे. याचा गोळाबेरीज अर्थ असा कीं, 'ज्यावेळीं सगळीं सामान्य माणसें झोंपलेलीं असतात तेव्हां संयमी जागे असतात; आणि जेव्हां सगळे जागे असतात तेव्हां संयम्यांची रात्र सुरू होते.'

रात्रीं सिनेमा, नाटकें, ( चांगल्या वस्तींतल्या ) गाण्यांच्या मैफली यांच्यापायीं जागरणें करायचीं आणि दिवसा सकाळीं दहा दहा वाजेपर्यंत झोंपून रहायचें; नंतर दुपारीं, रात्रीं जागतां यावें म्हणून पुन्हां झोंपायचें हा माझा दिनक्रम पाहिला म्हणजे मी संयम्याचेंच जीवन जगत आहे हें कोणालाहि सहज पटेल. मागें कांहीं महिने मी एका वृत्तपत्रांत कायमच्या रात्रपाळीचा उपसंपादक म्हणून काम करीत होतों. तेव्हां मला पगारहि ( वेळेवर ) मिळायचा नाहीं. तेव्हां माझा अगदीं ' निष्काम कर्मयोग ' चालू होता आणि वरील श्लोकाप्रमाणें संयम्यांचें टाईमटेबल मी आचरीत होतों. तेव्हां माझ्या ( देशस्थी ) चेहऱ्याभोंवतीं एक दिव्य तेजोवलयहि निर्माण होऊं घातलें होतें. परंतु तेवढ्यांत माझी तेथील नोकरी सुटली आणि तें तेजोवलय निर्माण व्हायचें तसेंच राहून गेलें. नाहीं तर आज माझा ' तेजःपुंज पुरुष ' म्हणून केवढा गौरव झाला असता ! ( आणि घरांतला दिवाबत्तीचा खर्चहि वाचला असता. )

## महासंभावीत मी

" संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते " म्हणजे संभाविताला अपकीर्ति ही मरणापेक्षांहि अधिक वाटते. या मूल्यमापनांतून पाहिलें तर मी महासंभावित ठरतों. कसें तें पहा. जेव्हां दोन भयंकर गोष्टी एकदम पुढें उभ्या राहतात आणि त्यांतला एकच पर्याय स्वीकारायचा असतो तेव्हां कोणीहि झालें तरी ( यांत संभावितहि आलेच. ) कमी भयंकर गोष्ट

स्वीकारतो. आतां वरील दोन गोष्टीच घ्या. संभावितांना अपकीर्ति मरणापेक्षां भयंकर वाटते. म्हणजे अपकीर्ति ही अधिक भयंकर आहे हें नक्की. म्हणून तिला टाळून, संभावित लोक मरणाचा त्यांतल्यांत्यांत सोपा पर्याय स्वीकारतात. परंतु मरणाच्या वाटेला म्हणून मी आपण होऊन कधीं गेलों नाहीं. ( आपण होऊन कोणाकडे गेलें कीं किंमत कमी होते हेंहि एक कारण आहेच. ) म्हणजे संभावितांना मरणापेक्षां शतपटीनें भयंकर वाटणाऱ्या अपकीर्तींशीं मी रोज झुंज देत आहें. म्हणून संभावित, 'संभावित' असेल तर मी 'महासंभावित' आहे. पटलें ?

## माझें सत्–असत्मय घर

" नासते विद्यते भावो नाभावो विद्यते सतः " म्हणजे जें नाहीं तें अस्तित्वांत येत नाहीं आणि जें आहे तें नाहींसेंहि होत नाहीं. " असें गीतेंत ' सत्–असत्–तत्त्वा 'चें वर्णन करतांना सांगितलें आहे. हेंच वर्णन नेमकें माझ्या घरांतील परिस्थितीला लागूं पडतें. माझ्या घरांत द्रव्य नाहीं; आणि ( म्हणून ) तें येत नाहीं. तसेंच घरांत दारिद्य आहे तें कांहीं नाहींसें होत नाहीं. आहे कीं नाहीं ' सत्–असत्–भाव ? ' किती झालें तरी योग्याचें घर आहे हें !

## सबकुछ मी

गीतेच्या ' विभूति योग ' नांवाच्या अध्यायांत श्रीकृष्णानें आपण कोण कोण आहोंत याची एक दांडगी लिस्ट दिलेली आहे. आपण कोण कोण आहोंत हें सांगण्यांतहि श्रीकृष्णानें खुबी केलेली आहे. कोणत्याहि वस्तुमात्रांतील त्यांतल्या त्यांत जो उत्कृष्ट भाग आहे तो आपण आहोंत असें त्यानें सांगितलें आहे. उदाहरणार्थ—" देवांमध्यें मी इंद्र आहें; एकादश रुद्रांत मी शंकर आहें; पर्वतांमधील मेरु मीच आहें; हत्तींमधील ऐरावत मी आहें; मनुष्यांमध्यें मी राजा आहें, गायींत कामधेनु मी आहें; यादवांत श्रीकृष्ण मी आहें ( काय ही आत्मप्रौढी ! ) आणि पांडवांत अर्जुन मी आहे ( हा आपला खालीपिली तोंडदेखलेपणा. भीमाला गीता सांगितली असती तर वरील नांवांत दुरुस्ती झालीच असती.) मी महिन्यांमधील

मार्गशीर्ष आहें; ऋतूंमधील वसंत मीच आहें..." ही यादी बरीच मोठी आहे.

मलाहि हल्लीं मनोराज्यें करायची संवय लागलेली असल्यामुळें मीहि हळूहळू योग्याच्याच काय परंतु खुद्द परमेश्वराच्याच मांडीला मांडी लावून बसण्याचा चान्स मिळविणार कीं काय असें मला वाटू लागलें आहे.

मी कोण कोण आहें ( निदान असायला पाहिजे होतें ) हें मनोराज्यांत मला जसें दिसतें तसें सांगतों म्हणजे समजेल

" कारकुनांचा हेडक्लार्क मी आहें; शिपायांचा हवालदार मी आहें; मास्तरांचा हेडमास्तर मी आहें; गड्यांचा मुकादम मी आहें; नवकथा लेखकांमध्यें गंगाधर गाडगीळ मी आहें, नवकवींत मी मर्ढेकर आहें; किंचित् कवींत वि. आ. बुवा मीच आहें, तबलजींत मी तिरखवा असून सनईवाल्यांत मी बिसमिल्ला आहें; नटांमध्यें मी दिलीपकुमार असून नटींमध्यें मी नर्गीस आहें ( इश्श कांहींतरीच ! ) गाड्यांमध्यें मी डेक्कन-क्वीन आहें, मंत्र्यांत मी मुरारजी आहें, श्रीमंतांमधील टाटा मी असून पादत्राणें विकणाऱ्यांमधील बाटाहि मीच आहें, चहामधील 'लिप्टन तांबडें लेबल' मीच आहें, सिगरेटमधील गोल्ड फ्लेक मीच आहें, सगळ्या शहाण्यांत मीच अतिशहाणा आहें (आणि सगळ्या गाढवांत महागाढवहि मीच आहें !)

## साधु मी

" जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ अशी तुकोबारायांनीं साधूची व्याख्या सांगून देवाचा पत्ताहि दिला आहे. मी रंजल्या-गांजल्यांना आपलें म्हणतों-नव्हे मी स्वतःच एवढा रंजला गांजला असतों आणि अशा प्रत्येक वेळीं मी स्वतःविषयीं आपुलकी दाखवितों. इतर कोणत्याहि अनुभूतीपेक्षां आत्मानुभूति श्रेष्ठ असें म्हणतात. या दृष्टिकोनांतून पाहिलें तर इतर लोक नेमके किती रजले गांजले आहेत हें निश्चित कळल्यावांचून त्यांना गाफीलपणें 'आपुलें' म्हणण्यापेक्षां आपण स्वतःच गांजलों असतांना आपणच आपल्याला 'आपुलें' म्हणवून घेणें अधिक श्रेष्ठ नाहीं


का ? असें करण्यानें एकदम दोन तीन गोष्टी पदरांत पडतात. एक तर स्वार्थ झाला. दुसरें म्हणजे यामुळें मी साधु ठरतों आणि तिसरें म्हणजे देवाचा मुक्कामहि माझ्या ठिकाणींच पडतों.

वरील निरनिराळ्या उदाहरणांवरून आणि विवेचनावरून मी केवढ्या थोर योग्यतेचा ' पुरुषोत्तम ' आहें हें सर्वांच्या ध्यानांत आलें असेलच. भारताचें भाग्य आणि विसाव्या शतकांतील लोकांचें नशीब म्हणून माझ्या-सारखा महायोगी माझ्या समकालीन लोकांना दिसतो आहे. याच्यापेक्षां जास्त मी लिहीत नाहीं. कारण लिहिलें तर केवळ आत्मस्तुतीच लिहावी लागेल. म्हणून येथेंच थांबतों.

* * *

# नांवें, गांवें आणि शब्द ९

पुष्कळ नांवें, गांवें आणि शब्द असे चमत्कारिक असतात, कीं ते



वाचल्यावर किंवा ऐकल्यावर आपल्याला गंमत वाटते. कांहीं कांहीं शब्द तर असे असतात, कीं ते माहीत होईपर्यंत तसा शब्द असूं शकतो याची पुसटशी कल्पनासुद्धां आपल्याला येत नाहीं. हे शब्द किंवा नांवें आणि गांवें त्यांच्या विचित्रपणामुळें आपल्या डोक्यांत उगीचच कायमचें ठाण मांडून बसतात. त्यांतल्या कित्येक नांवगांवांचा आपल्या दैनंदिन व्यवहाराशीं सुतराम संबंध नसतो. अशींच कांहीं नांवें आणि शब्द मी खालीं देत आहें.

‘ दिब्रुगढ ’ हें गांवच घ्या. हें गांव त्याच्या चमत्कारिक उच्चारामुळें माझ्या डोक्यांत फिट बसलें आहे. मात्र हें गांवाचें नांव ऐकण्यापूर्वी असें गांव या अवनीतलावर असूं शकेल अशी मला कल्पनाहि नव्हती. परंतु आतां मात्र मला हें गांव अगदीं पाठ झालेलें आहे. ‘ दिब्रुगढ ’ म्हटल कीं, तो ब्रह्मपुत्रेचा पूर, तें गांवांत पाणी शिरणें, तें लोकांचें निराश्रित होणें, तो ‘ दिब्रुगढ-निवासी-पूरग्रस्त-निराश्रित-गृह—वित्तविहीन—साहाय्यक निधि ’ हें सारें कसें चित्रपटासारखें भराभर माझ्या दृष्टीसमोरून जातें.

अगदीं हल्लीं हल्लीं एका सुप्रभातीं एकदम सगळ्या जगाला माहीत झालेलें कोरियांतलें, ‘ पानमुनजोम ’ हें गांव घ्या. घ्या काय? हें काय गांवाचें नांव झालें? असें गांवाचें नांव असतें हें जगाप्रमाणेंच मलाहि माहीत झालें नसतें तर मीं सबंध आयुष्यांत चुकूनहि, ‘ पान ’, ‘ मुन ’ आणि ‘ जोम ’ हे शब्द कोणत्याहि क्रमानें कधीहि एकत्र ठेवले नसते.

परंतु खरोखरच तसें गांव असल्यामुळें असें गांवाचें नांव असूं शकतें हें आतां खरें मानलें पाहिजे. ह्या गांवाचें नांव उच्चारलें कीं, युनो आणि रशियन लोक दोघेहि होऊं घातलेला तह अडेलतट्टूपणानें फिस्कटवीत आहेत, पुन्हा तहासाठीं एकत्र येत आहेत, पुन्हा बोलणीं फिसकटत आहेत, पुन्हा तहावर सह्या करायला सरसावत आहेत, पुन्हा कुठं तरी माशी शिंकली म्हणून परत जात आहेत, पुन्हा मानवतेच्या कल्याणाच्या सद्हेतूनें युद्ध-विरामाच्या करारावर सह्या करीत आहेत—अशीं हुलकावणीबाज चित्रें भराभर दृष्टीसमोर येतात.

मला लहानपणीं ज्याच्याबद्दल फार कुतूहल वाटत होतें असें नांव म्हणजे 'हातिमताई' हें होय. हें पुरुषाचें नांव आहे कीं बाईचें, याचाच बोध मला कितीतरी दिवस झाला नव्हता. बाई म्हणावें तर बायकांचें 'हातिम' हें नांव कुठें असतें काय, असें वाटायचें. अन् पुरुष म्हणावें तर पुरुषांच्या नांवांपुढें कुठं 'ताई' लावतात काय, अशी शंका यायची! जुन्या मराठी पांचवीच्या पुस्तकांत त्याचें (कीं तिचें?) चित्र बघितलें तेव्हां त्यानें पुरुषाचा पोषाख घातला होता. डोक्यावर गोल टोपी (बहुधा जरीची असावी) होती. त्यामुळें तो पुरुषच असला पाहिजे असें मला वाटलें. परंतु त्याच वेळीं, कोण्या बाईनें (म्हणजेच ताईनें) 'हातिम' हें नांव धारण करून पुरुषी पोषाख केला नसेल कशावरून, असेंसुद्धां वाटायचें. त्यामुळें हातिमताईच्या स्त्रीपुरुषत्वाबद्दलचें माझें मत दोन्हींच्या मध्येंच लोंबकळत राहिलें.

नवीन निर्माण होणारा आंध्र प्रांत कसा असावा इत्यादि बाबतींत भारतसरकारनें एक समिति नेमली होती. तिचे प्रमुख न्या. मू. वांछू होते. आडनांव मजेशीर आहे नाहीं? कांहीं दिवस नेहमीं वर्तमानपत्रांत न्या. मू. वांछूंचें नांव वाचलें कीं, मला मोठी गंमत वाटायची. आणि वांछू काय म्हणतात हें मी कुतूहलानें वाचीत असें. भारतांत विविध आणि असंख्य आडनांवांचीं लाखों माणसें असतांना सरकारला नेमके 'वांछू'च कुठून सांपडले याचें मला नेहमीं नवल वाटायचें. मग मी काय वाईट होतों?

'पडवळ' हें आडनांव मला तसें परिचित असलें तरी अन्नसत्याग्रह

केलेल्या पडवळ या शिक्षकांबद्दल मला कसेंसेंच वाटायचें. ' पडवळ ' या आडनांवाचा माणूस संपूर्ण, शंभर टक्के उपवास करील ही कल्पनाच मला कशीशी वाटायची. एवढ्या लांबलचक खाद्यपदार्थांचें नांव आडनांव म्हणून धारण करणारा मनुष्य आणि तो उपवास करतो ? शक्यच नाहीं ! नुसतें स्वतःचें आडनांव उच्चारलें तरी पडवळाची भाजी खाल्ल्यासारखें त्यांना वाटणार ! आणि पडवळाची भाजी खाऊन (काल्पनिक कां होईना) केलेला अन्नसत्याग्रह हें काय शंभर टक्के उपोषण ठरतें काय ? छट् !

वर्तमानपत्रांत नेहमीं येणारे, ' व्हिएटनाम ' आणि ' व्हिएटमिन्ह ' हे दोन शब्द नेहमीं माझ्यांत कुतूहल निर्माण करणारे आहेत. केव्हांतरी या दोन शब्दांत भांडण जुंपलें आहे आणि त्याचा निकाल कांहीं अद्याप लागला नाहीं हें वृत्तपत्रांतील बातम्यांवरून उघडच दिसतें. या दोघांच्या भांडणाचें मूळ काय आहे हें मराठी वर्तमानपत्रें वाचणाऱ्या असंख्य वाचकांप्रमाणेंच मलाहि आतां आठवत नाहीं. प्रथम प्रथम मी 'व्हिएटनाम' आणि 'व्हिएटमिन्ह' हे दोन्ही शब्द एकच आहेत असें समजत होतों.

केवळ वृत्तपत्रीय चुकांच्या परंपरेमुळें तो शब्द कधीं ' व्हिएटनाम ' आणि कधीं ' व्हिएटमिन्ह ' असा छापला जात असेल अशी माझी प्रामाणिक समजूत होती. ( हल्लीं प्रामाणिकपणाला आहे कुठं किंमत ? ) परंतु पुढें हे दोन स्वतंत्र शब्द आहेत असें ज्ञान मला प्राप्त झालें. वर सर्वत्र मीं ' शब्द ' हाच शब्द वापरला आहे. कारण 'व्हिएटनाम' आणि ' व्हिएटमिन्ह ' हीं देशांचीं नांवें आहेत कीं शहरांचीं नांवें आहेत, कीं जमातींचीं नांवें आहेत हें देवाशपथ मला अजूनहि माहीत नाहीं. म्हणून ' शब्द ' हा मोघम शब्दच मीं वर वापरला आहे. मधूनमधून बादोई ( कीं बाओदाई ? ) नांवाचा एक सद्‌गृहस्थ फ्रेंच सरकारशीं वाटाघाटी करीत असतो. हा मनुष्य वाटाघाटी कां करतो कुणाला ठाऊक ? आणि 'बादोई' असें चमत्कारिक नांव असणाऱ्या माणसाबरोबर वाटाघाटी करण्यांत वेळ फुकट घालवायला फ्रेंच सरकारला दुसरे उद्योग नाहींत काय?

' लुई ' हें नांव उच्चारलें कीं मला पावाच्या बिलबिलित भागावर बोट दाबल्यासारखें वाटतें. नांवांत घट्टपणाच नाहीं या ! असले बिलबिलित लुई

( नग अठरा ) फ्रान्सचे राजे कसे झाले याचें मला आश्चर्य वाटतें. आणि त्याहिपेक्षां आश्चर्य वाटतें तें हें कीं, 'लुई'शिवाय दुसरीं नांवें फ्रान्समध्यें नाहींत काय ? अरे, नांवांचा एवढा तुटवडा पडला होता तर आमच्या देशांतून कां मागवलीं नाहींत ? इथं एकेका देवाला हजारहजार नांवं आहेत. ( नांवागणिक तुळसीपत्र वहातांवहातां तुळसीच्या झाडाचा खराटा होऊन जातो आणि उजव्या दंडाचा स्नायु हा असा फुगतो ! ) त्यापैकीं कांहीं घेतलीं असतीं तर काय बिघडलें असतें ? विनायक आहे, आदिनाथ आहे, कितीतरी नांवें आहेत.

हल्लीं वृत्तपत्रांतून ' माउ माउ ' चळवळीसंबंधीं पुष्कळ बातम्या येतात. काय मजेशीर आहे नाहीं चळवळीचें नांव ? ' माउ माउ ' चळवळ ! प्रथम मला वाटलें कीं, ही मांजरांसंबंधींची चळवळ आहे, आणि ती उंदरांनीं सुरू केलेली आहे. पूर्वीं आपल्या देशांतहि उदरांनीं मांजरांविरुद्ध चळवळ केल्याचा किंवा तसा प्रयत्न केल्याचा उल्लेख मॅकमिलनसाहेबांच्या ' न्यू इंग्लिश रीडर ' नामक ग्रंथांत आढळून येतो. परंतु मांजराच्या गळ्यांत घंटा बांधण्यापूर्वींच त्यांची संघटना कोसळून पडली ( भारतीय उंदीरच ते ! ) या उंदरांचें अपुरें कार्य आफ्रिकेंतल्या ताज्या दमाच्या उदरांनीं सुरू केलें असावें असें मला वाटलें. आणि ' माउ माउ ' ही मांजरांना निषेधार्थी संबोधण्याची ' स्लोगन ' आहे असें मला वाटत होतें. पण पुढें माझा भ्रमनिरास होऊन ही चळवळहि माणसांचीच आहे असें मला समजून आलें.

कांहीं शब्दांचा थाट कांहीं निराळाच असतो. अगदीं सुरुवातीला मी ' युनेस्को ' हें एखाद्या साहेबाचेंच नांव आहे असें प्रामाणिकपणें समजत होतों. ( इथेंहि प्रामाणिकपणाच नडला ) ' युनेस्को-स्कॉलरशिप ' हा शब्द-प्रयोग मला 'शंकरशेठ–स्कॉलरशिप' यासारखा वाटायचा. 'युनेस्कोचें सांस्कृतिक कार्य ' मला ' गोळवलकर गुरुजींच्या सांस्कृतिक कार्या' सारखें वाटायचें. एकाच वेळीं विविध कार्यांत लक्ष घालणाऱ्या ' युनेस्को '-साहेबाबद्दल मला विलक्षण आदर वाटायचा. आमच्या कॉलेजांतले एक प्राध्यापक श्री. बेळगांवकर हे युनेस्कोच्या स्कॉलरशिपनें परदेशांत गेले

होते. ते परत आल्यावर मीं त्यांना उत्सुकतेनें विचारलें, का हो ? तुम्ही युनेस्कोची स्कॉलरशिप घेऊन गेला होतां. तुम्हांला तिकडे युनेस्कोसाहेब स्वतः भेटले होते का ? '

माझा हा प्रश्न ऐकून, ते सभ्य असूनहि माझ्यादेखतच फिदीफिदी हंसले आणि म्हणाले, ' युनेस्को हें साहेबाचें नांव नाहीं. ती एक आंतर्राष्ट्रीय संस्था आहे. ' नंतर त्यांनीं ह्या संस्थेनें सांस्कृतिक, शैक्षणिक आणि शास्त्रीय कार्यांच्या द्वारां अवघ्या जगाचें कल्याण करण्याचा चंग बांधला असल्याचें शुभवर्तमान मला सांगितलें.

असलीच चूक साताराचे नाना पाटील यांनींहि केली होती म्हणतात. ( चला ! तेवढाच त्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा चान्स ! ) खरें खोटे देव जाणे. ( कारण तोच बुद्धिदाता आहे आणि सर्वज्ञहि आहे ! ) नाना पाटील हे, ' कॉमिन्फॉर्म ' हे एका श्रेष्ठ रशियन पुढाऱ्याचें नांव आहे असें समजत होते म्हणे. कॉमिनफॉर्मचा वाक्यांत उपयोग ते ' कॉमिन्फॉर्मसाहेब ' असा करायचे म्हणे ! ( ही बहुधा ' मोठ्या लोकांची खोटी गोष्ट ' दिसतेय्. कुणीं ' पाडली ' कुणास ठाऊक ? )

चमत्कारिकपणाच्या बाबतींत जगांतल्या शब्दांची उलाढाल वर झाली. परंतु खुद्द माझें आडनांव काय कमी चमत्कारिक आहे ? ' बुवा ' या मोघम आडनांवावरून मी ब्राह्मण आहें कीं नाहीं याचा बोध न होऊन, माझीं ( दक्षिणेसहित ) जेवणाचीं आमंत्रणें कितीतरी बुडालीं आहेत. बुवा हें आडनांवहि कुतूहल निर्माण करणारें असेंच आहे. बुवा म्हटलें कीं, ' आला बघ बुवा ! ( झोंपतोस कीं नाहीं कारट्या ? ) ' पासून ते वयोवृद्ध, लांब दाढीमिशा असलेला, थकलाभागलेला कुणीतरी असेल असें वाटतें. किंवा धोतर, बाराबंदी, उपरणें हीं वस्त्रें परिधान केलेला, कपाळावर ब्रॉडगेज गंध लावलेला, डोक्यावर पगडी घातलेला कीर्तनकार असेल असें वाटतें. परंतु वरील सर्व अंदाज चुकीचे आहेत.

कित्येकांना तर ' बुवा ' हें टोपणनांव वाटतें.

एकदां माझ्या मित्रानें त्याच्या एका मित्राशीं माझी ओळख करून दिली, तेव्हां तो आश्चर्यानें म्हणाला, " म्हणजे ? तुम्ही आहांत तर ? "

" मग तुमच्यासमोर काय बुवाचं भूत उभं राहिलंय काय ? " मी त्याला विचारलें.

" तसं नाहीं हो ! " तो सांगूं लागला, " मला वाटलं, दुसराच कुणीतरी लेखक ' वि. आ. बुवा ' हें टोपणनांव घेऊन साहित्य लिहितो !"

म्हणजे काय, तर मी अजिबात नसण्यापासून ते असलों तर कसा असेन यापर्यंतच्या कल्पना वर दिल्या आहेत. परंतु वरील सगळ्या कल्पना माझ्या बाबतींत कल्पनाच ठरतात. माझा लहान मुलांना भिवविण्याकडे उपयोग होत नाहीं, मी वयोवृद्ध नसून सव्वीस वर्षें वयाचा तरुण आहें, मला लांब दाढीमिशा नसून मी ' सेव्हनओ ' क्लॉक पंथा'चा ' तुळतुळीत-वादी ' आहें. मी साधुसंतांसारखा किंवा कथाकार कीर्तनकारांसारखा पोषाख घालीत नसून, शर्ट, पँट, बुश्कोट, मनिला शर्ट असे आधुनिक कपडेच ( परंतु गबाळ्या स्वरूपांत ) घालतों.

तात्पर्य काय, नांवांच्या, गांवांच्या आणि शब्दांच्या अशा एकेक गंमती असतात !

* * *

घ्यावा. परंतु, दिसायला स्मार्ट आहे असें आढळून आल्यास तिला आयुष्याची भागीदार केली जाईल असा अंतस्थ अर्थ त्यांत आहे. दहा हजारांची मासिक उलाढाल हें, व्यवसायाचा व्याप सांगण्यासाठीं नसून संभाव्य वधूला माझ्या श्रीमंतीची कल्पना यावी हा आहे.

माझ्या बाबतींत विवाहविषयक आणखी एक योगायोग जुळून आला आहे. तो म्हणजे माझ्या नांवाचा होय. माझ्या नांवाचीं आद्याक्षरें घेतलीं कीं, ' विवाह ' हा शब्द तयार होतो. यावरूनहि मला पाहिजे असलेली तरुणी टायपिस्ट म्हणून नको असून ' विवाहासाठीं ' पाहिजे हें चाणाक्ष तरुणीच्या लक्षांत यावें.

## पेइंग गेस्ट पाहिजे

एका कुलीन कुटुंबांत एक होतकरू, नोकरी-व्यवसाय करणारा ब्राह्मण तरुण पेइंग गेस्ट म्हणून ठेवून घेणें आहे. कुटुम्बवत्सल लोकांची आर्थिक ओढाताण आणि जागा नसलेल्या तरुणांची जेवणाखाण्याची आबाळ या दोन्ही अडचणींवर उपाय म्हणजे ' पेइंग गेस्ट ' ही पद्धति होय. वर्तणूक आणि व्यवसायाचें स्थैर्य या विषयींची खात्री पटविणाऱ्यानेंच यावें.

भेटा : अनंत मुरलीधर बाकरे.

पत्ता......

( स्पष्ट हेतु : सज्जन मंडळींनो, असल्या धकाधकीच्या दिवसांत पेइंग गेस्ट ठेवायला मी कांहीं अहिल्याबाई होळकरांप्रमाणें अन्नछत्र उघडलें नाहीं हें आपल्या ध्यानांत आलें असेलच. यांत ' आंतरः कोऽपि हेतुः ' आहे. आपल्याला माहीत असेलच, आमची छबी लग्नाची आहे. पोर तशी कामांत हुषार आहे. फायनलपर्यंत शिकलीहि आहे. प्रेमबिमसुद्धां तिला थोडंफार करतां येतें. एक दोन वेळां ती शेजारच्या बेकार बंड्याकडे बघून हंसलीहि होती. ( योग्य माणूस असल्याखेरीज तसें करीत जाऊं नको म्हणून मीच तिला तंबी दिली होती. ) ती तशी अंगापिंडानेंहि बरी आहे. ( पितृवात्सल्यानें ती तशी दिसत असावी.) परंतु तिचा काळा रंग ( पहाः शिसपेन्सिलीचें शिसें.) लग्नाच्या पायीं दगा देत आहे. दाखविलेल्या प्रत्येक

स्थळीं ती नापसंत झाली आहे. म्हणून मीं हें पेइंग गेस्टचें तंत्र वापरण्याचें ठरविलें आहे.

नोकरीधंदा करणारा आणि चांगल्या घराण्यांतला तरुण आमच्या घरीं पेइंग गेस्ट म्हणून रहायला आला कीं, मी आणि ही ( माझी बायको ) दोघें मिळून प्रथम महिनाभर त्याच्यावर घरगुती प्रेमाचा, वात्सल्याचा भडिमार करणार आहोंत. आणि या काळांत छबीला क्वचित् त्याच्या तैनातीला ( ' चहा ब्यायचा,' ' दाढीला ऊन पाणी पाहिजे काय ? ' ' शर्टची बटनं लावून ठेवूं कां ? ' इत्यादि कामासाठीं ) पाठविणार आहोंत. मग हळूंहळूं आम्ही दोघें काढतें अंग घेऊन त्याची बडदास्त ठेवायची जबाबदारी छबीवरच सोंपविणार आहोंत.

असा सहवास कांहीं दिवस घडल्यावर आमच्या छबीच्या लाघवी वागण्यावर तो तरुण खूष झालाच पाहिजे. शिवाय कालांतरानें माणूस प्रेमळ वागणुकीचा मिंधा बनतो, तसेंच तरुणांचें मन हें ' हायली इन्फ्लेमेबल ' असतें. मग तें काळ्या पोरीच्या स्पर्शानेंहि पेटतें. अशाच गाफील वेळीं मी छबीला त्या तरुणाच्या गळ्यांत अडकवून टाकणार आहे. लग्नाचें हें तंत्र थोडेंसें चेंगट आहे, मण हमखास यशस्वी होणारें आहे.

टीप : माझ्या नांवाचीं आद्याक्षरें घेऊन आणि त्याच अक्षरांनीं सुरुवात करून माझे कांहीं मित्र ' अडलेल्या मुलीचा बाप ' असें माझें वर्णन करतात लेको थांबा थोडें ! दाखवतोंच मी छबीचें लग्न करून !

## जागा भाड्यानें मिळेल

पागडी डिपॉझिटशिवाय दोन खोल्या भाड्यानें देणें आहेत. भाडेंहि माफक. विशेष ' बोलणीं ' करण्यासाठीं भेटा : मा. सा. गळे, पत्ता...

( स्पष्ट हेतु : माझी एक लग्नाची मुलगी आहे. ती रंगानें कोकिळे. प्रमाणें आहे. तिचे डोळे पुष्पयुक्त असून दांत उमलेल्या मोगरीच्या फुलांप्रमाणें आहेत. तिच्या चेहऱ्यावर वद्य त्रयोदशीपेक्षां थोडें कमी कमी आणि अमावास्येपेक्षां अधिक असें तेज विलसत असतें. चंद्रावरच्या उंचसखल भागाप्रमाणें हिच्या मुखावरहि देवीच्या कृपाप्रसादामुळें अनेक

उंचसखल भाग निर्माण झाले आहेत. त्यामुळें चंद्राची उपमा हिच्या चेहऱ्यालाच यथार्थतेनें लागूं पडते.

अशा एवंगुणविशिष्ट मुलीच्या सौंदर्याची रसिकावांचून आबाळ होत आहे. बऱ्याच तरुणांनीं तिच्या सौंदर्याकडे पाहण्यापूर्वीच गपकन् डोळे मिटून घेतले.

तात्पर्य काय, तिचें लग्न कुरूपपणामुळें जमत नाहीं. आतां शेवटचा हुकमी उपाय म्हणून मी ही जागेची टूम काढली आहे. माझा एवढा मोठा बंगला आहेच; त्यांतल्या दोन खोल्या एखाद्या गरजू तरुणाला, माझ्या मुलीशीं लग्न करायच्या अटीवर दिल्या म्हणजे झालें. असें झालें तर त्याची गृह आणि लक्ष्मी या दोन्हींची सोय होईल आणि माझी एका भयंकर जबाबदारींतून मुक्तता होईल. मला नक्की खात्री आहे कीं, ‘ बुभुक्षितः किं न करोति पापम् ’ या चालीवर ‘ जागेमुळें हैराण झालेला मनुष्य काय कबूल करणार नाहीं ? ’ असें घडून येईल; आणि माझ्या मुलीचें लग्न चालू मोसमांतच ( कारण पुढें दोन वर्षें सिंहस्थ आहे ) होईल. माझें नांव पाहिलें म्हणजे ‘ मासा गळाला ’ लागणार याची खात्री वाटते.

## मॉंटेसरीवाली बाई पाहिजे

दोन लहान मुलांना सांभाळण्यासाठीं आणि मॉंटेसरी पद्धतीनें शिकवण्यासाठीं, मुलांशीं रमून जाणारी तरुण स्त्री पाहिजे. अन्य नातलगांचा व्याप नसणारीस जास्त पसंती. राहण्याची सोयहि होईल. पगार महिना रु. ७५. भेटा : बाळकृष्ण यशवंत कोरडे. पत्ता......

( स्पष्ट हेतु : थोडक्यांत सांगायचें म्हणजे माझें पहिलें कुटुंब ‘ गेलें ’ आहे. आणि पाठीमागें दोन लहान मुलें आहेत. कोणीहि तशी चटकन् बिजवराशीं लग्न करायला तयार होत नाहीं. म्हणून मीं ही टूम काढली आहे. मॉंटेसरी शिक्षिकेचें शिक्षण तसें मॅट्रिकपर्यंत झालेलें असतेंच. म्हणजेच पत्नीच्या सुशिक्षितपणाची अट आपोआपच भागली. शिवाय मॉंटेसरी बायकांना पोरें गोडीगुलाबीनें कशीं सांभाळावीं हें चांगलें जमतें.

## तरुण लेडी टायपिस्ट पाहिजे

दरमहा सुमारें दहा हजार रुपयांची मासिक उलाढाल करणाऱ्या



संस्थेच्या मालकाला लेडी टायपिस्ट पाहिज. महाराष्ट्रीय असल्यास विशेष पसंती. ( कामांत ) स्मार्ट आहे असें दिसून आल्यास भागीदारीहि दिली जाईल. नोकरीवर येतांना तिचें वय चोवीसपेक्षां जास्त नसावें. पदवीधर असावी. आकर्षक व्यक्तिमत्व अवश्य आहे.

लिहा अथवा भेटा:—

विनायक वासुदेव हजरनीस. पत्ता...

( स्पष्ट हेतु : खरें सांगायचें म्हणजे मला तरुण लेडी टायपिस्ट पाहिजे हें बाह्य कारण झालें. परंतु मला माझ्या ऑफिसच्या खोलींत बसून प्रेम करायला एक तरुणी पाहिजे. प्रेमाची ट्रायल नीट झाली तर तिच्याशींच लग्न करण्याचा हेतु आहे. म्हणून थोडी खुबीनें जाहिरात दिली आहे. महाराष्ट्रीय पाहिजे. म्हणजे खिश्चन, पार्शी, इत्यादि पोरींनीं अर्ज करण्याच्या भानगडींत पडूं नये. आकर्षक व्यक्तिमत्व, पदवी, वय या गोष्टी नोकरीला जशा आवश्यक आहेत, तशाच लग्नाच्या छोकरीलाहि आवश्यक आहेत, हेंहि येथें हळूंच सूचित केलें आहे. ' स्मार्ट आहे असें आढळल्यास भागीदारी दिली जाईल ' असें मोघम म्हटलें आहे. ती स्मार्ट आहे म्हणून धंद्यांतील भागीदारी दिली जाईल असा वरकरणी अर्थ

हळूंहळूं पोरांबरोबर ती माझ्यावरहि प्रेम करूं लागेल अशी योजना मी आखीत राहणारच आहे. माझ्या मुलांना तिला आई म्हणून हांक मारायला मीं प्रथम शिकविणार आहे. आणि मग केवळ मुलांचा हट्ट पुरविण्यासाठीं (आई म्हणायचा) म्हणून मी तिला आस्ते आस्ते लग्नाची गळ (आणि माळ) घालणार आहे. एकाच बाईमुळें (निरनिराळ्या भूमिकांतून) बच्चे खूष और बच्चोंका बाप भी खूष !

माझ्या नांवाच्या आद्याक्षरांवरून, एका ज्योतिषानें मला 'बायको' मिळणारच असें छातीवर ( त्याच्या ) हात मारून सांगितलें आहे. )

## नर्स पाहिजे

नेहमीं आजारी असणाऱ्यां पत्नीच्या शुश्रूषेकरितां नर्स पाहिजे. पत्नी जुन्या वळणाची असल्यामुळें नर्स स्वजातीय, उच्चवर्णीय असावी. रहाण्याची आणि जेवण्याची सोय येथेंच केली जाईल.

खुलाशासाठीं भेटा : दामोदर रामकृष्ण धुंडाळे. पत्ता......

( स्पष्ट हेतु : माझी चालू बायको नेहमीं आजारी असल्यामुळें अंथरुणाला खिळूनच असते. एखाद्या खानदानी घरांत ज्याप्रमाणें नेहमी चारदोन पाहुणे मुक्काम ठोकून असतात त्याचप्रमाणें हिच्या अंगांत चार दोन रोग नेहमींच असतात. त्यामुळें मला तिच्यापासून सुख अभावानेंच मिळतें. तिच्यामुळें मला मिळतें तें फक्त दुःखच. हल्लीं दिवसेंदिवस तिची प्रकृति अधिकाधिकच क्षिण होत चालली आहे. ( पहा : वद्य पक्षांतील चंद्राची कोर ) म्हणून मी नर्स ठेवायची योजना काढली आहे. तिच्यामुळें दोघेहि खूष ! नवरा आपल्यासाठीं किती खपतो, ( चांगल्या अर्थानें, 'खपणें' या अर्थानें नव्हे ) किती कष्ट घेतो, किती पैसे खर्च करतो असे बायकोला वाटेल. त्याच्यानें तिला समाधान वाटेल. तिच्या शुश्रूषेला नर्स ठेवल्यामुळें माझाहि कार्यभाग हळूंहळूं पार पाडायला नर्सचा उपयोग होईल.

आतां थोडें आध्यात्मिक दृष्टींतून पाहूं या. मरण हें कधीं कोणास चुकलें आहे काय ? नाहीं ! 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' असें म्हटलेंच

आहे. कोणी सांगावें या आजारांतच ती ' जाणार ' नाहीं कशावरून ! वाईट चिंतू नये, पण न चिंतल्यानें तें थोडेंच टळणार आहे ?

आणि आतां अध्यात्म थोडा बाजूला सारून व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तर माझें अजून वय का झालें आहे ? धर्मानें घालून दिलेला 'गृहस्थाश्रम' मला मध्येंच कसा सोडून देतां येईल बरें ? म्हणून मला हिची जागा भरून काढण्याची तजवीज अगोदरपासूनच करून ठेवली पाहिजे. ही जिवंत असतांना दुसरें लग्न करणें कायदेशीर रीत्या आणि माणुसकीच्या दृष्टीनें योग्य नाहीं. म्हणून मी नर्सची योजना केली आहे. ( वाचा : 'योजकस्तत्र दुर्लभः ' हें सुभाषित ) नर्स ठेवल्यानें रोगी जगतोच असें नाहीं. ( पहा : कांहीं घडलेलीं उदाहरणें. ) ही एक केवळ काल्पनिक समाधानाची बाब आहे. ( कर्ता करविता परमेश्वर आहे ! )

नर्सची शुश्रूषा आणि माझें तिच्याशीं प्रणयाराधन या गोष्टी सारख्याच चालू रहातील, अशी मी युक्ति करणार आहें. (परमेश्वरी इच्छेनें एखाद्या दिवशीं सगळें कांहीं जमून येईल) बोलून चालून नांव ' दा. रा. धुंडाळे ' ( दारा म्हणजे बायको ) असें आहे तेव्हां या धुंडाळण्यांत मला यश यावें.

## दोनशें भावगीतें शिका

सहा महिन्यांत दोनशें भावगीतें शिका : गोड गळ्याच्या तरुणींना सुवर्णसंधि. मान वेळावून वेळावून मुलायम भावगीतें ढंगदार पद्धतीनें शिकविलीं जातील. ( उदा० नक्का मारूं खड्डा, शिरीं भर्लो घड्डा, सख्या जाइल तड्डा ) हुषार विद्यार्थिनींकडे विशेष लक्ष दिलें जाईल. हां हां म्हणतां लता मंगेशकर, आशा भोसले, माणिक वर्मा होण्यासाठीं आमच्या वर्गांत या. मोजक्या जागा आहेत. भेटा : लक्ष्मण जनार्दन उपाध्ये, पत्ता...

( स्पष्ट हेतु : खरें सांगूं का, गेलीं चार सहा वर्षें मी लग्नासाठीं खटपट करीत आहें. पण अजून कोठेंच कांहीं जमेना. खेडयांतील मुली मला आवडेनात आणि शहरांतल्या मुलींना मी आवडेना. असलें त्रांगडें असल्यामुळें जमेचना.

शाळा–कॉलेज, हिंदू कॉलनी, शिवाजी पार्क, सगळ्या चौपाट्या इत्यादि इतिहासप्रसिद्ध स्थळांवर अनेकदां ' लाइनी ' मारल्या, पण कोठेंच खडा

लागेना. या खड्यावरूनच मला एके दिवशीं, ‘ नक्का मारूं खड्डा, शिरीं भरला घड्डा ’ ( याला ढंगदार शब्दोच्चार म्हणतात. ) या गाण्याची आठवण झाली आणि अचानकपणें भावगीतें गायला शिकविण्याशा वर्ग काढण्याची कल्पना माझ्या टाळक्यांत आली. मला तसें भावगीतांचें दळण वऱ्यांपैकीं दळतां येतें. ( विचारा : कोणत्याहि हैराण चेहऱ्याच्या सहनशील मराठी माणसास ).

एक पेटी ( ‘ दोन्ही हातांनीं वाजवायची ’ ) आणि तबला–डग्गा जमवून मी भावगीतें गायला शिकविण्याचा वर्ग काढण्याचें ठरविलें आहे. भावगीतें शिकायला येणाऱ्या स्त्रियांत बऱ्याच श्रीमंत पुरंध्री असायचीच भीति आहे. त्यांतल्या कांहींचा आकार लोणच्याच्या ( लिंबाच्या किंवा आंब्याच्या ) बरणीसारखा असेल, तर कांहींचा डाल्डाच्या दहा पौंडी डब्यासारखा असेल. ( पहा : एक गॅलन घासलेट आणण्यासाठीं तुम्ही वापरीत असलेला डाल्डाचा डबा ) त्यांचा अर्थात् मला कांहींच उपयोग नाहीं. अशा बायकांना, ‘तुम्हांला नृत्य शिकायला योग्य असें शरीर आहे’ असें सांगून पिटाळणार आहें.

माझ्या या वर्गात कांहीं अविवाहित तरुणीहि नक्की येतील. त्यांना कॉलेजच्या गॅदरिंगांत, ‘ चंद्रा जारे जारे ’ असलें भावगीत अभिनयासहित म्हणायचें असतें. ( या गाण्याच्या वेळीं मी ‘ जारे जारे ’ हे शब्द म्हणायच्या वेळीं ‘ हातरे काऊ ’ चा अभिनय शिकवणार आहें. )

या पोरींपैकीं एखादी काठीला पातळ नेसविल्यासारखी दिसणारी सुकट, हडकुळी ( यालाच ‘ सडपातळ अंगकाठी ’ असें म्हणतात. ) पोरगी मिळाली तरी चालेल. आपल्या अंगावर आतां फारसें मांस येण्याची आशा नाहीं अशी या पोरींना आंतून चिंता वाटत असते. त्यामुळें असली एखादी पोरगी मला सहज मिळेल. माझा हा आडाखा बरोबर ठरणार आहे, असा माझा आंतला आवाज सांगत आहे.

माझा हा उपद्व्याप पाहून, माझ्या एका मित्रानें माझ्या नांवाचीं आद्याक्षरें घेऊन त्यांनींच सुरुवात होणारें ‘ लग्न जमविण्याचा उपद्व्याप ’ ही नवीन उपाधि मला चिकटविली आहे.

टीप : माझें लग्न जमल्यावर ( म्हणजे न फिसकटतां झाल्यावर ) तबला, पेटी, फुंकून टाकणें आहे. गरजूंनीं माझ्या लग्नांच्या टेहळणीवर असावें.

* * *

# साहित्य विषयक जाहिराती

## रक्ताची शाई

महाराष्ट्रांतील कांहीं लेखक रक्तानें लिहीत असल्यामुळें त्यांच्या शरीरांतील रक्ताचा सांठा कमी होऊन ते नेहमीं आजारी पडतात. अशा लेखकांची गरज लक्षांत घेऊन, ज्यांच्या रक्तांत लेखकाचे जंतू ( Jerms ) आहेत अशा तगड्या माणसांच्या शरीरांतून शुद्ध ताजें रक्त काढून तें आम्ही सीलबंद बाटल्यांतून विकतों.

किंमत १ पौंडी बाटली रु. २५
,, ८ औंसी बाटली रु. १३
,, ४ औंसी बाटली रु. ७
( ट. ख. निराळा. )

वि. सू. :—बाटली परत करणाऱ्यास अनुक्रमें ३, २, १ पेनें भरून रक्त मोफत मिळेल.

कांदेकर आणि कं.,
रक्ताच्या शाईचे एकमेव कारखानदार,
लांडगेपूर.

* * *

## आत्महत्या करण्यापूर्वी—

आपला प्रेमभंग होऊन आपलें हृदय भग्न झालें असलें तर आत्म-हत्या करून तें पुरतें नाहींसें करून टाकूं नका. आम्ही भग्न हृदयें 'सेकंडहँड' भावानें विकत घेतों. आम्ही लेखक असल्यामुळें आम्हांला प्रत्येकाच्या हृदयाची किंमत कळते. ( श्रीमंती नव्हे ! ). जी किंमत होईल तिच्या निम्या किंमतींत भग्न हृदय विकत घेतलें जाईल. एकेका दिलाचे हजार तुकडे झालेले असले तरी चालतील. कारण हृदयाचे जिकडे तुकडे अधिक

तेवढा प्रेमभंग दारुण ! आम्हांला वस्त्रगाळ चूर्ण झालेलें हृदयसुद्धां चालतें. कथाकादंबऱ्यांतून प्रेमभंगाच्या प्रसंगीं वापरायला आम्हांला असलीं हृदयें लागतात.

वि. सू. :—भग्न हृदयाबरोबर प्रेमभंगाचें—पर्यायानें हृदयभंगाचें—कारणहि द्यावें. म्हणजे कथाकादंबऱ्यांतून आम्हांला हाच मालमसाला वापरतां येईल, आणि कथानकाला वास्तवतेचाहि वास येईल.

राइट राइट ब्यूरो,
( Write Right Bureau )
मुंबई

* * *


प्रसिद्ध झालें ! प्रसिद्ध झालें !

**शरीरविज्ञान-शास्त्र**
अर्थात्
**स्त्रियांच्या अवयवांचा सुलभ पंचनामा**
लेखक : **प्रा. चिंधे**

• पुष्कळ होतकरू कथालेखकांना आणि कादंबरीकारांना स्त्रियांचें वर्णन नीट करतां येत नाहीं; त्यामुळें वाचकांचा रसभंग होतो. म्हणून उदयोन्मुख लेखकांना आणि ( चुकून ) मोठे झालेल्या लेखकांना कथा-कादंबऱ्यांतून पेरण्यासाठीं उपयोगी पडावें, म्हणून या पुस्तकांत स्त्रियांच्या अवयवांची छाननी करून साकल्यानें मिह्नास वर्णन केलेलें आहे. ( हें पुस्तक लेखकांशिवाय वैद्यकीय विद्यार्थ्यांना आणि मृत देहाचा पंचनामा करतांना पोलिसांनाहि उपयोगी पडेल. )

पुस्तकांत ‘ विषया ’ स अनुलक्षून ( अ ) योग्य चित्रेंहि दिलेलीं आहेत.

मूल्य : ७ रु. १५ आणे १२ पै फक्त.

प्रकाशक : मुष्टि प्रकाशन, मुंबई.


* * *

## पाठकोरी रद्दी

लेखकांना लेख लिहायला उपयोगी पडणारी रद्दी आमच्याकडे नेहमीं मिळते. लेखकाचा आणि रद्दीचा ' कुक्कुट–अंडज–न्यायी ' संबंध आहे. ' आधीं लेखक कीं आधी रद्दी ' असा वाद निर्माण होण्याइतका हा संबंध पुरातन आहे.

नाहींतरी लेखकाला रद्दीच निर्माण करायची असते. मग पाठकोऱ्या रद्दीच्या पार्श्वभूमीवर नवनिर्मित रद्दी अधिक खुलून दिसणार नाहीं काय ?

कोऱ्या कागदावर रद्दीचे अथवा अन्य कसलेच संस्कार झालेले नसतात. त्यामुळें असल्या असंस्कारक्षम कोऱ्या कागदापेक्षां पाठकोरे कागदच साहित्यनिर्मितीस अधिक योग्य होत. बहुतेक नांवाजलेले लेखक कसल्यातरी पाठकोऱ्या रद्दीवरच आपलें साहित्य लिहून प्रसिद्धीस पाठवितात. ( पहा : कोणत्याहि संपादकाचें टेबल. ) आणि उदयोन्मुख लेखक कोऱ्या कागदावर एक बाजू कोरी ठेवून लेख पाठवतात तरी त्याचें साहित्य स्वीकारलें जात नाहीं. ( पहा : कोणत्याहि संपादकाची कचऱ्याची टोपली. )

म्हणून आमची पाठकोरी रद्दी घ्या आणि बडे साहित्यिक बना !

दगडोबा रद्दीवाले,
जुना बाजार गल्ली, मुंबई.

* * *

# आध्यात्मिक जाहिराती

### " मरणं प्रकृतिः शरीरिणाम् "

मनुष्यदेह हा क्षणभंगुर; आतां आहे तर नंतर नाहीं !

हें आजपर्यंत अनेक साधुसंत सांगत आलेले आहेत; आणि प्रत्यहीं हें आपल्या प्रत्ययासहि येत असतें.

मरण हें यायचेंच ! मग आमच्या ' रिअल डेस्टिनेशन १२ ' या मॉडेलची मोटर विकत घेऊन आपण आपल्या लाडक्या पत्नीची मोटार चालविण्याची हौस कां पुरवीत नाहीं ?

‘ रिअल डेस्टिनेशन १२ ’ चीं वैशिष्ट्यें :

[ १ ] ही वाटेल तेवढी भरधांव सोडतां येते.

[ २ ] काटकसरीच्या दृष्टीनें हिला ‘ ब्रेक्स ’ बसविलेले नाहींत.

[ ३ ] मुक्कामाला (?) अपेक्षेपेक्षां लौकर पोहोंचतें.

आपल्या विक्रेत्याकडे चौकशी करा किंवा भेटा.

—अर्थ हेवन मोटर्स लि.

* * *

**“ हें मन चंचल मोठें ।**
**नकळे घाचा अंताचि कोठें ॥ ”**

( कै. बाबा गर्देकृत ‘ गीतामृत शतपदी. ’ )

हॉटेलांत जाणाऱ्या प्रत्येक गिऱ्हाइकाला या उक्तीचा प्रत्यय येतो. ताक पिण्यासाठीं हॉटेलांत जावें तों ताकच प्यावें कीं कांद्याचीं भजीं खावीं कीं दोन्ही चापावीं, असा चंचल मनाला संभ्रम पडतो. अखेर ताकाच्या अगोदर नुसतीं भजींच नव्हे, तर दहींमिसळ, कांदे-पोहे यांचाहि फडशा पडतो, आणि तरी चंचल मन आतां कोठें थांबणार, याचा अंत लागत नाहीं. परिणामीं प्रकृति बिघडते, आणि डॉक्टरचीं बिलें भरावीं लागतात. तीं कमी भरावीं लागावीं अशी इच्छा असेल तर आमच्या हॉटेलला आश्रय द्या. कारण आमच्या चिरंजिवांना आम्हीं मुद्दाम डॉक्टरकीचें शिक्षण दिलें आहे. आमचा आणि त्यांचा धंदा परस्परपूरक आहे म्हणून आम्हीं हें डोकें लढवलें असें कांहीं चावट लोक म्हणत असले तरी, खरोखरी यांत आमच्या गिऱ्हाइकांचा फायदा असून चिरंजिवांचा तोटा आहे. कारण आमच्या गिऱ्हाइकांना ते इतरांच्या केवळ पाऊणपट फी घेऊन औषधोपचार करतात. चंचल मनाचे चोचले पुरवून पुन्हा स्वतःचे पाव हिस्सा पैसे वांचवण्याची अशी सोय आपल्याला दुसऱ्या हॉटेलांत आढळणार नाहीं. म्हणून आमच्याच हॉटेलला आश्रय द्या !

—चंचलविलास हॉटेल, कांदेवाडी.

* * *

**" नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**
**न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥"** गीता २–२३.

आत्मा हा कसा अमर आहे हें गीतेंत सांगितलें आहे. आत्म्याचे शस्त्रानेंहि तुकडे होत नाहींत, आत्मा आगींत टाकला तरी जळत नाहीं, पाण्यांत टाकला तरी भिजत नाहीं किंवा वारा याला शुष्क करूं शकत नाहीं.

बरोबर हेंच वर्णन आमच्या ' कडक रेवडी ' ला लागू पडतें. आमच्या रेवड्यांना लागणारा साखरेचा पाक, आम्ही आमचा आत्मा साखरेंत ओतून करीत असतों. म्हणून आमच्या ' कडक रेवड्या ' ' आत्मौपम्य ' अशा होतात.

—दगडोबा कडक रेवडीवाले.

* * *

**" घटका गेली, पळें गेलीं तास वाजे ठणाणा ।**
**आयुष्याचा नाश होतो ' राम ' कां रे म्हणा ना ? "**

——रामदास.

आयुष्य भराभर निघून जातें, आणि मानवाच्या हातून कांहींच क्रिया होत नाहीं हें पाहून रामदासस्वामी वैतागून म्हणाले, ' घटका–पळें–तासां नीं असें आयुष्य फुकट घालविण्यापेक्षां एखाद्या दिवशीं [ पटकन् ] ' राम ' का रे म्हणानांत ? आँ ! '

रामदासस्वामींनीं वरील उद्गार काढले तें ठीक झालें. ते महान् तपस्वी होते. त्यांना तास, घटिका, पळें, विपळें हीं सर्व बिनचूक कळत होतीं. परंतु सामान्यजनांना ' राम ' म्हणण्यापूर्वीचा आपला काळ किती गेला हें कळायला कांहीं साधन पाहिजे ना ?

अर्थात् पाहिजे !

आणि तें म्हणजे——

' राम बोलो घड्याळें. '

आयुष्यांतला काळ कसा निघून जातो हें गणितशुद्ध रीतीनें ( ६० सेकंद १ मिनिट इ० ) अचूक दाखविणारें हें घड्याळ जगप्रसिद्ध आहे.

वि. सू. : परमेश्वराचें नामस्मरण करतांना ब्रह्मानंदीं टाळी लागली असतां परत शुद्धीवर आणण्याकरितां गजराचीं घड्याळेंहि मिळतात. ठरलेल्या वेळीं अचूक समाधि उतरविली जाते.

——घटिकायंत्र लि.

* * *

“ जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ ” गीता २–२७.

( जो जन्मला त्याला मृत्यु निश्चित आहे. आणि जो मेला त्याला जन्म निश्चित आहे. म्हणून या अपरिहार्य गोष्टीचा शोक करणें तुला उचित नाहीं. )

सर्व व्याधींतून मानवाची इहलोकांतून मुक्तता करण्याचें सामर्थ्य केवळ परमेश्वराच्याच ठायीं आहे. परंतु परमेश्वरानें आपला अंश डॉक्टरांच्या ठायीं ठेवून इहलोकांतल्या मानवजातीची सोय करून ठेवली आहे.

डॉक्टरांकडे न येणारे मानव व्याधींत महिनोन् महिने खितपत पडलेले असतात. परंतु डॉक्टरांकडे येणारे व्याधिग्रस्त अल्पावधींत स्वतःसह व्याधिमुक्त होतात. [ साहित्यकार याला ‘ सहोक्ति अलंकार ’ म्हणतात. ] आणि यालाच अज्ञ लोक ‘ मरण ’ असें म्हणतात. परंतु मरण हें मरण नसून तें एक महान् जीवन आहे. [ हा वदतोव्याघात नव्हे हं ! ] पहिलें मरण म्हणजे दुसऱ्या जीवनाची सुरुवात ! आमच्या दवाखान्यांतलें औषध घ्या आणि नव्या जीवनाला सुरुवात करा.

वि. सू. : आमचें प्रसूतिगृहसुद्धां आहे. म्हणजे जन्मलेल्यांना मरण आणि मेलेल्याला जन्म हा भगवंतांनीं सांगितलेला चक्रनेमिक्रम आमच्या दवाखान्यांत आणि प्रसूतिगृहांत नित्य दृष्टोपत्तीस येतो.

——डॉ. य. म. किंकर

* * *

**“ हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।**
**तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ” गीता २-३७.**

“ श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, ‘ युद्धांत मेलास तर स्वर्ग मिळेल आणि युद्धांत वांचलास तर पृथ्वीचा उपभोग घेशील. ( युद्ध केलें कीं कुठूनहि फायदा हा ठेवलेलाच ! ) म्हणून हे अर्जुना, युद्धाचा निश्चय करून ऊठ ! ”

जगात कांहीं गोष्टी अशा असतात कीं त्यांच्या दोन्ही बाजू फायद्याच्याच असतात. युद्ध हें कसें दुहेरी फायदेशीर असतें हें भगवान् श्रीकृष्णांनीं वर सांगितलेलेंच आहे. परंतु युद्ध म्हणजे काय, खायच्या गोष्टी आहेत ? तेथें मारे चालते कापाकापी !

मग सामान्यजनांना, ‘ असाहि फायदा, तसाहि फायदा ’ करून देणारी अशी एखादी गोष्ट या अवनीतलावर आहे काय ?

होय ! आहे !

आणि ती म्हणजे विमा उतरणें ही होय !

विम्याच्या ठरलेल्या मुदतीपर्यंत तुम्ही जिवंत राहिलांत तर विम्याचे पैसे तुमचेच आहेत. आणि मध्येंच जीवनयुद्धांत खर्ची पडलांत तरी तुमची पुरी रक्कम तुमच्या पत्नीला अथवा अन्य वारसाला मिळणार हें निश्चित !

जगा अथवा मरा ! विम्याची रक्कम ही तुमचीच आहे !

म्हणून उठा आणि विमा उतरण्याचा निश्चय करा !

—दि लिव्हिंग अँड डाइंग इन्शु. कं. लि.

* * *

**या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ”** गीता २-६९.

[ सर्व लोकांना जी रात्र वाटते तेथें संयमी पुरुष जागा असतो; आणि जेथें सामान्य लोक जागे असतात तेथें या तत्त्वज्ञानी मुनीला रात्र भासते. ]

भगवंतांनीं गीतेंत संयमी तत्त्वज्ञान्याची जगावेगळी उरफाटी तऱ्हा सांगितलेली आहे.

या संयमी तत्त्वज्ञान्याप्रमाणेंच दिवसां झोंपून आणि रात्रीं जागून करतां येण्याजोगी नोकरी आहे. [ हिलाच गीतेंत ' कर्मयोग ' अशी संज्ञा आहे. ]

' भवसक्ति ' ( संसार करण्याची सक्ती ) दैनिकांत कायमची रात्रपाळी असलेल्या, उपसंपादकांच्या कांहीं जागा भरायच्या आहेत. ही नोकरी करणाऱ्यास भगवंतांनीं वर सांगितलेल्या संयम्याची योग्यता सहज लाभेल. ( सगळ्या रात्री ' भवसक्ती 'च्या कर्मभूमींत घालविल्यावर अंगीं ' संयम ' न येईल तरच नवल ! )

पगार : ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' असा दंडक खुद्द भगवंतांनींच घातला असल्यामुळें आम्ही पामर तो मोडण्यास असमर्थ आहोंत.

मालक : ' भवसक्ति ' पेपर्स ग्रुप.

* * *

## ' छे छे ' अलंकार

मराठी माणूस आणि पर्यायानें मराठी स्त्रिया गरीब असल्यामुळें त्यांच्या अंगावर अलंकार कमी असतील, परंतु मराठी भाषेच्या गळ्यांत ?




छे ! छे ! मराठी भाषारूपी स्त्रीच्या गळ्यांत जुने संस्कृत अलंकार तर आहेतच; परंतु अजूनहि तिच्या सुपुत्रांकडून दररोज नवे नवे अलंकार तिच्या गळीं पडत आहेत. ( काय हा गळेपडूपणा ! ) अशा नवीन अलंकारांपैकींच ' छे ! छे ! ' हा अलंकार आहे.

दोन आवश्यक वस्तूंपैकीं एखाद्या गोष्टीचा अभाव किंवा नकार दर्शविण्याचा असल्यास त्यांपैकीं अग्रक्रम कोणास द्यावा या बाबतींत हा अलंकार वापरला जातो. ' भुक्कड कोटी ' हें या अलंकाराचें प्रमुख लक्षण आहे.

महाराष्ट्रांतील एका प्रख्यात साहित्यिकानें या अलंकाराचीं असंख्य लेणीं महाराष्ट्रशारदेच्या ( बिचारी शारदा ! ) अंगाखांद्यावर चढविलीं आहेत. मी एक उदयोन्मुख ' साहित्य-सोनार ' आहें. ( बरोबर आहे ना ? ) म्हणून मीहि ' छे छे ' अलंकाराच्या चारदोन कुडया, बुगडया, चमक्या, अंगठ्या श्रीमच्छारदाचरणारविंदीं अर्पण करूं इच्छितों.

माणसाला एखादे वेळीं अक्कल नसली तरी चालेल परंतु दुक्कल ? ( जोडीदार ) छे ! छे !

जेवणांत एखादे वेळीं नारळाचा चव नसला तरी चालेल, परंतु जेवणाला चव ? छे ! छे !

गनिमीकाव्यांत रहस्य नसलें तरी चालेल; (काय हें ?) परंतु प्रेम-काव्यांत छे ! छे !

एक वेळ आपली बाईल हरवली तरी चालेल; (काय हें ?) परंतु ऑफिसमधील कॉन्फिडेन्शल फाईल ? छे ! छे !

रंगेलपणाच्या बाबतींत एखादे वेळीं तरणीं खोंडें परवडतील; परंतु म्हातारीं खोंडें ? छे ! छे !

माणसाला एक वेळ अक्कल नसली तरी चालेल; परंतु पँटला बक्कल ? छे ! छे !

विद्वानांना एक वेळ भूक नसली तरी चालेल; परंतु बुक ? छे ! छे !

प्रियेच्या फोटोवर एखादे वेळीं प्रेम नाहीं केलें तरी चालेल; परंतु फ्रेम ? छे ! छे !

एक वेळ माणसाला नाडी नसली तरी चालेल; परंतु विजारीला ? छे ! छे !

देवाला एक वेळ चंदन नसलें तरी चालेल; परंतु वंदन ? छे ! छे !

एक वेळ चष्म्याचें भिंग फुटलें तरी चालेल; परंतु माणसाचें बिंग ? छे ! छे !

एखादे वेळीं माणसानें घोडचूक केली तरी चालेल; (आम्ही त्याला माणूसच म्हणूं) परंतु गोड चूक ? छे ! छे !

युद्धखोर राष्ट्राजवळ एखादे वेळीं बॉंब नसला तरी चालेल; परंतु घरांतील प्रथमोपचाराच्या पेटींत बाम ? छे ! छे !

एक वेळ प्यायची माडी क्षम्य ठरेल, परंतु चढायची माडी ? छे ! छे !

प्रणयाच्या बाबतींत शुक-रंभा परवडतील; परंतु ‘ शुक् शुक् रंभा ’ छे ! छे !

साहित्यांतील कोणताहि भुक्कड अलंकार परवडला, परंतु ‘ छे ! छे ! ’ अलंकार छे छे !

* * *

## उद्यक अलंकार

“ आजचा मोह हें उद्यांचें पाप आहे ! ”

—कोणी एक मराठी लेखक.

आजच्या अर्थांतून उद्यां कसा अनर्थ निर्माण होतो किंवा आजच्या अनर्थांतून उद्यां कसा अर्थ निर्माण होतो हें दर्शविण्यासाठीं हा अलंकार वापरतात. हा अलकार वापरतांना वापरणाऱ्याला द्रष्टेपणा अवगत असणें अवश्य आहे. मी या अलंकाराचीं कांहीं उदाहरणें देत आहे :

आजचा ‘ आज ’ हा उद्यांचा ‘ काल ’ आहे.
आजचा बेकार हा उद्यांचा पुढारी आहे.
आजचें वर्तमानपत्र ही उद्यांची रद्दी आहे.
आजचा कुजका गूळ ही उद्यांची दारू आहे.
( हॉटेलांतील ) आजचीं भजीं ही उद्यांची चटणी आहे.
( नटीचें ) आजचें प्रेम हें उद्यांचें लग्न आहे.
( नटीचें ) आजचें लग्न हा उद्याचा घटस्फोट आहे.
आजचा प्रेमभंग ही उद्याची आत्महत्या आहे.
आजचा चंचुप्रवेश हा उद्यांचा मुसलप्रवेश आहे.
आजचें अंडें हें उद्यांचें आम्लेट आहे.
आजची कुमारी ही उद्यांची खुमारी आहे.
आजची खुमारी ही उद्यांची बिमारी आहे.
आजचा लबाड हा उद्यांचा मुत्सद्दी आहे.
आजची प्रेमकथा ही उद्यांची प्रेमव्यथा आहे.
आजचें सांचेबंद वाक्य हें उद्यांचें सुभाषित आहे.

ग्रंथ संग्रह
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

आजचा सिद्धांत हा उद्यांचा गाढवपणा आहे.
आजची एक तारीख ही उद्यांची दोन तारीख आहे.×
आजचा रविवार हा उद्यांचा सोमवार आहे.×
आजचें दहीं हें उद्यांचें ताक आहे.×
आजची मुलगी ही उद्यांची मुरगी आहे.
आजचा आवळा हा उद्यांचा भोपळा आहे.
आजची इंग्रजी शॉर्ट स्टोरी ही उद्यांची ( मौलिक ) मराठी लघुकथा आहे !

* * *

## जीवनालंकार

ऊठ सूट कोणत्याहि गोष्टीची जीवनाशीं सांगड घालण्यासाठीं हा अलंकार वापरण्यांत येतो. गोष्टी घेऊन त्यांपैकीं आधिक सुखाची असेल तें म्हणजे जीवन नव्हे; तर दु:खाची जी गोष्ट असेल तें जीवन होय, असें सुचवितांना या अलंकाराचा उपयोग करतात. जीवनालंकाराचें एकेक उदाहरण म्हणजे सांचेबद्द सुभाषित तयार होतें. खालीं कांहीं जीवनालंकार माल्लिनाथीसह दिले आहेत !

* * *

“ जीवन हें अंकगणिताचें पुस्तक नसून ती एक कादंबरी आहे ! ”

—कोणी एक महान् मराठी लेखक.

वरील जीवनविषयक विचार वाचल्यावर मला जीवनाकडे निरनिराळ्या रूपकांतून पहाण्याची संवयच लागली. आणि बघतांबघतां शेंकडों रूपकें तयार झालीं ! त्यांपैकीं कांहीं निवडक ‘ जीवन–रूपकें ’ मल्लिनाथीसह पुढें देत आहें.

---

× काय हा द्रष्टेपणा !

" जीवन हें अंकगणित नसून आलजिब्रा ( बीजगणित ) आहे. "

—खरोखरच जीवनाकडे अंकगणिताच्या निश्चित मूल्याच्या (Constant Value) दृष्टीनें पहाणें योग्य नाहीं. अंकगणितामध्यें ५ या आंकड्यांची किंमत कोणत्याहि परिस्थितींत ५ हीच असते. परंतु बीजगणितांतील एक्स वाय् झेड् यांची किंमत आपल्याला वाटेल तशी बदलतां येते. ती बदलतां येण्याजोगी ( Variable ) असते. जीवनाचेंहि तसेंच आहे. आपल्या जीवनाला कधीं लाख किंमत येते, तर कधीं तें कवडीमोलाचेंहि ठरतें. इतकेंच काय कित्येक वेळां मायनस एक्स (–X) इत्यादीप्रमाणें जीवनांत कर्जहि आपल्या नाशिबीं येतें !

" जीवन हें केशवर्धक तेल नसून बादशाही साबू आहे !"

—जीवनांत आपण एखादी फायद्याची गोष्ट करायला जातों. परंतु फायदा तर सोडाच, फायद्याच्या मुळावरच घाव घालणारा तोटा मात्र पदरीं येतो. केंस वाढण्यासाठीं म्हणून डोक्यावर केशवर्धक तेल चोळण्याऐवजीं चुकून बादशाही साबूचा फेंस लावला जावा आणि दुर्दैव आपल्यापुढें उभें रहावें तसें हें जीवन आहे.

" जीवन ही पुरणपोळी नसून आम्लेट आहे ! "

—आपल्या जीवनांत सुखदुःखें नेहमींच येतात. सुख कमी वेळां मिळतें. आणि जें मिळतें तें बऱ्याच वेळां दुसऱ्यांच्या दुःखावर आधारलेलें असतें. आम्लेट खाल्ल्यानें आपल्याला जिव्हालौल्य पुरविल्याचें सुख मिळतें, परंतु एका जन्मास येऊं घातलेल्या कोंबड्याच्या पिलाचा जातपूर्व बळी घेऊन हें सुख आपण उपभोगतों. या सुखांत पुरणपोळीचा निर्मळ, निष्पाप आनंद नाहीं. पुरणपोळी करायला कोणाची हत्या करावी लागत नाहीं; ती खातांना गोड लागते; ती पुरवठ्यालाहि येते आणि ती खाल्ल्यावर सुखनिद्राहि येते; मानवी जीवनांत नेमक्या याच गोष्टींचा अभाव दिसून येतो. परदुःखावर आधारलेलें सुखी जीवन, माधुर्याचा अभाव, अपुरेपणा यांनीं मानवी जीवन बरबटलेलें आहे. म्हणून त्याचें आम्लेटशींच अधिक साम्य आहे.

“ जीवन म्हणजे कॉलेजांतलें प्रेम नसून प्रेमाचें कॉलेज आहे ! ”

—कॉलेजचा कोर्स चार–सहा वर्षांचा. एवढ्या अवधींत अभ्यास सांभाळून प्रेम करावयाचें. या प्रेमांतहि प्रेमापेक्षां लैंगिक आकर्षणच जास्त. एकंदरींत कॉलेजांतलें प्रेम थिल्लर आणि अपरिपक्व असतें. म्हणून कॉलेजांतलें प्रेम म्हणजे जीवन नव्हे.

उलट आपलें विशाल आणि विस्तृत जीवन हें प्रेमाचें कॉलेज आहे. प्रेम कसें करावें, कुठें करावें, किती करावें, कुणावर करावें, किती वेळ करावें, कोणत्या प्रकारचें करावें ( खरें अथवा खोटें ), इत्यादि सर्व प्रेमळ गोष्टींचें ज्ञान या जीवनाच्या कॉलेजांत मिळतें.

“ जीवन ही बिसमिल्लाची सनई नसून तिरखवाँचा तबला आहे. ”

——आपलें जीवन हें दुःखानें भरलेलें आहे. यांत आपल्याला सनईचा मंजूळ स्वर क्वचितच ऐकायला मिळतो. उलट तबल्याप्रमाणें थपडा खाण्याचेच ( आणि ‘थाप’ देण्याचेहि ! ) प्रसंग फार येतात.

“ जीवन ही सिगारेट नसून गांवठी विडी आहे ! ”

—मानवी जीवन हें सिगारेटच्या रंगाप्रमाणें धवल नसतें. तें विडीच्या रंगाप्रमाणें मलिन असतें. सिगरेट एकदां पेटविली कीं, ती संपेपर्यंत जळत रहाते. परंतु विडी मात्र मधूनमधून झुरके घेतले नाहींत तर विझून जाते. जीवनांतसुद्धां मधूनमधून उत्साहाचे झुरके घ्यावे लागतात. नाहीं तर तें निकामी होतें.

* * *

# तेथें कर माझे जुळती ! १२

प्रेमभरानें, आदरानें, आनंदानें हृदय उचंबळून येणारे कितीतरी प्रसंग आपल्या आयुष्यांत येतात. अशा प्रसंगीं आपले हात श्रद्धेनें आपोआप जुळतात. कित्येकदां सामान्य प्रसंगींहि आपले हात तात्कालिक श्रद्धाळूपणाच्या आहारीं जाऊन क्षुल्लक वस्तूपुढें जुळतात. सामान्य प्रसंगीं आणि सामान्य वस्तूपुढेंहि हात जोडण्याचें वय म्हणजे बालवय होय. आणि कांहींजणांच्या बाबतींत ही संवय मोठेपणींसुद्धां कायम रहाते. या बाबतींतले खुद्द माझ्या बाबतींत घडलेले प्रसंग आणि अजूनहि घडणारे प्रसंग देत आहें—



पंढरपुरांत ‘ अकबर टॉकीज ’ आणि ‘ न्यू अकबर टॉकीज ’ हीं दोन चित्रपटगृहें एका स्थानिक मुसलमानाच्या मालकीचीं आहेत. त्यांपैकीं एका चित्रपटगृहांत ‘ अयोध्येचा राजा ’ ही प्रभातची ‘ पहिली बोलती–गाती फिल्लम ’ लागली होती. त्यावेळची गोष्ट आहे ही :

त्यापूर्वीं आम्ही जे चित्रपट पहात असू ते मुके असत. आणि हा चित्रपट पाहात असतांना हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास इत्यादि मंडळी बोलतांना, गातांना पाहून मला आश्चर्यच वाटलें. हीं निर्जीव चित्रें बोलतात, गातात कशीं, याचें मला कोडेंच पडलें. आणि अर्थात्च या घटनेचें सारें श्रेय मी चित्रपटगृहाचे मालक शेठ अकबरअल्ली यांना देऊन टाकलें ! मुसलमान लोकांच्या हरहुन्नरीपणाबद्दल मला आदरहि वाटला. नाहींतर

आम्ही हिंदू ! पंढरपुरांतले सारे ब्राह्मण स्नानसंध्या नि पूजाअर्चा करीत होते, आणि ब्राह्मणेतर 'ग्यानबा–तुकाराम' करून टाळ कुटीत होते, तेव्हां एक मुसलमान, निर्जीव चित्रांकडून संवाद वदवून घेतो हें पाहून कोणाचें अंतःकरण उचंबळून येणार नाहीं बरें ? अकबरअल्लींचें हें कर्तृत्व पाहून मी त्यांना ज्ञानेश्वरांइतकेंच पूज्य मानूं लागलें..

हा चित्रपट पाहिल्यावर मला, काकांना, थोरल्या भावाला सर्वांनाच आश्चर्य वाटलें कीं चित्रें बोलतात कशीं ? या जिज्ञासेच्या पोटीं आमच्या काकांनीं दोन–चार दिवसांत बातमी आणली ती अशी :

अकबरअल्ली हा मुसलमान असला तरी पंढरपुरांतील हिंदूंची बहुसंख्या ध्यानांत घेऊन त्यानें आपल्या पदरीं एक विद्वान् ब्राह्मण पुराणिक ठेवला आहे. त्या ब्राह्मणानें अकबरअल्लीला महाभारत वाचून दाखविल्यावर त्या म्लेंच्छवरानें त्यांतून 'हरिश्चंद्र–आख्यान' चित्रपटासाठीं घेतलें. नंतर त्या आख्यानाचे नाटकासारखे संवाद करविले. हे संवाद एक पुरुष आणि एक स्त्री यांच्याकडून तोंडपाठ करवून घेतले. हीं दोघें पडद्याचे मागें उभीं राहून पुरुष अथवा स्त्री पात्रांच्या संवादाच्या वेळीं बोलत असत.

परंतु, यानंतर एक–दोन दिवसांनीं माझ्या थोरल्या भावानें अधिक अधिकृत माहिती आणली ती अशी :

पडद्यामागें स्त्री–पुरुषबिरुष कुछ नहि ( कमाल आहे ! ) गाण्यांच्या रेकॉर्डप्रमाणें सर्व संवादाच्या रेकॉर्डस् घेऊन ठेवल्या आहेत. चित्रपट दाखवावयाच्या खोलींत दोन ग्रामोफोन सुसज्ज ठेवलेले आहेत. एका फोनोवरची प्लेट संपली कीं तत्क्षणींच दुसऱ्या फोनोवर त्याच्यापुढच्या संवादाची प्लेट सुरू होते.

थोरल्या भावानें सांगितलेली बातमी मला अधिक विश्वसनीय अशी वाटली.

एकंदरींत अकबरअल्ली हा फार मोठा माणूस आहे, हें माझ्या मनावर पक्कं ठसलें. इतका मोठा असूनहि किती विनयशील ! स्वतः म्हणून कधीं पडद्यावर आला नाहीं ! गांधी–नेहरू सुद्धां पडद्यावर कितीदां आले नि गेले ! चित्रपट संपण्यापूर्वीं तो सर्व प्रेक्षकांना ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें

कुठून तरी बोलायचा, 'मित्रहो आणि भगिनींनो ! ( 'मित्रहो ' या सार्वजनिक संबोधनांत माझाहि समावेश असल्यामुळें माझें अंतःकरण उफाळून येत असे ! ) आपण असेंच वरचेवर येऊन आम्हांला असाच उदार ( उधार नव्हे हं ! ) आश्रय देत जावा अशी नम्र विनंति आहे! '

किती विनम्रतापूर्ण वाक्य ! आम्ही पामर कसले त्या महान् व्यक्तीला आश्रय देणार ? उलट त्यानेंच आम्हांला आपल्या थिएटरांत अडीच तासपर्यंत आश्रय दिला आणि आमच्या हिंदु राजाचें दर्शन आम्हांला घडविलें. या 'पब्लिक ' विनंतींत माझ्यासारख्या शेंबड्या पोरालाहि ( त्या दिवशीं मला सर्दी झाल्याचें अजूनहि आठवतें ) त्यानें विनंति करावी हें पाहून माझें अंतःकरण भरून आलें आणि न कळतच अंधारांत माझे हात अदृश्यमान अकबरअल्लीच्या दिशेनें जुळले.

अधटराव या आडनांवाचा एक तरुण या चित्रपटगृहांत फिल्मऑपरेटर म्हणून काम करीत होता. आख्खा 'अयोध्येचा राजा ' हा माणूस आपल्या कर्तबगारीनें दाखवीत असल्याचें मला माझ्या एका शाळासोबत्यानें रस्त्यांत त्याच्याकडे अंगुलिनिर्देश करून सांगितलें, तेव्हां तर मला आनंदाचे भरतेंच आलें ! अकबरअल्लीनें सिनेमा काढला असला ( असें मला वाटत होतें ) तरी तो प्रत्यक्ष पडद्यावर चालता, बोलता दाखविण्याचें काम या हिंदु वीरानें केलेलें पाहून माझी तेवीस इंची छाती ताडकन् चोवीस इंची झाली ! मी माझ्या दोस्ताची नजर चुकवून त्याला हात जोडून नमस्कारहि केला. परंतु त्या विनयशील हिंदु तरुणाचें माझ्या नमस्काराकडे लक्षच नव्हतें. खरीं मोठीं माणसं नमस्काराला नि प्रसिद्धीला हपापलेलीं नसतात. अजूनहि अधटरावांचं नांव वर्तमानपत्रांत कधींहि आलेलं नाहीं. ( नाहींतर मालेनूकॅव्ह, आयसेनहॉवर यांचीं नांवं ! कित्येकदां आलीं नि गेलीं ! )

दुसरें महायुद्ध सुरू झालें, तेव्हां चित्रपटाच्या सुरवातीला 'युद्धस्य रम्या कथा ' दाखवीत असत. अशाच एका वार्तापटांत हिटलर भाषण करीत असल्याचें दृश्य दिसलें. हिटलर हा एक जगाचा उद्धार करायला आलेला एक महान् असामी आहे अशी माझी तत्कालीन ब्रिटिश-द्वेष्ट्या

मनाची ठाम समजूत होती. मदोन्मत्त ब्रिटिश साम्राज्याचा नाश करण्यासाठीं परमेश्वरानें ( नेहमीं भारतांत अवतार घेण्याची आपली परंपरा मोडून ) जर्मनींत ( किंवा ऑस्ट्रियांत ) अवतार घेतला आहे असें मला नक्की वाटायचें. त्याच्या नांवामागच्या 'हर' या शब्दावरून तर तो महादेवाचाच अवतार होता यांत शंकाच नव्हती ! महादेव ही संहाराची देवता आणि हिटलरनेंहि हेंच ( सत् ! ) कार्य हातीं घेतलें होतें. अशा ' हर ' स्वरूप हिटलरचें दर्शन चित्रपटांत होतांच माझें श्रद्धाळू अंतःकरण कांठोकांठ भरून आलें---कंठ दाटून आला आणि न कळतच ( थिएटरमधील अंधारांत ) खुर्चीवरून उठून ( मी त्यावेळीं खुर्चीचें तिकीट काढलें होतें. ति० दर : खुर्ची ८ आणे; खेळाच्या वेळां नेहमींप्रमाणें ) त्या असामान्य विभूतीला नमस्कार केला. कारण, दिव्यत्वाची जेथ प्रचीती । तेथें कर माझे जुळती ! '

स्टंट चित्रपटांतून जॉन कॉवस जेव्हां शत्रूच्या टोळीच्या तावडींत सांपडून असहाय स्थितींत असे, तेव्हां नादिया अचानकपणें तेथें येऊन तिनें शत्रूची दाणादाण करून जॉन कॉवसची सुटका केल्यावर तर मी नादियाला शतशः प्रणाम करीत असें. अहाहा ! धन्य ती महिला आणि धन्य तिची माउली—कीं जिनें या वीरांगनेला जन्म दिला. तिच्यासारखी कर्तबगार, शूर, ' हाइट ' वाली, बाई आमच्या पंढरपुरांत कधीं दिसली नाहीं !—जिकडे पाहाव्या तिकडे काकूबाई नि ठकूबाई !!

माझ्या लहानपणीं ' देवल सर्कस ' पंढरपुरीं आली होती. सर्कशींतल्या प्रत्येक खेळाडूचें जिवावरचें काम पाहून त्या त्या खेळाडूविषयीं माझ्या मनांत आदर उत्पन्न होऊन माझे हात नकळत त्यांच्या दिशेनें जुळायचे.

खेळ संपताना देवलबंधु आणि व्यवस्थापक एकजात गडद जांभळ्या रंगाचे सूट घालून रिंगणांत रांगेंत उभे राहायचे आणि आम्हां प्रेक्षकांकडे तोंड करून खाडकन् सलाम करायचे आणि ' खेळ खलास ! ' असें ऐटबाज हिंदींत सांगायचे. ( हें हिंदी कोणत्याहि प्रांतांत चालण्याजोगें आहे हें मागाहून माझ्या लक्षांत आलें. )

वाघ–सिंहांना चळचळा कांपायला लावणारे देवल बंधू माझ्यासारख्या चवली–पावली देऊन खेळ पाहाणारांना सलाम करतात हें पाहून मला कसेंसेंच वाटलें. मी रे कोण त्यांचा सलाम घेणार ? माझा रे काय तो अधिकार ? मी बसल्या जागेवरूनच त्यांना प्रतिसलाम करून वर आदरार्थी एक नमस्कारहि केला. ( मला परतफेडीसाठीं आणि नमस्कार माझी आदरांजलि म्हणून. ) एवढ्या मोठ्या देवलबंधूंच्या त्या ( सार्वजनिक ) सलामांतील माझ्या वांटणीच्या एक सहस्रांशाचा स्वीकार करतांना ( त्या खेळाला सुमारें एक हजार प्रेक्षक उपस्थित होते. ) माझा कंठ रुद्ध झाला होता आणि हृदय भरून आलें होतें !

माझा पहिला लेख ' किर्लोस्कर ' मासिकांत छापून आला त्या वेळची गोष्ट. हा लेख छापून येईल अशी मला मुळींच खात्री नव्हती. आणि कशी असेल ? एवढ्या मोठ्या मासिकांत माझ्यासारख्या सोळा–सतरा वर्षांच्या पोराचा लेख छापून यायचा म्हणजे काय चेष्टा आहे! तथापि मीं लेख रात्रीं पोस्टाच्या पेटींत नेऊन टाकला. पहिल्याच खेपेला ' साभार परत 'चा अपशकुन नको म्हणून मी लेखासोबत परतीचीं तिकीटेंच ठेवलीं नाहींत. ( ही पद्धत मी आजतागायत पाळत आहें. त्यामुळें निर्णय न कळावितांच तिकिटें मारणारे कांहीं भुरटे संपादक माझ्यावर जळफळतात !) पेटींत लेख टाकल्यावर मीं त्या पेटीला मनोभावें वंदन केलें आणि कुणाला कळणार नाहीं अशा बेतानें पेटीला एक प्रदक्षिणा घालून आणि ' पोस्टखात्याय नमः । सुवार्तायै नमः ' हा मंत्र पुटपुटून परतलों.

इतका धार्मिक विधि केल्यानंतर लेख छापून येणार नाहीं असं कधीं झालंय काय ? दुसऱ्या अंकांतच लेख छापून तयार ! मी तसाच धांवत त्या पोस्टाच्या पेटीकडे गेलों. आणि ' किर्लोस्करां 'तील माझ्या लेखाचें पान उघडून त्या पेटीला––देवाला नैवेद्य दाखवावा तसा––तो लेख मीं दाखविला. आणि पेटीला पुन्हां श्रद्धाळू अंतःकरणानें नमस्कार करून, ' वारंवारं असेंच साहित्य छापून येण्याय नमः ' अशी प्रार्थना करून प्रदक्षिणा घालून परत निघालों. या सर्व गोष्टी मी कोणाच्याहि लक्षांत येणार नाहींत अशाप्रकारें अगदीं सहज अशा केल्या !

ही पोस्टाची पेटी मी नवीन ठिकाणीं राहायला आलेल्या ठिकाणापासून लांब होती तरी मी त्याच पेटींत लेख नेऊन टाकीत असें. परंतु पुढें पुढें त्या पत्रांच्या पेटीकडे जाणें मला जिकीरीचें वाटूं लागलें. म्हणून मी जवळच्याच पेटींत लेख टाकूं लागलों. सगळ्या पत्रांच्या पेट्या एकाच पोस्टमाउलीचीं लेंकरें आहेत. मग या पेटींत टाकला काय नि तींत टाकला काय सारखेंच !

'देवल सर्कशी'त 'मृत्यूचा गोल पिंजरा' हा खेळ त्यांचें वैशिष्ट्य होतें. दोन खेळाडू एका अजस्र गोल पिंजऱ्याच्या आंतल्या बाजूनें फटफटी सायकली चालवीत असत. एकजण वरून खालीं आणि दुसरा पहिल्यास छेदून ( म्हणजे न 'छेदतां' ! ) आडवा अशारीतीनें संपूर्ण वेगानें फटफट्या चालवीत असत. प्रत्येक प्रयोग जिवावर उदार होऊन ( खेळाडूंच्या! प्रेक्षकांच्या नव्हे ! ) करण्याइतका भयानक आणि रोमहर्षक होता. हें काम दोन युरोपियन् माणसें करीत असत.

कालांतरानें पुन्हां 'देवल सर्कस' पाहण्याचा मला योग आला होता. 'दोडगे बंधूचें मृत्यूच्या पिंजऱ्यांतील काम पहा' अशी इंग्रजी जाहिरात मीं वाचली; आणि सर्कस पहायला मी अधिक उत्सुकतेनें गेलों. इतर खेळ झाल्यावर मृत्यूच्या पिंजऱ्यांतला खेळ सुरू होऊं लागला. नखशिखान्त शरीर झांकलेल्या आणि फक्त तोंडें उघडीं असलेल्या त्या नरवीरांनीं आम्हां सर्वांना लवून अभिवादन करून पिंजऱ्यांत प्रवेश केला. माझ्यासारख्या, पांच आणे देऊन पिटांत बसणाऱ्या लंगोट्या पोराला या नरशार्दूलांनीं नमस्कार करायचा आणि मी तो स्वीकारायचा या गोष्टीचें मला कसेंसेंच वाटलें. मीं जड अंतःकरणानें त्यांना नमस्कार केला आणि आकाशाकडे दृष्टि फिरवून, 'अपतनाय नमः, अटक्कराय नमः' अशी परमेश्वराची हात जोडून प्रार्थना केली. त्या दिवशीं मीं प्रार्थना मुद्दाम जास्त मनोभावें केली होती. कारण ते खेळाडू नेहमींप्रमाणें युरोपियन् नसून हिंदू होते. त्या खेळाडू-बंधूंचें आडनांव दोडगे असल्याचें मी चक्क इंग्रजी जाहिरातींत वाचलें होतें. त्यामुळें त्यांच्या जीवनाविषयीं मला विशेष आस्था वाटत होती. परमेश्वर माझ्या प्रार्थनेला जागला. दोडगेबंधू सुखरूप पिंजऱ्याबाहेर

आले. मी शेजारच्या एका माणसाला म्हटलें, ‘ बरं झालं ! दोडगेबंधु सुखरूप बाहेर आले. ’

‘ दोडगे–बंधू कोण दोडगे–बंधू ? ’ त्या गृहस्थानें आश्चर्यानें विचारलें.

‘ ते हो ! आतां मृत्यूच्या पिंजऱ्यांत फटफट्या फिरविलेले ! ’ मीं खुलासा केला.

‘ हां हां ! ते होय ? ’ खुलासा पटल्यासारखें करून तो म्हणाला, ‘ ते ‘ दोडगे–बंधू ’ ससून ‘ नसून ‘ डॉज–बंधू ’ आहेत. ’

माझ्याकडून ‘ DODGE ’ या नांवाचा उच्चार ‘ दोडगे ’ असा केला गेल्यामुळें माझ्या पदरीं हा मूर्खपणा आला होता. असो, एकंदरींत प्रणाम केला तो वीरांना केला एवढें समाधान मानून मी घरीं परतलों.

लहानपणीं वाटेल त्या गोष्टीला पाहून आणि कसलेंहि मूल्यमापन न करतां हात जोडण्याची माझी संवय या वयांतसुद्धां माझ्या अंगांत भिनून राहिलेली आहे.

नमस्कार करतांना नुसता नमस्कार करण्याऐवजीं त्या वंदनीय वस्तूला सस्कृत प्रत्यय लावून ( कांहीं वेळां बरोबर आणि बहुधा चुकीचे ) आणि पुढें ‘ नमः ’ जोडून नमस्कार केला म्हणजे तो अधिक पवित्र आणि धार्मिक होतो अशी एक माझी समजूत आहे.

कामावर गेल्यावर आंत उजवें पाऊल टाकल्याबरोबर संस्थेचें नांव मनांत आणून ‘ ......नमः ’ असें म्हणतों. आमच्या खात्यांत शिरतांना ‘ केमिस्ट्री डिपार्टमेंटाय नमः ’ हा मंत्र म्हणतों. तीव्र सल्फ्यूरिक ॲसिड हाताळतांना, एच् टू एस् ओ फोराय नमः ( $H_2SO_4$ ) ’ असें वंदन करूनच तें हाताळतों. पोटॅशियम् सायनाइडच्या बाटलीला स्पर्श करतांना, ‘ अमरणाय नमः। मार्कंडेयायुष्यायनमः ’ हा मृत्युंजय मंत्र तीनदां म्हणतों. सोडियम मेटल किंवा फॉस्फरस हाताळतांना ‘ अस्फोटायनमः । आग न लागण्यायनमः ’ हा ‘ फायर–फाइटर ’ मंत्र म्हणूनच मी बाटलीचें झांकण उघडतों.

आमच्या खात्यांत चमत्कारिक गुणधर्मांचीं कित्येक केमिकल्स असल्यामुळें

मला त्यांचा वापर करतेवेळीं म्हणायचीं शेकडों नमनें तयार करून ठेवावीं लागलीं आहेत. सर्व मंत्रांचा सांचा साधारणपणें वरच्यासारखाच आहे.

पंढरपुरीं जाण्यासाठीं ‘ मद्रास–एक्स्प्रेस ’मध्यें बोरीबंदरला जागा मिळविण्यापूर्वीं गाडीच्या गर्दींत घुसतांना तेवढ्या भाऊगर्दींतहि ‘ मद्रास–एक्स्प्रेसाय नमः । थर्डी फाइव्ह डाउनाय नमः । जागा मिळण्याय नमः ! पुढें वार्शी लाईट रेल्वेंतहि जागा मिळण्याय नमः ’ एवढीं प्रवासाइतकीं लांबलचक नमनें मी चटकन् मनांतल्या मनांत करून टाकतों !

नमस्कार करतांना मला वस्तूचें बंधन नाहीं पोस्टाची पेटी दिसली कीं कर नमस्कार ! भव्य इमारत दिसली कीं कर नमस्कार ! दारासिंगचें चित्र दिसलें कीं कर नमस्कार ! तेनासिंगचें चित्र दिसलें कीं कर नमस्कार ! पोस्ट दिसलें कीं कर नमस्कार ! बँक दिसली कीं कर नमस्कार ! भरधांव धांवणारी ‘ डेक्कन क्वीन ’ दिसली कीं कर नमस्कार !

असल्या दैनंदिन अनेक नमस्कारांमुळें नमस्कार हा माझ्या हातांचा स्थायीभाव होऊन बसला आहे.

हें सर्व वाचून बरेच वाचक म्हणतील, ‘ खोटं आहे हें ! असं बावळटा-सारखं कुणी उठल्या–सुटल्या नमस्कार करीत असतं काय म्हणायला ? ’

परंतु खरोखरच मी तसं करतों. कुणाच्या श्रद्धास्थानांची व्याप्ति किती आहे हें हल्लींच्या अश्रद्ध लोकांना काय माहिती आहे ?

—आणि मला हंसणाऱ्या तथाकथित बुद्धिवादी लोकांची दुसरीं कांहीं नमस्कारांचीं स्थळें नसतील हें तरी कशावरून ? असल्या श्रद्धाळू नमस्कारांचा विधि जो तो, दुसऱ्याला न दिसेल अशा दक्षतेनें मुकाट्यानें उरकीत असतो. त्यामुळें तो दिसूं शकत नाहीं एवढेंच !

माझ्या या नमस्कारांवर कुणी नाटक लिहिलं तर तें ‘ साष्टांग नमस्कारा ’पेक्षांहि उत्तम होईल हें निःसंशय ! ( अर्थात् आचार्य अत्र्यांनीं लिहिलें तर ! )


शेवटीं, संपादक आणि वाचक यांना नमस्कार करून आणि ‘ सर्वांना लेख आवडण्यायनमः ’ ही प्रार्थना करून पूर्णविराम देतों.

* * *

# दोन हृदयें



संध्याकाळची वेळ होती. सूर्य मावळण्याच्या बेतांत होता. मला माझ्या



लहानपणची आठवण झाली. ती सांगली ! ती कृष्णाबाई ! सांगलीलाहि सूर्य असाच मावळायचा. मीं लहानपणीं कितीदां तरी सूर्यास्त पाहिला असेल. परंतु आजचा सूर्यास्त कांहीं निराळाच होता. ती संध्याकाळ आणि ही संध्याकाळ. खरंच, माणसाचं मनसुद्धां दोन संध्याकाळांसारखं असतं. लहानपणच्या संध्याकाळांत एक प्रकारचं अबोध सौंदर्य–' अडगुलं मडगुलं ' या शिशुगीतासारखं–असतं; आणि तारुण्यांतल्या संध्याकाळांत उमर खय्याम किंवा जयदेव कवि यांच्या प्रेमकाव्याचं सौंदर्य प्रतीत होतं. संध्याकाळ तीच; परंतु वयोमानाप्रमाणें बघण्याचा दृष्टिकोन बदलत जातो. माणसाचं मनहि तेंच असतं; परंतु तें सहवासांत येणाऱ्या व्यक्तीबरोबर बदलत असतं.

यापूर्वीं मीं कितीतरी संध्याकाळचे तास मालिनीच्या गोड सहवासांत खर्चीं घातले होते. भवभूतीच्या ' अविदितगतयामा रात्रिरेवंव्यरंसीत् ' या वचनाची मला आठवण झाली. आणि राम-सीतेचे प्रेमालाप वर्णन करण्यांत भवभूतीचें ' उत्तररामचरित ' श्रेष्ठ, कीं कालिदासाच्या रघुवंशांतला तेरावा सर्ग श्रेष्ठ, अशा दोन कल्पना माझ्या मनाच्या खिडकींत डोकावून गेल्या. बाकी मन हें खिडकीसारखेंच आहे. खिडकींत आणि मनांत कुण्यातरी सुंदरीचें अधिष्ठान असतेंच ! आणि जातां जातां कोटीच करून जायचं म्हटलं, तर दारांत आपली दारा वाट पहात असते. दारानें म्हणजे पत्नीनें वाट पहात उभें राहाण्याचें ठिकाण म्हणजे, दार. आतां बेरीज

करून सांगायचं म्हणजे प्रत्येक माणसाच्या मनाच्या खिडकींत आणि घराच्या दारांत मिळून दोन स्त्रिया उभ्या असतात.

मालिनी माझ्या बाजूला बसली होती. मी तिच्या बाजूला बसलों होतों. मालिनी दिसायला सुंदर आहे आणि स्वभावानेंहि सुंदर आहे. तरीहि तुलनाच करायची झाली तर तिचा स्वभावच मला अधिक आवडतो. सुंदर पाकळ्यांचें गुलाबाचें गेंदेदार फूल आणि टवटवीत हिरव्या चाफ्याचें फूल माझ्यापुढें ठेवलें तर मी त्यांतील हिरव्या चाफ्यालाच जास्त मार्क देईन. मी लहानपणीं सांगलीला असतांना नेहमीं हिरव्या चाफ्याचीं फुलं तोडून वाटींत पाणी घालून तींत ठेवीत असें. सारं घर वासानं दरवळून जायचं. शेजारची सुमन मला म्हणायची, " मला दे ना रे भाऊ. " तेव्हां मी म्हणायचा, " अग तुला काय करायचंय चाफ्याचं फूल ? तुझं आडनांव चाफेकर आहे अन् नांव आहे सुमन. म्हणजे तुझ्या ' करां ' त चाफ्याच सुमन आपोआपच आहे. "

तेव्हां ती फुरंगटून म्हणायची, " मला नाहीं बाई वाङ्मयांतलं बोलणं कळत. "

मग मी तिला फुलाच्या दोन जाड पाकळ्या तोडून देईं. खरंच, माणसाचं आयुष्य हें पाकळ्यासारखं आहे. किंवा तें पाकोळ्यासारखं आहे म्हटलं तरी चालेल. तें पाकळ्यांसारखं कधीं गळून पडेल किंवा पाकोळी-सारखं कधीं उडून जाईल याचा नेम नाहीं. पाकोळी ! तो इवलासा जीव! ते रंगीबेरंगी पंख. जणुं कांहीं कॉलेजांतल्या तरुणींचं प्रिंटेड पातळच. लहानपणीं मी कृष्णाबाईच्या काठीं हिंडून पाकोळ्या धरीत असें आणि त्याच्या नाजुक पायाला दोरी बांधून खेळत असें. आई म्हणायची, " नको रे भाऊ, इवल्याशा जिवांना त्रास देऊं ! "

माझ्या शेजारीं बसलेल्या मालिनीनंहि मला पाकोळीसारखं प्रेमरज्जूनं बांधलं आहे. मला वाटतं, जगांत इतर कोणत्याहि दोरांपेक्षां प्रेमरज्जूच अधिक खपत असावा. कां कोण जाणे, रज्जू म्हटलं कीं मला लहानपणीं सांगलीला शिकत असते वेळच्या भांडारकरांच्या संस्कृत पुस्तकांतील, ' रज्जुं सर्पं मा मान्यध्वम् " या वाक्याची आठवण होते. भांडारकर !

संस्कृतचे केवढे प्रकांड—पंडित ! त्यांच्या ' करां 'त संस्कृतचं ' भांडार ' होतं म्हणून त्यांचं ' भांडारकर ' हें आडनांव अन्वर्थक होतं. नाहीं तर कांहीं लोकांचं आडनांव दांडेकर असते; परंतु त्यांच्या ' करां 'त ' दांडा 'च नसतो !

मालिनीचंहि तसंच आहे. ' मालिनी ' वृत्ताच्या प्रत्येक चरणांत पंधरा अक्षरं असतात. आणि त्यास अनुसरून वास्तविक ती पंधरा वर्षांची असायला पाहिजे. परंतु आतां ती सतरा वर्षांची झाल्यामुळें ' मंदाक्रांता ' झाली आहे हळूहळू ती स्रग्धरा; मंदारमालादेखील होईल आणि अठ्ठावीसच्या पुढें गेली कीं ' निर्वृत्त '—खरं म्हणजे ' निवृत्त '—होईल.

मी नि मालिनी बोलत होतों. ती लाडिकपणें तोंडाचा चंबू करून माझ्याशीं बोलत होती. त्या चंबूतून तिच्या प्रेमळ शब्दांचं अमृत माझ्या कानांत पडत होतं. धन्यौ तौ कर्णौ ! आपल्या दोन वेण्यांशीं चाळा करीत ती बोलत होती. वेणी म्हणजे जणूं नागीणच ! स्त्रिया प्रसंगीं नागीण होऊं शकतात, याचं वेणी हें जणूं कांहीं प्रतीकच आहे ! अन् मालिनीनं तर दोन वेण्या सोडल्या होत्या. ही दोन नागिणीरूपी मालिनी कोणाच्या प्रेमाचा बेडूक गिळणार होती कोण जाणे ! बहुधा तिच्या प्रेमाचा बेडूक होण्याचं माझ्याच नशिबाल होतं !

बेडूक म्हटलं कीं मला लहानपणची आठवण होते. ते पावसाळ्याचे दिवस ! ते बेडकाचं ओरडणं ! तो कृष्णाबाईला आलेला पूर ! तो गणपतीच्या देवळाभोंवतीं पडलेला पाण्याचा वेढा !—सारं सारं उत्तररामचरितांतल्या चित्रपटासारखं माझ्या डोळ्यांसमोरून झराझरा जातं. बालपणींच्या आठवणींचा चित्रपट माझ्या मनाच्या थिएटरमध्यें नेहमींच लागतो. आणि ' प्रभात 'च्या ' संत तुकारामा 'प्रमाणें प्रत्येक वेळीं तो मला खेंचून घेतो.

मीं मालिनीला म्हटलं, " मालिनी ! "

" मला तुम्ही ' मालन ' म्हणत जा गडे ! " मालिनी लाडिकपणें म्हणाली, " म्हणजे ' मालन बन कर आओ ' या गाण्याचा उपयोग होईल ! "

ग्रंथ संग्रहालय
वाचनालय



"अग, मग चूक आहे तुझं म्हणणं." मी म्हणालों, "आफ्रिकेंतल्या डॉ. मलाननें तिकडे इतका छळवाद केला आहे कीं आतां, 'मालन बन कर आओ' हें गाणं 'मालन बन कर मत आओ' असं म्हणायची पाळी आली आहे ! पाहिजे तर मी तुला नुसतंच 'माल' म्हणतों."

"चला ! चावट कुठले !" ती लाडिक मुरका मारीत म्हणाली.

"मालिनी, माझं तुझ्यावर प्राणापलीकडे प्रेम आहे ग !" मी म्हणालों.

"चला ! कांहीं तरीच ! दिसत नाहीं कुठं ?" मालिनी म्हणाली.

"अग, प्राणापलीकडे आहे तें. प्राण गेल्यावर दिसेल !" मी म्हणालों. *

---

* वरील (तथाकथित) कोटि कथेची संक्षिप्त आवृत्ति वाचकाचा वेळ वांचविण्यासाठीं खालीं दिली आहे ;

तो : प्रिये, माझं तुझ्यावर प्राणापलीकडे प्रेम आहे ग !


ती : चला ! कांहीं तरीच ! दिसत नाहीं कुठं ?

तो : अग, प्राणापलीकडे आहे तें. प्राण गेल्यावर दिसेल !

* * *

# प्रेमाची भूमिति ! १४

**प्रतिज्ञा :** प्रेमाच्या त्रिकोणांतील नायक–नायिकेच्या दोन बाजूंची बेरीज खलनायकाच्या बाजूला पुरून उरते.




**पक्ष :** नायक, नायिका आणि खलनायक या तिघांच्या संघर्षांतून निर्माण झालेला प्रेमाचा त्रिकोण.

**साध्य :** नायक–नायिकेचं मीलन आणि शुभमंगल करून, खलनायकाला खडी फोडायला पाठविणें.

**रचना :** ( १ ) खलनायकाच्या तंगड्या **बक** बाजूनें लंब्या करा.

( २ ) नायक-नायिकेच्या **अ** या मीलनबिंदूशीं एक हृदयाकृति काढा.

( ३ ) नायिकेच्या कुलीनतेवर फेकलेला **डअ** हा विषारी बाण काढा.

**सिद्धता :** नायकाची **अब** रेषा आणि नायिकेची **अक** रेषा यांचें मधुर मीलन **अ** या बिंदूशीं झालें आहे.

म्हणून दोघांचींहि हृदयें **अ** या बिंदूंत एकत्व पावलीं आहेत.

**( समाना हृदयानि वः )**

नायकाची **अब** रेषा आणि नायिकेची **अक** रेषा मुळांतच आडव्या पडलेल्या खलनायकाच्या अनुक्रमें कपाळावर आणि छाताडावर. उभ्या आहेत.

म्हणून खलनायक नायिकेच्या कुलीनतेविषयीं शंका घेणारा **डअ** हा विषारी बाण **अ** हें लक्ष्य योजून मारतो.

**( पहा : ‘ एन्. सी. सी.ची नेमबाजी ’ )**

कारण, त्याला हें कसें सहन होणार ?

( **मानवी स्वभाव** )

परंतु **डअ** हा विषारी बाण दोघांच्या ओठांतल्या अमृतामुळें तुडुंब भरलेल्या अशा मीलित हृदयांत गेल्यामुळें त्याच्या विषारीपणाचा दम खलास होतो.

( **विषमपि अमृतं भवेत्** )

म्हणून खलनायक असहाय होतो.

( **दैवदुर्विलास** )

एवढ्यांत दुष्टांना शासन करणारे पोलिस येतात.

( **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्** )

इन्स्पेक्टरसाहेब नायक–नायिकेचे हात हातांत देऊन **अब** आणि **अक** या रेषा एकरूप होण्याचा मार्ग ' खुला ' करून देतात. नायक–नायिका मजा करतात.

( **नांदा सौख्यभरें** )

ज्याअर्थी खलनायक **बक** येरवडा मुक्कामीं खडी फोडीत आहे—

( **या हातानें करावें, या हातानें फेडावें** )

त्याअर्थी **अब** आणि **अक** या नायक–नायिकेच्या बाजू **बक** या खल-नायकाला पुरून उरल्या आहेत.

हें सिद्ध.

अनुक्रम 2-6-8-26
विभाग ...
क्रमांक 9 ५०
नों. दि.
IRBK-0105342
IRBK-0105342